CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २० एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १६२ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

मुंबई इंडियन्स वि. चेन्नई सुपरकिंग्ज
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : वानखेडे मैदान, मुंबई

## विचारपुष्प



नित्य आपल्याला नित्य विचार करावा लागेल की, जे कार्य करण्याची आपण प्रतिज्ञा केली आहे आणि जे लक्ष्य आपल्यासमोर आहे, ते प्राप्त करण्यासाठी आपण किती काम करीत आहोत. ज्या गतीने किंवा ज्या प्रमाणात आपण आपले कार्य करीत आहोत, ती गती किंवा प्रमाण आपल्या लक्ष्यप्राप्तीकरिता पर्याप्त आहे?

**डॉ. केशव बळीराम हेडगेवार,**
रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक

## महत्त्वाचे

### दिल्लीत बहुमजली इमारत कोसळून ११ ठार

**नवी दिल्ली :** एप्रिल ईशान्य दिल्लीतील शक्ती विहार भागात शनिवारी पहाटे एक बहुमजली निवासी इमारत कोसळली. यात ११ जणांचा मृत्यू झाला. अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बचाव पथकाने ४ जणांना वाचवले आहे. सुमारे ८ ते १० जण ढिगाऱ्याखाली असल्याचा अंदाज आहे, असे अतिरिक्त पोलिस उपायुक्त संदीप लामा यांनी सांगितले. दयालपूर पोलिस ठाण्याला पहाटे ३.०२ वाजता इमारत कोसळल्याची माहिती मिळाली.

# आमचे वाद छोटे, महाराष्ट्रासाठी एकत्र येणे कठीण नाही

## ▸ उध्दव ठाकरेंसोबत युतीच्या मुद्यावर राज ठाकरेंची भूमिका

**◆ मुंबई, १९ एप्रिल**

आमच्यातील वाद, भांडणं, मतभेद अगदीच किरकोळ आहेत. त्यापेक्षा महाराष्ट्र खूप मोठा आहे. महाराष्ट्राच्या आणि मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी ही भांडणे, वाद बाजूला ठेवून एकत्र येण्याची माझी तयारी आहे, अशी भूमिका मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंसोबतच्या युतीवर शनिवारी विशद केली.

मराठी चित्रपट सृष्टीतील प्रख्यात दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी घेतलेल्या मुलाखतीत राज ठाकरे बोलत होते. महेश मांजरेकरांनी या मुलाखतीत राज ठाकरेंना उद्धव ठाकरे यांच्या गटासोबत एकत्र येऊ शकता का, असा प्रश्न विचारला होता. यावर मराठी माणसाच्या अस्तित्वापुढे वाद, भांडणे क्षुल्लक आहेत. एकत्र येणं आणि एकत्र राहणे ही कठीण गोष्ट नाही. विषय फक्त इच्छेचा आहे. हा एकट्या माझ्या इच्छेचा आणि स्वार्थाचा विषय नाही. मला असे वाटते की, महाराष्ट्रातील सर्व राजकीय पक्षातील मराठी लोकांनी एकत्र येऊन एकच पक्ष काढावा, असे राज ठाकरे म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)



### ही रक्ताची नाती : संजय राऊत

राज ठाकरेंची भूमिका नाकारण्याचा करंटेपणा आमच्याकडून होणार नाही, मुंबई आणि मराठी माणसांसाठी एकत्र यावेच लागेल, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले. राज ठाकरेंनी आता कुठे मन मोकळे केले, त्याला आम्ही प्रतिसाद दिला. आता आम्ही वाट बघतोय. राज आणि उद्धव ठाकरे हे भाऊ आहेत, ही रक्ताची नाती आहे, असे सांगत संजय राऊत यांनी राज ठाकरेंना युतीसाठी साद घातली.

### माझी तयारी; अट एकच : उद्धव ठाकरे

राज ठाकरे यांच्या भूमिकेवर उद्धव ठाकरे यांनीही प्रतिक्रिया दिली. किरकोळ भांडणे बाजूला ठेवायला मी तयार आहे, मी सर्व मराठी माणसांना महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र येण्याचे आवाहन करतो. पण, एक अट आहे. जेव्हा आम्ही लोकसभा निवडणुकीत सांगत होतो, हे सगळे उद्योग घेऊन गुजरातला जात आहेत, तेव्हाच विरोध केला असता तर महाराष्ट्र हिताचे सरकार केंद्रात आणि राज्यात बसवू शकलो असतो. तेव्हा पाठिंबा द्यायचा आणि आता विरोध करायचा. मग पुन्हा तडजोड करायची, हे चालणार नाही. महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचे स्वागत मी करणार नाही, त्याला घरी बोलवणार नाही, त्याच्यासोबत पंक्तीला बसणार नाही. त्यामुळे आधी यावर काय ते ठरवा आणि मग महाराष्ट्र हिताच्या गोष्टी करा. बाकी आमच्यातली जी भांडणे आहेत, त्यावर मी आज सांगतो, जी भांडणे माझ्याकडून नव्हतीच, ती मी मिटवून टाकली आहेत.



# आयएसआय, बब्बर खालसाच्या १३ अतिरेक्यांना अटक

## पंजाब पोलिसांची कारवाई; आयईडी, आरडीएक्सचा साठा जप्त

**जालंधर, १९ एप्रिल**

पंजाब पोलिसांनी पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित १३ अतिरेक्यांना अटक केली. सलग चार दिवस चाललेल्या या कारवाईत दोन दहशतवादी मॉड्यूल नष्ट करण्यात आले.

पंजाबमधील पोलिस ठाणी आणि काही महत्त्वपूर्ण व्यक्ती या अतिरेक्यांच्या रडारवर होते. अटक केलेल्या अतिरेक्यांकडून २ रॉकेट प्रोपेल्ड ग्रेनेड, १ ग्रेनेड लाँचर, २.५ किलो वजनाचे दोन आयईडी, डेटोनेटर्स, २ हॅण्ड ग्रेनेड, रिमोट कंट्रोल आणि २ किलो आरडीएक्स, ५ पिस्तूल, ६ मॅगझिन, ४४ काडतुसे, १ वायरलेस सेट आणि ३ वाहने जप्त करण्यात आली. महत्त्वपूर्ण व्यक्तींना लक्ष्य करून पंजाबमध्ये पुन्हा दहशतवादी कारवायांचे पुनरुज्जीवन करण्याच्या मोहिमेवर हे अतिरेकी आले होते. पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी सांगितले की, हे लोक आयएसआयच्या इशाऱ्यावरून देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी होते. गुप्तचर माहितीच्या आधारे केलेल्या दोन कारवायांमध्ये पंजाब पोलिसांनी बब्बर खालसा इंटरनॅशनलद्वारे परदेशातून चालवल्या जाणाऱ्या आयएसआय समर्थित दहशतवादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे.



पहिल्या मॉड्यूलमध्ये फ्रान्सस्थित बब्बर खालसा इंटरनॅशनलशी असलेले दुवे उघड झाले. यात होशियारपूर येथील सूत्रधार सतनामसिंगचे नाव आहे. फ्रान्समध्ये बसलेला सतनाम आपल्या गुंडांच्या माध्यमातून देशात दहशतवादी कारवाया करायचा. पोलिसांनी त्याच्या साथीदारांकडून शस्त्र व स्फोटकांचा मोठा साठा जप्त केला. जतिंदर उर्फ हनी, जगजित, हरप्रीत आणि जगरूप अशी अन्य अतिरक्यांची नावे आहेत.

## चार जहाल नक्षल्यांना अटक

### शिरावर होते ४० लाखांचे बक्षीस

**गडचिरोली, १९ एप्रिल**

दिरंगी-फुलनार येथे झालेल्या चकमकीत सी-६० जवानाच्या हत्येत सक्रिय सहभाग असलेल्या चार जहाल नक्षलवाद्यांना गडचिरोली पोलिस दल व सिआरपीएफने शनिवारी अटक केली.

महाराष्ट्र शासनाने या चौघांवर एहूण ४० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. दक्षिण गडचिरोली डिव्हीजनचा डीव्हीसीएम सायलु भुमय्या मुड्डेला ऊर्फ रघु रा. लिंगापूर, जि. निजामाबाद (तेलंगणा), भामरागड दलम एरिया कमिटी डिव्हीसीएम जैनी भिमा खराटम ऊर्फ अळीला, रा. कंचाला, जि. बीजापूर (छत्तीसगड), भामरागड दलम सदस्य झाशी दोघे तलांडी ऊर्फ गंगू, रा. येचली, जि. गडचिरोली व भामरागड दलम सदस्य मनिला पिडो गावडे ऊर्फ सरिता, रा. कापेवंचा, जि. गडचिरोली अशी अटक करण्यात आलेल्या नक्षल्यांची नावे आहेत. रघु आणि जैनी हे दाम्पत्य आहेत. भामरागड उपविभागांतर्गत ताडगाव पोलिस स्टेशनमधील पोलिस पथक व ९ बटालियन सीआरपीएफ कंपनीचे जवान आज संयुक्तपणे अभियान राबवत असताना पल्ली जंगल परिसरात त्यांना चार संशयित व्यक्ती फिरताना आढळले.

जवानांनी त्यांना ताब्यात घेऊन सखोल चौकशीसाठी पोलिस उपमुख्यालय प्राणहिता येथे आणले. चौकशीअंती ते जहाल माओवादी असून, घातपात घडवून आणण्याच्या उद्देशाने ते जंगल परिसरात रेकी करण्यासाठी दाखल झाले होते तसेच ११ फेब्रुवारी रोजी दिरंगी-फुलनार जंगल परिसरात झालेल्या चकमकीत एका पोलिस जवानाच्या हत्येत त्यांचा प्रत्यक्ष सहभाग होता, असे निष्पन्न झाले. कोठी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने सायलूच्या अटकेवर २० लाख, जैनीच्या अटकेवर १६ लाख, झाशीच्या अटकेवर २ लाख व मनिलाच्या अटकेवर २ लाख असे एकूण ४० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

# महाराष्ट्रातून आयुष चौधरी अव्वल

## जेईई मेन्स निकाल : देशात मोहम्मद अनसची बाजी

**◆ मुंबई, १९ एप्रिल**

जेईई मेन्स दुसऱ्या सत्राचा निकाल शुक्रवारी रात्री जाहीर झाला असून यावर्षी २४ विद्यार्थ्यांनी १०० पर्सेंटाईल मिळविले आहेत. आयुष रवी चौधरी महाराष्टातून अव्वल ठरला आहे. राजस्थानचा मोहम्मद अनसने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

नॅशनला टेस्टिग एजन्सीने शनिवारी जेईई मेन्सचा (दुसरे सत्र)निकाल जाहीर केला. १०० पर्सेंटाईल मिळविणाऱ्या २४ विद्यार्थ्यांमध्ये सर्वाधिक ७ राजस्थानचे आहेत. त्यानंतर तेलंगण, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातून प्रत्येकी तीन जणांचा समावेश आहे. दिल्ली, पश्चिम बंगाल आणि गुजरातमधील प्रत्येकी दोन विद्यार्थी अव्वल ठरले तर कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील प्रत्येकी एका विद्यार्थ्यांने १०० चा आकडा गाठला. २४ मध्ये दोन विद्यार्थिनींचा समावेश आहे. महाराष्ट्रातून सानिध्य सराफ आणि विशाद जैन यांनी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.



जेईई मेन्सला द्वितीय सत्राला देशभरातून ९ लाख ९२ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी बसले होते. पहिल्या सत्रात १० लाख ६१ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.

### जेईई ॲडव्हान्ससाठी कट ऑफ

जनरल : ९३.१०२३२६२
ईडब्लूएस: ८०.३८३०११९
ओबीसी: ७९.४३१३५८२
एससी: ६१.१५२६९३३
एसटी: ४७.९०२६४६५

**२४ मध्ये खुल्या प्रवर्गातील २१ विद्यार्थी**

शंभर गुण मिळविणाऱ्या २४ विद्यार्थ्यांपैकी खुल्या प्रवर्गातील २१ जणांचा समावेश आहे. तर एससी, एसटी आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातील प्रत्येकी एका विद्यार्थाने पैकीच्या पैकी गुण मिळविले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# पहिल्या स्वदेशी एआय सर्व्हरचे अनावरण

## ● अश्विनी वैष्णव यांची माहिती

**नवी दिल्ली, १९ एप्रिल**

देशातील पहिल्या स्वदेशी कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआय सर्व्हर 'आदिपोली'चे मानेसर येथे अनावरण करण्यात आल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. भारताचे स्वदेशी तंत्रज्ञानाच्या दिशेने मोठे पाऊल आणि वाढत्या ताकदीचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले.

अमेरिकेचे चॅटजीपीटी आणि चीनच्या डीपसीक यासाठी भारताचे स्वदेशी एआय पर्याय ठरणार आहे. वैष्णव यांनी एक्सवर पोस्ट करीत लिहिले की, आदिपोली सर्व्हरमध्ये ८ जीपीयूचा समावेश आहे आणि तो पूर्णतः भारतात डिझाइन करण्यात आला. हे उपकरण भारताच्या प्रगत इलेक्ट्रॉनिक्स आणि एआय क्षेत्रातील वाढत्या ताकदीचे प्रतीक ठरणार आहे. एआय सर्व्हर व्हीव्हीडीएन टेक्नोलॉजीज या भारतीय कंपनीने विकसित केले आहे. आदिपोलीची निर्मिती 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत करण्यात आली. भारतात



बनणारी इलेक्ट्रॉनिक उपकरणे आता जगभरात विश्वासार्ह ठरत असून स्पर्धात्मकतेच्या दृष्टीनेही सक्षम आहेत.

बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यावर भारताचे लक्ष आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत लोकप्रिय होत आहे, त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत आहे. गेल्या दशकात भारताचे इलेक्ट्रॉनिक उत्पादन आणि निर्यात अनेक पटींनी वाढल्याचे त्यांनी सांगितले. भारत मदरबोर्ड, नेटवर्किंग उपकरणे आणि एआय सर्व्हरसारख्या प्रगत उत्पादनांची निर्मिती करण्यास सक्षम ठरणार आहे.

### बांगलादेशात हिंदू नेत्याचे अपहरण करून निर्घृण हत्या

**ढाका :** बांगलादेशातील एका प्रमुख हिंदू समुदायाच्या नेत्याचे राहत्या घरातून अपहरण करून क्रूरपणे हत्या करण्यात आली. ढाक्यापासून सुमारे ३३० किमी वायव्येस असलेल्या दिनाजपूर जिल्ह्यातील बासुदेबपूर गावातील रहिवासी ५८ वर्षीय भावेश चंद्र रॉय यांचा मृतदेह गुरुवारी रात्री उशिरा सापडला, असे पोलिसांनी सांगितले.

भावेश चंद्र हे दिनाजपूर भागातील हिंदू समुदायाचे एक प्रमुख नेते होते आणि त्यांनी बांगलादेश पूजा उत्सव परिषदेच्या बिरल युनिटचे उपाध्यक्ष म्हणूनही काम केले. या घटनेवर भारतीय परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रसार माध्यमांशी बोलताना भावेश यांच्या पत्नी शांतना रॉय म्हणाल्या की, गुरुवारी रात्री दोन दुचाकीवर चार जण आले आणि त्यांनी शस्त्राच्या धाकावर भावेश यांना सोबत नेले. पहाटेच्या सुमारास बेशुद्धावस्थेत त्यांना हल्लेखोरांनी कारमधीन घरी सोडले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




# कारच्या धडकेत ५५ वर्षीय इसम ठार

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि.१९ एप्रिल**

अक्कलकोट ते सोलापुर रोडवरिल ब्यागेहळ्ळी फाटा जवळ १८ एप्रिल रोजी रोजी सांयकांळी ८ वाचे सुमारास कारच्या धडकेत ५५ वर्षीय इसम मयत झाला. स्वामीनाथ सिध्दप्पा गायकवाड (वय-५५ वर्षे, रा-गणपती मदिर शहा नगर झोपडपट्टी सोलापुर) असे या अपघातातील मयताचे नांव आहे.

परशुराम राजु जाधव (वय ३६ वर्ष, व्यवसाय-शेती रा. ब्यागेहळ्ळी) यांनी फिर्याद दिली. याबाबत अज्ञात कार चालकाविरोधात उत्तर पोलीस ठाणे मध्ये गुन्हा दाखल झाला असुन याबाबत पोलीस सुत्राकडुन मिळालेली अधिक माहिती अशी की, अक्कलकोट ते सोलापुर रोडवरील ब्यागेहळ्ळी फाटा जवळ एम.एच १३सी एस २१८७ वरील अज्ञात चालक यांनी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात व हयगईने, अविचाराने चालवुन ब्यागेहळ्ळी फाटा येथे थांबलेले फिर्यादीचे सासरे स्वामीनाथ सिध्दप्पा गायकवाड (वय-५५ वर्षे, रा-गणपती मदिर शहा नगर झोपडपट्टी सोलापुर) यांना जोरात धडक देवुन डोकीस गंभीर जखमी करुन त्यांना ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे उपचारास दाखल केले असता १८ एप्रिल रोजी रात्री ९ वाजता उपचारापुर्वीच मयत झाले. चालक सदर ठिकाणावरुन पळुन गेला. मयत इसम हे जावईकडे बँगेहळ्ळी येथे येणेकरिता अक्कलकोट सोलापुर रोडवर ब्यागेहळ्ळी फाटा येथे पत्नीसह थांबले होते. तसे सासुने फोनवर फिर्यादीला कळवले होते.

फिर्यादी मोटारसायकल घेवुन ब्यागेहळ्ळी फाटा येथे सासु पार्वती स्वामीनाथ गायकवाड व सासरा स्वामीनाथ सिध्दप्पा गायकवाड यांना घेण्यासाठी आला होता. जावईजवळ जावुन त्यांचे सोबत बोलत असताना अचानक अक्कलकोटकडून एका कार गाडीने सासरा स्वामीनाथ सिध्दप्पा गायकवाड यांना जोराने धडक दिली व सदर वाहन पुढे जावुन रोडचे बाजुस जावुन थांबले. स्वामीनाथ यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन बेशुध्द झाले. अँब्युलन्स वाहनाने उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट येथे घेवुन गेले असता डॉक्टरांनी त्यांची तपासणी करुन उपचारापुर्वीच मयत झाल्याचे सांगीतले.अधिक तपास पोलीस करत आहेत.

# भीमजयंती मिरवणुकीसाठी महापालिकेच्या वतीने विविध सोयी-सुविधा उपलब्ध

## ● वैद्यकिय सेवा,पाण्याचे टँकरसह व्यवस्था असणार तैनात



**तभा वृत्तसेवा-**
**अक्कलकोट, दि.१९ एप्रिल**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव सांगता मिरवणुकी दिवशी नागरिकांना आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास त्या करीता उपाययोजना म्हणून सोलापूर महानगर पालिकेच्या वतीने वैद्यकिय सेवा, पाण्याचे टँकर, फिरते शौचालय, अग्निशमन विभागा आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

सोलापूर शहरात सालाबादाप्रमाणे दि.२० एप्रिल २०२५ रोजी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्सव शहरात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येत आहे. उत्सवाची सांगता दि. २० एप्रिल २०२५ रोजी भव्य मिरवणुकीने होणार आहे. त्यानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त दि.२० एप्रिल २०२५ या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी भव्य मिरवणूक निघणार आहे. यामध्ये विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

### मिरवणुकी दरम्यान रुग्णवाहिका

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर
गाडी क्रमांक -१३ १९३६ वाहन चालक- प्रभू घंटे-मोबाईल--८६९८९०३८३८
उमेश भोसले --९८८१५२६५२५

२) नवी वेस पोलीस चौकी,
गाडी क्रमांक १३ १९३७
वाहन चालक उमेश भोगडे -मो.९१७५१६६१०१
उत्तम मोरे -मो.८८०५५३६०२८

३) डॉ. द्वारकानाथ कोटी स्मारक, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथे
गाडी क्रमांक-१३९५९२
वाहन चालक --लक्ष्मण मुरटे मो. ९५६१०६६०४५

४) रामलाल चौक येथील महापौर बंगला परिसर.
गाडी क्रमांक -१३ ०९५८
वाहन चालक विक्रम तळभांडारे मो. ७५१७०३०५९७
या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी सह कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

### अग्निशामक विभाग

१) नवी वेस पोलीस चौकी
गाडी क्रमांक -१३ २९१६
वाहन चालक भारत सलगर
मो.९९२२७९१४१४

२) भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर
गाडी क्रमांक -१३ २६६७
वाहन चालक रफिक सय्यद
मो.९८२२१८१८३७

३ )रेल्वे स्टेशन परिसर..
गाडी क्रमांक -१३ ३३१४
वाहन चालक मिलिंद सुरवसे
मो.९८८१५२६२७२
या ठिकाणी अग्निशामक विभागाचे अद्यावत सुविधा असलेले गाडीसह कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

### पिण्याच्या पाण्याची सोय

पाणी पुरवठा विभाग व विभागीय कार्यालयाकडून पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे.
१)हॉटेल दिलकुश शेजारी
२) जय भवानी खानावळ शेजारी.
३) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर
४) महापौर बंगला परिसर
५) एम्प्लॉयमेंट चौक

### फिरते शौचालय -

घनकचरा विभागाकडून फिरते शौचालय तसेच संपूर्ण मिरवणूक मार्गावरील स्वच्छता करणे जंतुनाशक फवारणी करणे इत्यादी व्यवस्था
१) सोलापूर एसटी स्टँड जवळील विनायक लॉज पाठीमागे नियोजित आहे.
२) जिमखाना इंदिरा गांधी स्टेडियम चौपाटी,
३) महानगरपालिका पाठीमागे.
४) स्टेशन भाजी मंडई .
५) करजगी मॉल भैया चौक ते नवी वेस पोलीस चौकी दरम्यान.



# नालंदा बुद्ध विहार तरुण मंडळाच्या विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

नालंदा बुद्ध विहार मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ मोठ्या उत्साहात झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णासाहेब भालशंकर हे होते तर कार्यक्रमाला जयद्रथ खंडागळे, सिद्राम बेरे, बँक अधिकारी अरविंद साबळे, उमेश शिंदे, अनिल बनसोडे ,बुद्धजय भालशंकर, शीला हावळे, महावितरणच्या सावंत आदींची उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेमध्ये वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, धावणे स्पर्धा महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, मुलांच्यासाठी क्रिकेट स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा, गीत गायन स्पर्धा, डान्स स्पर्धा, वन मिनिट्स शो स्पर्धा, नाटिका सादरीकरण स्पर्धा इत्यादी स्पर्धांचे समावेश होता. यशस्वी स्पर्धकांना मेडल आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरती विविध गीते सादर करण्यात आली. कु. ज्योती खंडागळे हिने सादर केलेल्या बाबासाहेब आंबेडकरांवरील गीतास आणि समूह नृत्यास प्रथम क्रमांक मिळाला. पंचशीलाचे महत्व या लघु नाटिकेस प्रथम क्रमांक मिळाला. चि. निर्वी भालशंकर (मुंबई) हिने सादर केलेल्या फॅन्सी ड्रेस शो मध्ये रमाईची भूमिका उठून दिसत होती. तिने सादर केलेले नृत्य प्रथम क्रमांकाचे ठरले.

या बक्षीस वितरण समारंभाचे प्रास्ताविक अश्वजित दुपारगुडे यांनी केले ,सूत्रसंचालन मिलिंद भालशंकर यांनी केले तर शीला हावळे यांनी आभार मानले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अश्वजीत दुपारगुडे, मिलिंद भालशंकर, चारुशीला भालशंकर ,प्रकाश शिंदे, मुख्याध्यापिका मंजुश्री खंडागळे, शीला हावळे यांनी परिश्रम घेतले.

# सोमवारपासून मार्डी येथील श्री यमाई देवी यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

शक्तीपीठाचा वारसा लाभलेल्या उत्तर सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाई देवी यात्रेला सोमवार (दि.२१) पासून सुरुवात होत असल्याची माहिती श्रीक्षेत्र मार्डीच्या सरपंच प्रांजली गणेश पवार यांनी दिली. आठशे तेरा वर्षांची जाज्वल्य परंपरा लाभलेले उत्तर सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील यमाईदेवी हे देवस्थान वाहूर (नवदांपत्यांनी करावयाची वाहूर यात्रा) तीर्थक्षेत्र म्हणून परिचीत आहे.



चैत्र वद्य आष्टमी १२१२ हा श्री यमाईदेवीच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा दिवस असून गुलबर्गा जिल्ह्यातील काळगी या गावी रंगनाथ गोसावी (मोकाशी) हे निस्सीम देवीभक्त होऊन गेले. लहानपणापासून देवीभक्तीची ओढ असल्यामुळे त्यांनी नांदेड जिल्ह्यातील माहूरगड येथे जाऊन एक तप देवीची उपासना केली. तेव्हा बालाघाटाच्या पायथ्याशी असलेल्या तेव्हाच्या मारोडी (आताचे मार्डी) या गावी बनओहोळ (दाजी पाटील यांचे शेत) या ठिकाणी काळी कपिला गाय घेऊन जाण्याची आज्ञा रेणुकादेवीने रंगनाथ स्वामींना केली. देवीच्या आज्ञेवरुन रंगनाथ स्वामी मार्डी गावी आले. गावाच्या उत्तरेला असलेल्या बनओहोळ या ठिकाणी गाय घेऊन गेले. तिथे गाईला पान्हा फुटला जमीन दुभंगली आणि तिथे देवीने दर्शन दिले व मूर्ती रुपात विसावली. गावाच्या पश्चिमेला असलेल्या महाकालेश्वर मंदिरात स्थापना करण्याची आज्ञा देवीने दिली. त्यामुळे शिव (महाकालेश्वर) मंदिरात यमाई देवीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली आहे.

तेव्हापासून चैत्र वद्य आष्टमी व नवमी या दिवशी देवीचा वार्षिक यात्रा उत्सव साजरा केला जातो. यंदा सोमवारी (दि.२१) चैत्र वद्य अष्टमी हा यात्रेतील मुख्य दिवस असून सकाळी नऊ ते दहा यावेळेत नित्योपचार पूजा, भाविकांचे देवीला महाअभिषेक होतील. सायंकाळी पाच वाजता गावातून श्री यमाई देवी व श्री मातंगी देवीच्या मानाच्या काठ्या सवाद्य मिरवणुकीने श्री यमाई देवीच्या मंदिरात जातील.रात्री नऊ वाजता देवीचा छबिना निघणार आहे.देवीची उत्सव मूर्ती व पादुका छबिन्यात ठेवून देवीला चवरी डहाळण्याचा मान मोकाशी परिवाराला वंशपरंपरागत चालत आला आहे.

मंगळवार दिनांक २२ रोजी नवमी दिवशी परगावची यात्रा असून यादिवशी दुसरा छबिना निघणार आहे.तरी भाविकांनी मोठ्या संख्येने यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेचे अध्यक्ष शहाजी पवार, ज्येष्ठ नेते विठ्ठल काशीद, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष मनोहर जगताप, मार्डी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील, अविनाश मार्तंडे, उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, अँड.इंद्रजीत पाटील, इंद्रजित पवार, श्री यमाई देवी, मारुती देवस्थानचे मुख्य विश्वस्त रंगनाथ गुरव, ग्राम विकास अधिकारी नंदकुमार पाटील, काशीनाथ कदम,विष्णू जगताप, प्रल्हाद काशीद, शिवाजी सोनार, सुवर्णा झाडे, शशिकांत मार्तंडे, संजय इनामदार, अरुण गुरव, गणेश पवार,युवराज पवार, शिवाजी गुरव,दत्तात्रय गुरव, विकास गुरव, निलेश गुरव यांनी केले आहे.

### शक्ती, भक्ती, वैराग्य पीठाचा त्रिवेणी वारसा

श्रीक्षेत्र मार्डीला श्री यमाई देवीमुळे शक्ती, श्री नागनाथांमुळे वैराग्य आणि श्री मार्कंडेय ऋषी, श्री रंगनाथ स्वामी मोकाशी व सौ बातकव्वा यांच्या वास्तव्याने भक्तीपीठ असा त्रिवेणी वारसा लाभला आहे.तसेच इथे श्री पापनाश तीर्थ असल्याने या भूमिला जाज्वल्य असा वारसा लाभला आहे. दरवर्षी चैत्र वद्य अष्टमी व नवमी या दिवशी श्री यमाई देवीचा वार्षिक यात्रा उत्सव असतो.

**- ज्योतिष विशारद रेणुकादास मोकाशी,**
रंगनाथ स्वामी मोकाशी यांचे विद्यमान वंशज)

# शाळा स्तरावरील चारच समित्या कार्यरत

## १५ समित्यांपैकी नवीन निर्णयानुसार १२ समित्यांचे विलिनीकरण; शिक्षकांमधून निर्णयाचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

राज्यातील शालेय स्तरावरील समित्यांची संख्या कमी करण्यात आली असून एकूण पंधरा समित्यापैंकी केवळ चार समित्याच यापुढील काळात काम पाहणार आहेत. शाळांमध्ये आता शालेय व्यवस्थापन समिती, विद्यार्थी सुविधा आणि भौतिक विकसन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती या चार समित्या राहणार आहेत.

सद्यःस्थितीत राज्यातील शासकीय आणि स्वराज्य संस्थांच्या समित्यांची रचना कार्यान्वित आहे. - परंतु, आता शालेय शिक्षण विभागाने शाळा स्तरावरील या समित्यांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. या एकत्रीकरणामुळे शाळांमध्ये आता पुढील काळात १५ समित्यांऐवजी आता केवळ चारच समित्या असणार आहेत. विविध समित्यांचे एकत्रीकरण करून समित्यांची संख्या कमी केल्यास मुख्याध्यापक आणि शिक्षकांना अध्यापन आणि शालेय कामकाजासाठी अधिकचा वेळ उपलब्ध होऊ शकणार आहे. दरवर्षी या समित्या स्थापन करणे, त्यांच्या बैठकीचा अजेंडा ठरवणे, बैठका घेत त्यांचे इतिवृत्त ठेवणे, यासाठी बारा ते पंधरा रजिस्टर खर्च होत होती. तसेच शिक्षक आणि मुख्याध्यापकांचा बराच वेळ वाया जात होता. म्हणून शासनाने अनेक समित्यांचे एकत्रीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला.

### शाळेत 'या' समित्या असणार

शाळास्तरावर आता शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण समिती / अंतर्गत तक्रार समिती आणि विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती या चार समित्या कार्यान्वित असणार आहेत.

### 'या' समित्यांचे एकत्रीकरण

माता पालक संघ, शालेय पोषण आहार योजना समिती, पालक शिक्षक संघ, नवभारत साक्षरता समिती, तंबाखू संनियंत्रण समिती, स्कॉफ स्वयं मूल्यमापन समिती यांचा समावेश केला आहे. तर विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समितीत विद्यार्थी सुरक्षा, तक्रार पेटी, शाळा बांधकाम, परिवहन, शाळा व्यवस्थापन व विकास, शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी गावस्तर समितीचे एकत्रीकरण केले आहे.

### गुणवत्ता वाढीसाठी एकत्रीकरणाचा चांगला निर्णय

शाळा स्तरावरील विविध समित्यांच्या एकत्रीकरणाच्या शासन निर्णयाचे स्वागत आहे. विशेषतः शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांचे राज्यातील शिक्षकांच्या वतीने आभार, वेगवेगळ्या समित्यांच्या कामकाजात मुख्याध्यापक, शिक्षकांचा वेळ वाया जात होता. दरवर्षी या सर्व समित्या स्थापन करणे, त्यांच्या बैठका घेणे, त्याचा अहवाल तयार करणे ही कामे करावी लागत. परंतु या निर्णयामुळे शिक्षकांचा अशैक्षणिक कामाचा ताण कमी होणार आहे. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी जास्तीचा वेळ मिळणार आहे, पर्यायाने शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी हा चांगला निर्णय आहे.

**- पंडीत साबा, मुख्याध्यापक, सन्ने वस्ती शाळा, कंदलगाव**

# मरवडे परिसरात प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकाऱ्याची जुगार अड्ड्यावर धाड

## ● १८ आरोपीवर गुन्हा दाखल; ९ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१९ एप्रिल-**

मरवडे येथे विजयकुमार येडसे यांच्या शेतात पत्र्याच्या शेडमध्ये तिरट नावाचा चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर प्रशिक्षणार्थी आय.पी.एस.अधिकारी अंजना क्रिष्णा व्ही.एस. यांनी छापा टाकून रोख रक्कम,मोटर सायकली,मोबाईल,चारचाकी वाहने, असा ९ लाख ५० हजार रपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन केला. मागील वर्षी पंढरपूर येथील आय.पी.एस. अधिकाऱ्याने मरवडे परिसरात जुगार अड्ड्यावर छापा टाकून कारवाई केली होती. पुन्हा याच परिसरात ही कारवाई केल्याने खळबळ उडाली आहे.

प्रदिप कांबळे (जत.),सिताराम बागल (मरवडे),परमानंद उर्फ करण कांबळे (जत),नवनाथ कांबळे (बेगमपूर),सुरेश गोडसे (सिध्देवाडी), विजयकुमार येडसे (मरवडे),रवी बोरगीकर (जत), बसवराज कोळी (जत),महेश बिराजदार (इंड),सुभाष जाधव (चडचण), महादेव नाईक (जत),दुंडेश दिवेकर (जत),सुधाकर लुती (जत),मंगेश जाधव (सिध्देवाडी),समीर मुजावर (मरवडे),राजकुमार बजयंत्री (चडचण),चंद्रकांत पवार (येड्राव), परमेश्वर कांबळे (जत) आदी १८ जणाविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, दि.१८ रोजी दुपारी ३ वाजता पंढरपूर ग्रामीण पोलीस ठाण्यात प्रशिक्षणार्थी आय.पी.एस. अधिकारी अंजना क्रिष्णा व्ही.एस. या हजर असताना गोपनीय माहिती मिळाली की,मरवडे येथे एका शेतात दोन जुगार अड्डे सुरु आहेत ही माहिती मिळताच संबंधीत अधिकाऱ्यांनी पोलीस उपनिरीक्षक अनिल पाटील, पोलीस उपनिरीक्षक विरसेन पाटील,पोलीस अंमलदार मिसाळ व स्वतः पोलीस अधिकारी अंजना क्रिष्णा व्ही.एस. या मरवडे येथे खाजगी वाहनाने हजर झाल्या. अलिकडेच वाहने उभा करुन जुगार अड्ड्यावर छापा टाकला. छाप्या प्रसंगी जाग्यावरच जुगार खेळणाऱ्या १८ आरोपींना पकडण्यात आले. दोन ठिकाणी गोलाकार बसून तिरट नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी सर्व आरोपींची अंगझडती घेण्यात आली. त्या घटनेत मोटर सायकली, मोबाईल,रोख रक्कम,चारचाकी वाहने असा एकूण ९ लाख ५० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याची फिर्याद पंढरपूर ग्रामीणचे पोलीस अंमलदार गणेश पाटील यांनी मंगळवेढा पोलीसात दिली आहे. दरम्यान मरवडे हे बोराळे बीट मध्ये येत असून तालुक्यातील सर्वात मोठे २१ गावचे बीट म्हणून ओळखले जात आहे.

हे बीट कर्नाटक सिमेलगत असल्याने एक सहाय्यक पोलीस निरीक्षक व अन्य पोलीस कर्मचारी येथे कार्यरत आहेत. एवढे मोठे जुगार अड्डे सुरु असताना स्थानिक पोलीसांना याची माहिती कशी काय नाही? याबाबत नागरिकामधून शंका व्यक्त करीत त्यांच्या कर्तव्यावर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. एक प्रशिक्षण अधिकारी येथे येवून धाड टाकतात ही मंगळवेढा पोलीसांच्या दृष्टीने खंत असल्याचे सुज्ञ नागरिकामधून बोलले जात आहे. मंथलीच्या नावाखाली हे अवैध धंदे सुरु असल्याची या घटनेनंतर दिवसभर नागरिकामधून मरवडे परिसरात चर्चा सुरु होती. कोल्हापूर परिक्षेत्र विभागाचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी या निष्क्रीय पोलीसावरती काय कारवाई करणार याबाबत नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

# सोलापूर सिटी बस 'ऑन ट्रॅक' कधी होणार? प्रशासन गप्प, नागरिक त्रस्त

## ● बस वेळापत्रकाची माहिती नागरिकांपर्यंत न पोहोचल्याने प्रवाशांमध्ये संभ्रम; हेल्पलाइन क्रमांकही अनुपलब्ध

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रूप, दि. १९ एप्रिल-**

सोलापूर शहरात गेल्या काही महिन्यांपासून सिटी बस सेवा अर्धवट आणि विस्कळीत स्वरूपात सुरू आहे. काही मार्गांवर सकाळी व दुपारी काही बस धावत असल्या, तरी संध्याकाळनंतर त्या पूर्णतः गायब होतात. त्यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी कुचंबणा होत आहे.



**रस्ता हरवलेली व्यवस्था**
भाग-४

महापालिकेची ही सेवा असून नसल्यासारखीच झाली आहे. प्रवाशांना कोणत्या मार्गावर किती बस धावत आहेत, त्यांचे वेळापत्रक काय आहे, याबाबत कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नाही. महापालिकेच्या संकेतस्थळावरील माहितीही जुनी असून, दिलेले संपर्क क्रमांक अनेकदा बंद असतात.

### पर्याय नसल्याने महागड्या रिक्षांचा अवलंब?

बस वेळेवर येईल की नाही, याचा अंदाज न लागल्याने प्रवाशांना रिक्षांचा आधार घ्यावा लागतो. परिणामी, वेळ आणि पैसा यांचा अपव्यय होतो. अनेक रिक्षाचालक या गोंधळाचा गैरफायदा घेत मनमानी भाडे आकारतात. काही वेळा प्रवाशांना ३० मिनिटांपासून ते दीड तासांपर्यंत बसची वाट पाहावी लागते.

### सेवा आहे की नावापुरतीच?

महापालिकेकडून सिटी बस सेवा पूर्ण क्षमतेने आणि नियमित सुरू होणार की नाही, याबाबत कोणतेही स्पष्ट वक्तव्य आलेले नाही. त्यामुळे "ही सेवा केवळ कागदावरच आहे का?" असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

### माहितीचा अभाव आणि गैरसोय

बस थांब्यांवर मार्ग, वेळापत्रक किंवा इतर कोणतीही माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिक अंदाजावरच प्रवास करतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गासाठी ही सेवा लाभदायक ठरू शकते, पण सध्या त्यांचीच परीक्षा घेतली जात आहे.

### संपर्क क्रमांकही बंद

जर नागरिकांना बसच्या वेळांबाबत माहिती घ्यायची असेल किंवा एखाद्या बस अथवा कर्मचाऱ्याबाबत तक्रार करायची असेल, तर त्यासाठी कोणतेही संपर्क क्रमांक उपलब्ध नाहीत.

### पुणे परिवहनच्या धर्तीवर सोलापूरकरांची मागणी

१) सर्व बस मार्गांचे वेळापत्रक महापालिकेच्या संकेतस्थळावर नियमितपणे अद्ययावत करावे.
२) मुख्य बस स्थानकांवर त्या मार्गांवरील बस क्रमांक व परतीच्या दिशेचे वेळापत्रक यांची स्पष्ट माहिती फलकाद्वारे प्रदर्शित करावी.
३) प्रवाशांसाठी स्वतंत्र हेल्पलाइन क्रमांक सुरू करावा.
४) सोलापूर परिवहन व एमएसआरटीसीने समन्वय साधून ग्रामीण प्रवाशांसाठी सोयीच्या गाड्या सोडाव्यात.
५) बस वेळेवर धावतात का, याचे नियमित परीक्षण व्हावे.

"बससेवेचे कोलमडलेले व्यवस्थापन तालुक्यातील तमाम नागरिकांसाठी त्रासदायक ठरत आहे. सध्या परीक्षा, लग्नसराई, उन्हाळ्याच्या सुट्ट्या यांसाठी मोठ्या प्रमाणावर नागरिकांची ये-जा सुरू आहे. तसेच इतर वेळी शेतकरी वर्ग, विद्यार्थी, परगावाहून येणारे विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी, अबालवृद्ध यांचा प्रवास बहुतांशी बससेवेशी निगडीत आहे. बससेवेची अनिश्चित वेळ, बसेसचा तुटवडा, बसेसच्या तांत्रिक अडचणी, प्रवाशांसाठी निवारा शेडच्या कमतरतेमुळे नेहमीच नाहक त्रास सहन करावा लागतो. या परिस्थितीत सुधारणा होणे अत्यावश्यक आहे."

**- उत्कर्ष भागवत, नागरिक**



# १५ लाख रुपये किंमतीच्या शेंगदाण्याचा अपहार

- दोघाविरुध्द गुन्हा दाखल
- २४ तासाच्या आत पोलीसांनी लावला घटनेचा छडा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१९ एप्रिल**

सेल्स टॅक्स ऑफिसर असल्याचे सांगून शबाना ट्रेडर्स या शेंगदाणा फॅक्टरी मधील १५ लाख रुपये किंमतीचे १८ टन वजनाचे ३६० बॅग शेंगदाणा संमतीवाचून फसवणूकीने अपहार केल्याप्रकरणी दोन अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान कोल्हापूर परिक्षेत्र विभागाचे पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे वेगाने फिरवून चोवीस तासाच्या आत मुद्देमालासह वाहन जप्त करण्यात मंगळवेढा पोलीसांना यश आले आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी महेबूब चाकरी (वय ३८,रा. गंगावती जि.कोपल,कर्नाटक) हे शबाना ट्रेडर्स या शेंगदाणा फॅक्टरी मध्ये पंधरा वर्षापासून दिवाणजी म्हणून काम करत आहेत. दि. १४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता फॅक्टरीमधून शेंगदाणे विक्रीसाठी ट्रान्सपोर्ट करावयाचे असल्याने कंपनीचे मालक रजाक यांना त्यांच्या मोबाईलवार संपर्क करुन ट्रक पाठविण्यास सांगितला होता. व्हॉटसअप नंबरवर ट्रक क्रमांक एम.एच.१३ सी.यू.८०३३ व ट्रक ड्रायव्हरचा मोबाईल नंबर पाठविला होता. त्यानंतर २.३० वाजता मोबाईल क्रमांक ८४२१३७१२५४ या क्रमांकावर एक अनोळखी इसमाचा फोन आला. त्याने सांगितले की, मै एम.एच.१३ सी. यू. ८०३३ ट्रक का ड्रायव्हर बोल रहा हूँ, मुझे महाराष्ट्र रोडलाईन्स ट्रान्सपोर्ट वालेने लोडींग के लिए भेजा है । असे म्हणाल्यावर फिर्यादीने फॅक्टरीचा पत्ता सांगीतला. दुपारी ३ वाजता एक महिंद्रा कंपनीचा ट्रक एम.एच.१३ सी.यू.८०३३ आला. ट्रकमध्ये ड्रायव्हरसह एक अनोळखी इसम होता. ट्रक चालकाने महाराष्ट्र रोडलाईन्सकडून आलेबाबत फिर्यादीस सांगितले. अंदाजे १५ लाख किंमतीचे १८ टन वजानाचा ३६० बॅंगा शेंगदाणा भरुन ट्रक मध्ये लोड केला.

सायंकाळी ७ वाजता ट्रक फॅक्टरीमधून पुणेकडे जाण्यासाठी निघाला. दि.१५ रोजी पहाटे ३.३० वाजता मरवडे-मंगळवेढा मार्गावरुन एक सिल्व्हर कलरची टाटा इंडिका कार आली. त्याम धील अनोळखी इसमाने ट्रक थांबविण्यास सांगितले. तेव्हा ड्रायव्हरने ट्रक थांबविल्यानंतर त्या कार मधून दोन अनोळख इसम खाली उतरले. गाडी चेकपोस्टला का थांबविली नाही, आम्ही सेल्स टॅक्सवाले आहोत तुम्ही मालाचे बील दाखवा असे म्हणाले. ट्रकमधील माल चोरीचा असून ट्रक सोलापूर ऑफिसला घेवून चला असे ते म्हणाले, आमचे व्यापाऱ्याकडे आमचा माल आला आहे का? याबाबत विचारपूस केली असता त्यांच्याकडे माल गेला नसल्याची खात्री झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान या घटनेचा तपास कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस म हानिरीक्षक सुनिल फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, डी.वाय.एस.पी. विक्रम गायकवाड,पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगीड्डे यांनी तपासाची सुत्रे वेगाने फिरवून तपासिक अंम लदार पोलीस उपनिरीक्षक विजय पिसे,पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर,पोलीस अंमलदार विनायक जाधव आदींनी या गुन्ह्याचा गुन्हा दाखल झाल्यापासून चोवीस तासाच्या आत या प्रकरणाचा उलघडा तांत्रिक तपासादरम्यान मुळ मालकाचा शोध घेवून जीपीएस सिस्टीमव्दारे कर्जत येथील राशीन गावाजवळ असलेल्या सोनाळवस्तीवरील माळावर वाहनासह १२ टन १० लाखाचा शेंगदाणा जप्त करण्यास या पथकास यश आले आहे.

# पुणे भूमीअभिलेख विभागातील भ्रष्टाचाराचा पर्दाफाश २ अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ एप्रिल:**

पुणे जिल्ह्यातील भूमीअभिलेख विभागातील भ्रष्टाचाराच्या एका गंभीर प्रकरणाने खळबळ उडाली आहे. जमिनीच्या मोजणी आणि हद्द निश्चितीच्या कामासाठी ५० लाख रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपांनंतर भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अमरसिंह पाटील आणि भूकरमापक किरण येटोळे यांच्या विरोधात पुणे शहरातील आर्थिक व सायबर गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला आहे.



या प्रकरणी तक्रारदाराने थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे प्रकरणाची तक्रार केल्यानंतर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन कारवाई केली. तक्रारदाराने पुणे ग्रामीण भागातील एका शेतजमिनीच्या मोजणी आणि हद्द निश्चितीच्या प्रक्रियेसाठी २०२३ पासून भूअभिलेख विभागाकडे सातत्याने अर्ज केले होते. मात्र, उप-अधीक्षक अमरसिंह पाटील आणि भूकरमापक किरण येटोळे यांनी वारंवार टाळाटाळ केली. याच दरम्यान, या दोन्ही अधिकाऱ्यांनी तक्रारदाराकडे जमिनीच्या कामासाठी ५० लाख रुपयांची लाच मागितल्याचा गंभीर आरोप तक्रारदाराने केला आहे. एवढेच नव्हे, तर ''हेलिकॉप्टर शॉट लावतो'' अशी धमकी देऊन तक्रारदारावर दबाव टाकण्याचा प्रयत्नही केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन तक्रारदाराने थेट महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लेखी तक्रार केली. बावनकुळे यांनी तक्रारीची तात्काळ दखल घेत पुणे जिल्हा प्रशासनाला चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार, पुणे शहरातील आर्थिक व सायबर गुन्हे शाखेने प्राथमिक चौकशी केली. चौकशीत तक्रारदाराच्या आरोपांना पुष्टी मिळाल्यानंतर अमरसिंह पाटील आणि किरण येटोळे यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

> राज्य सरकार भ्रष्टाचाराविरोधात कठोर कारवाईसाठी कटिबद्ध आहे. भूअभिलेख आणि भूसंपादन विभाग हा सामान्य नागरिकांच्या जीवनाशी थेट जोडलेला आहे. अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराला कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होईल.''
>
> **- चंद्रशेखर बावनकुळे,**
> महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य




**डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण**

# पिस्तुल, गोळ्या अन् पुंगळ्या तपासणीसाठी मुंबईला पाठविणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल:**

सोलापुरातील प्रसिद्ध मेंदू विकार तज्ञ तसेच एस.पी. इन्स्टिट्यूट ऑफ न्यूरो सायन्सेसचे संस्थापक डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. दरम्यान, शनिवारी शवविच्छेदना नंतर त्यांचा व्हिसेरा राखून ठेवण्यात आला आहे. तर आत्महत्येसाठी वापरलेली पिस्तूल, गोळ्या, पुंगळ्या तपासणीसाठी फॉरेन्सिक लॅबला पाठविण्यात येणार असल्याची माहिती सदर बदर पोलिसांनी दिली.



डॉ. वळसंगकर यांनी शुक्रवारी रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास मोदी परिसरातील बंगल्यातील बेडरूममध्ये स्वतःच्या पिस्तूलमधून डोक्यात दोन गोळ्या झाडून घेतल्या. त्यातील एक गोळी डोक्यातून आरपार गेली. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना कुटुंबीयांनी तातडीने रामवाडी येथील त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये दाखल केले. परंतु त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली होती. दरम्यान, त्यांच्या पार्थिवाचे शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. शवविच्छेदनानंतर त्यांचा व्हिसेरा राखून ठेवण्यात आला असून त्यांच्या शरिरातील काही अवयव तपासणीसाठी पुण्याला पाठविण्यात येणार आहेत. तसेच गोळी झाडलेली पिस्तूल, गोळ्या व पुंगळ्या तपासणीसाठी मुंबईच्या फॉरेन्सिक लॅबला पाठविण्यात येणार आहे.

दरम्यान, डॉ. वळसंगकर यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप पोलीस तपासात स्पष्ट झालेले नाही. त्यांचा तिसरा दिवस झाल्यानंतर कुटुंबीयांचे जबाब नोंदविण्यात येणार असून त्यानंतर आत्महत्येचे कारण समोर येईल असे पोलिसांनी सांगितले.

**आमदार विजयकुमार देशमुख यांच्या कार्यालयात परिवर्तन पॅनलची बैठक**

# निवडणुकीसाठी पुढील रणनीती ठरली

### काँग्रेसचे माजी मंत्री म्हेत्रे, शेळके, चाकोते तर राष्ट्रवादीचे काका साठे जमले एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल**

राज्यात शेतमालाच्या विक्रमी आर्थिक उलाढालीसाठी प्रसिद्ध असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना शह देण्यासाठी विरोधकांनी आता चांगलाच चंग बांधलेला दिसत आहे. सोलापूर बाजार समिती परिवर्तन पॅनलच्या वतीने आमदार सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख यांनी बैठकांचे सत्र सुरू केले आहे.



यंदा बाजार समितीवर आपलाच झेंडा फडकवण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी उभा केलेल्या भाजप कार्यकर्त्यांच्या पॅनलसाठी कंबर कसली आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या पॅनलमुळे नाराज काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस मधील नेत्यांच्या घरोघरी जाऊन देशमुख हे भेटीगाठी घेत आहेत. यापूर्वीच त्यांनी आमदार विजयकुमार देशमुख यांना सोबत घेतले आहे. आता त्यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष काका साठे, काँग्रेसचे माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, काँग्रेसचे म हादेव चाकोते, सिद्धाराम चाकोते, काँग्रेसचे जेष्ठ नेते जाफरताज पाटील त्यांच्या घरी जाऊन पाठिंबा घेतला आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांनी ही पाठिंबा दिला आहे.

दरम्यान, शनिवारी आमदार विजयकुमार देशमुख यांच्या राजवाडे चौकातील संपर्क कार्यालयात आमदार सुभाष देशमुख, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, बळीराम साठे, महादेव चाकोते, बाळासाहेब शेळके, सिद्धाराम चाकोते, डॉक्टर हवीनाळे, माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील यांचे बराच वेळ गुप्त बैठक झाली. या बैठकीत बाजार समितीच्या निवडणुकीची व्यूव्हरचना ठरवण्यात आली आहे.

आमदार विजय देशमुख म्हणाले, बाजार समितीची निवडणूक ही शेतकऱ्यांची आहे सुभाष देशमुख यांनी उभा केलेल्या पॅनलमध्ये शेतकऱ्यांची मुलं उमेदवार आहेत. त्यामुळे येथे उपस्थित आम्ही सर्वांनी या पॅनलला पाठिंबा देऊन विजयी करण्याचा निर्धार केला आहे. मार्केट कमिटी आणि शेतकऱ्यांचे हित हवे असेल, या राज्य आणि केंद्र सरकारचे मदत हवी असेल, तर सुभाष देशमुख यांनी उभ्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पॅनल सोबत रहा असे आवाहन मतदारांना आमदार विजय देशमुख यांनी केले. सुभाष देशमुख म्हणाले, माझ्या विनंतीला मान देऊन सर्व नेते या ठिकाणी एकत्र आले त्यांचे आभार मानतो. हे कार्यकर्त्यांचे पॅनल आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे, कार्यकर्त्यांना न्याय देणारे पॅनल असून त्यासाठी सर्व मतदार सोबत राहतील. आणि हे नेते आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडतील अशी अपेक्षा व्यक्त केली. एकंदर सत्ताधाऱ्यांच्या वर्चस्वाला व बालेकिल्लाला भगदाड पाडण्यासाठी आमदार सुभाष देशमुख आणि विजयकुमार देशमुख यांनी चंग बांधला असून या पॅनलकडे आता सर्व नाराज नेतेमंडळी जमा होत आहेत. रात्री उशिरापर्यंत बैठकांचे सत्र सुरू झाल्या असल्यामुळे सदरची निवडणूक सत्ताधाऱ्यांना जड जाईल असे चित्र सध्या बाजार समितीच्या वर्तुळात दिसत आहे.

# दिगंबर जैन मंदिर पाडणे हा पूर्वनियोजित कट

- 'बुलडोझर सरकार' जबाबदार : खासदार वर्षा गायकवाड
- जैन समाजाचा विलेपार्ल्यात विराट मोर्चा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. १९ एप्रिल-**

विलेपार्ले पूर्व येथील दिगंबर जैन मंदिर प्रकरण न्यायालयात असताना न्यायालयाच्या निकालाची वाट न पहाता बीएमसी अधिकाऱ्यांनी मंदिर जमीनदोस्त केले. जैन मंदिर पाडताना जैन तीर्थंकरांच्या मूर्ती, जिनवाणी आणि आदरणीय ग्रंथ आणि धर्मग्रंथांचाही घोर अपमान करण्यात आला. विलेपार्लेतील दिगंबर जैन मंदिर पाडणे हा पूर्वनियोजित कट असून भाजपा युतीचे 'बुलडोझर सरकार'च त्यास जबाबदार आहे, असा हल्लाबोल मुंबई काँग्रेस अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

जैन मंदिराच्या पाडकामाविरुद्ध संपूर्ण जैन समुदायाने मोठा निषेध मोर्चा काढला. या मोर्चात सहभागी होऊन खा. गायकवाड यांनी जैन समुदायाच्या मागण्यांना पाठिंबा दिला.



तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनाही जाब विचारला. याविषयी माहिती देताना त्या म्हणाल्या की, जैन मंदिर पाडल्याप्रकरणी महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी त्याच जागी पुन्हा दिगंबर जैन मंदिर बांधून देण्याची ग्वाही दिली आहे. तत्पूर्वी सकाळी आम्ही या पवित्र स्थळाला भेट दिली आणि मंदिराच्या व्यवस्थापन समितीसह जैन समुदायाच्या पीडित सदस्यांना भेटलो. मंदिर समितीच्या म्हणण्यानुसार, एका हॉटेल मालकाला या ठिकाणी बार उघडायचा आहे आणि त्यासाठी हा बुलडोझर चालवण्यात आला, असा दावा त्यांनी केला.

## काळजे व कार्यकर्त्यांना दमदाटी; शेजवाळसह पाच जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि.१९ एप्रिल**

शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख मनीष काळजे व त्यांच्या कार्यकर्त्यांना शिवीगाळ, दमदाटी केल्याबद्दल मनोज शेजवाळ यांच्यासह पाच जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत काळजे यांच्या फिर्यादीवरून शेजवाळ यांच्यासह समर्थ बिराजदार, सागर सोलापूरे, उमाकांत कारंडे, राजू शिंदे (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

शनिवारी दुपारी पावणेदोनच्या एएऐसुमारास सात रस्ता येथील शिवसेना भवन कार्यालयात मंत्री भरतशेठ गोगावले हे आले होते. त्यावेळी शेजवाळ व त्यांच्या कार्यकर्त्यांनी पक्षातून हकालपट्टी झाल्याचा राग मनात धरून आणि नवीन सोलापूर शहर तू नेमला आहेस असे म्हणून काळजे यांना शिवीगाळ, दमदाटी व मारहाण केली. याप्रकरणी सदर बझार पोलिसांत पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# राज्याचा कौशल्य विभाग काळाची गरज ओळखून मार्गक्रमण करत आहे

**राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन**

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई. दि.१९ एप्रिल:**

काळाची गरज ओळखून रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठ विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून जगभरात भारतीय कुशल मनुष्यबळ पुरवत आहे, ही आनंदाची बाब आहे असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

रतन टाटा महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाच्या दुसऱ्या वर्धापन दिनाच्या समारोप कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. विद्यापीठाच्या वर्धापन दीन समारोपात कौशल्य रोजगार उद्योजक्ता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य रतन टाटा कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर, एआयसीटीईचे अध्यक्ष डॉ. टी. जी. सिताराम, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालिका माधवी सरदेशमुख, कौशल्य विभाग आयुक्त नितीन पाटील उपस्थित होते. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाने एआय तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वाणिज्य आणि मीडिया या क्षेत्रात कौशल्य शिक्षण आणि प्रशिक्षणाचा प्रारंभ केला आहे, बदलत्या काळात आपल्या पारंपरिक कौशल्याच्या पलीकडे जाऊन आपण नवी पिढी घडवली पाहिजे, त्यासाठी आपल्या शिक्षकांनीही नवी संकल्पना समजून घेऊन त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यायला हवे. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला ' विकसित राष्ट्र ' निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. विकसित राष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीने त्यांनी सुरू केलेला 'स्किल इंडिया ' हा उपक्रम या संकल्पात म हत्वाचा भाग आहे. जागतिक कौशल्य आत्मसात करताना परदेशी भाषा शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. राज्याच्या कौशल्य विभागाने जर्मन भाषा विद्यार्थ्यांना शिकवून मनुष्यबळ पुरवण्याचा अतिशय योग्य निर्णय घेतला असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी एखादी तरी जागतिक भाषा शिकावी, असे आवाहन राज्यपालांनी केले.

# शेतकरी व मजूर यांच्या आर्थिक उन्नतीसाठी नव संकल्पना राबवा : गोगावले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जवळपास २६५ योजनेच्या माध्यमातून प्रत्येक गावातील पात्र शेतकरी व मजूर यांना लाभ उपलब्ध करून दिला जात आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून रोजगार हमी योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकरी व मजुरांना उपलब्ध व्हावा तसेच त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी रोजगार हमी योजनेत नव संकल्पना राबवाव्यात, असे आवाहन राज्याचे रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खार भूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी केले.



नियोजन भवन येथील सभागृहात आयोजित जिल्ह्यातील रोजगार हमी योजनाच्या कामांचा आढावा रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी घेतला, याप्रसंगी त्यांनी मार्गदर्शक सूचना दिल्या. यावेळी अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ चे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे, क्रमांक २ चे संतोष कुलकर्णी, पंढरपूरचे अमित निमकर यांच्या सह संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

रोहयो मंत्री श्री गोगावले पुढे म्हणाले की, योजना राबवत असताना कामाविषयी तक्रारी होत असतात, परंतु अधिकाऱ्यांनी तक्रारी होत आहेत म्हणून रोजगार हमीचे कामे उपलब्ध करून न देणे हे चुकीचे आहे. तरी अधिकाऱ्यांनी याविषयी अधिक सजग भूमिका घेऊन प्रत्येक गावात म जूर व शेतकऱ्यांना रोजगार हमीचे कामे उपलब्ध करून दिली पाहिजेत. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभा असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

रोजगार हमी योजनेअंतर्गत कुशल कामाची २६०० कोटीची मजुरी तर अकुशल कामाचे बाराशे कोटी केंद्र शासनाकडे थकीत होते. त्या अनुषंगाने केंद्रीय कृषिमंत्री यांच्याशी चर्चा झालेली असून त्यातील व अकुशल कामाचे बाराशे कोटी रुपये राज्याला प्राप्त झालेले असून तो निधी सोमवारपासून प्रत्येक जिल्ह्याला वितरित करण्यात येणार आहे. तरी हा वितरित झालेला निधी तात्काळ संबंधित मजुरांच्या बँक खात्यावर जमा करावा व उर्वरित २६०० कोटीचा निधीही पुढील आठवड्यात राज्य शासनाकडे प्राप्त होईल, अशी माहिती रोहयो मंत्री श्री. गोगावले यांनी यावेळी दिली. तसेच ६०: ४० अंतर्गत स्थगिती दिलेल्या कामांनाही लवकरच सुरू करण्याबाबत मान्यता देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी उपजिल्हाधिकारी रोहयो अंजली मरोड यांनी सोलापूर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध यंत्रणामार्फत सुरू असलेल्या कामांची माहिती दिली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी कृषी विभागांतर्गत सुरू असलेल्या काम काजाची माहिती देऊन फळ उत्पादनात सोलापूर जिल्ह्याचे काम चांगले असून जिल्हा केळी निर्यातीत आघाडीवर असून लवकरच उत्पादनात ही जळगाव जिल्ह्याला मागे टाकेल असे सांगितले. तर भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेअंतर्गत रोजगार हमी योजना कामांचा २६ कोटीचा निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

# उध्दव व राज ठाकरे युतीचा महापालिका निवडणुकीवर परीणाम होणार नाही

राजकारणात आणि खेळात कधी काहीही घडू शकते. त्यामुळे राज ठाकरे व उध्दव ठाकरे दोन्ही भाऊ एकत्र आल्यास चांगली बाब आहे. शिवसेना व सत्ता टिकविण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सक्षम आहेत. महाराष्ट्र धर्म वाढविण्यासाठी राज ठाकरे यांनी महायुतीत सामील होण्याचे आवाहन फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी केले. सोलापूर येथील शिवसेना भवन येथे आयोजित पत्रकार परीषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार सुभाष देशमुख, शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष काळजे, प्रवक्त्या ज्योतीताई वाघमारे आदि उपस्थित होते.



मंत्री गोगावले पुढे म्हणाले कि , दोनही ठाकरे बंधू एकत्र आल्यास सध्या मुंबई व इतर म हापालिकेत महायुतीला फटका बसणार नाही. त्यांच्या पक्षातील अनेक पदाधिकाऱ्यांचे महायुतीतील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्षात इन्कमिंग सुरू आहे. त्यामुळे भविष्यात शिवसेनेला उज्वल भविष्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे परदेशातील प्रमुखांबरोबर इंग्रजीतच चर्चा करीत असतात, त्यामुळे संजय राऊत यांची वायफळ टिका आहे. बडबड करायला विषय नसल्यामुळे ते गृहमंत्री अमित शहा व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टिका करीत आहेत.आदित्य ठाकरे यांच्या वागणूकीला कंटाळून मुंबईमधील अनेक नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करीत आहेत. त्यामुळे आदित्य ठाकरेंनी आम्हाला शिकवू नये. बीडमधील घटना दुर्दैवी असून सर्व दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. भाजप व शिवसेना हिंदुत्वाच्या मुद्याबरोबर मराठी भाषेच्या संरक्षणासाठी सदैव काम करीत असल्याचे मंत्री गोगावले 'यांनी सांगितले.

# सीपीएमच्या अस्तित्वाच्या प्रश्नाचे बेबींसमोर आव्हान!

## प्रासंगिक

**राहुल गोखले**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (सीपीएम) राजकीय भवितव्य काय, याची चिंता आता त्या पक्षाचे नवे सरचिटणीस मरियम अलेक्झांडर बेबी या ७१ वर्षीय नेत्याला करावी लागेल. मदुराई येथे नुकत्याच झालेल्या पक्षाच्या अधिवेशनात बेबी यांची निवड सरचिटणीसपदी करण्यात आली. अर्थात त्यांची ही निवड एकमताने झालेली नाही. पॉलिट ब्युरोमधील पश्चिम बंगालच्या सदस्यांचा कल महाराष्ट्रातील डावे नेते अशोक ढवळे यांच्या गळ्यात ती माळ पडावी याकडे होता. पण बेबी यांच्या पारड्यात बहुतांशी मते पडली आणि ते त्या पदावर निवडून गेले. याचे एक कारण हेही आहे की, बेबी केरळमधील आहेत आणि संपूर्ण देशात डाव्यांची सत्ता आता केवळ केरळपुरती मर्यादित झाल्याने पॉलिट ब्युरोमध्ये केरळचा वरचष्मा असणे स्वाभाविक. त्याची एक खूण हीदेखील आहे की, वयाची पंचाहत्तरी ओलांडलेल्यांना पॉलिट ब्युरोमधून निवृत्त करण्याचा प्रघात असल्याने माजी सरचिटणीस प्रकाश करात प्रभृतींना निवृत्त करण्यात आले तरी केरळचे ८० वर्षीय मुख्यमंत्री पी. विजयन यांचा मात्र अपवाद करण्यात आला. बेबी हे प्रारंभी विजयन यांचे पक्षांतर्गत विरोधक असले, तरी आता त्यांनी विजयन यांच्याशी जुळवून घेतले आहे. आता बेबी यांना सीपीएम पक्षाची केवळ केरळपुरती समीकरणे पाहून चालणार नाही. सीपीएम पक्षाच्या अस्तित्वाचाच प्रश्न उभा राहिला असल्याने त्यांना त्या संकटाशी लगेचच भिडावे लागेल. मुद्दा ते नेमके हे कसे करणार हा आहे.

डाव्या पक्षांना देशभरात सरसकट कधीच जनाधार लाभलेला नव्हता. तथापि, पश्चिम बंगाल, त्रिपुरा आणि केरळ ही तीन राज्ये बराच काळ डाव्यांचे बालेकिल्ले होते. त्या बळावर ते केंद्रातील काँग्रेस किंवा तिसऱ्या आघाडी सरकारला वेठीस धरत असत. परंतु पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने डाव्यांच्या सत्तेला सुरुंग लावला आणि कधी स्वबळावर तर कधी काँग्रेसशी आघाडी करूनही डाव्यांना आपले पूर्वीचे स्थान प्राप्त करता आलेले नाही. याचे एक कारण म्हणजे त्या पक्षाने पश्चिम बंगालमध्ये वाढविलेली आपली सत्ताकेंद्रित संघटना. संघटनेला तळागाळात स्थान होते हा आभास सत्ता गेल्यानंतर संघटनेत आलेल्या विस्कळीतपणाने आणि कमकुवतपणाने अधोरेखित केला. त्रिपुरा तुलनेने छोटे राज्य. पण तेथे मतदारांनी भाजपाला सत्ता दिली आणि डाव्यांचा गाशा गुंडाळला. आता उरले केरळ. तेथे काँग्रेसप्रणीत आघाडीशी डाव्या आघाडीची थेट लढत आहे. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसची सलगी आणि केरळमध्ये काँग्रेसशी उभा दावा अशा पेचात डावे आहेत. गेल्या विधानसभा निवडणुकीत (२०२१) विजयन यांच्या नेतृत्वाखाली डाव्यांनी सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळविली हे खरे; पण आता पुढच्या वर्षी होणाऱ्या निवडणुकीत डाव्यांना त्याची पुनरावृत्ती करण्यात यश येईल का, याबद्दल साशंकता आहे. याचे कारण गेल्या वर्षी (२०२४) झालेल्या लोकसभा निवडणुकीत केरळमध्ये काँग्रेसने बजावलेली लक्षणीय कामगिरी. २० पैकी १८ जागा काँग्रेसप्रणीत आघाडीने जिंकल्या होत्या. त्यात काँग्रेसचा १४ जागांचा वाटा होता. पुढील वर्षी पश्चिम बंगाल आणि केरळ या दोन्ही राज्यांत विधानसभा निवडणुका होणार आहेत. बेबी यांची तीच पहिली कसोटी असणार आहे.

डाव्यांची ही इतकी केविलवाणी घसरण का झाली, याचे आत्मपरीक्षण त्या पक्षाच्या नेतृत्वाने करायला हवे. बेबी यांनी तर आवर्जून करावयास हवे. या घसरणीचे एक कारण म्हणजे जनतेपासून तुटलेली नाळ. दुसरे तितकेच महत्त्वाचे कारण म्हणजे



अकारण आणि अवाजवी वैचारिक अहंगंड आणि परिणामतः केलेल्या अनेक घोडचुका. १९९६ साली तिसऱ्या आघाडी सरकारचे नेतृत्व सीपीएमचे वरिष्ठ नेते ज्योती बसू यांनी करावे असा प्रस्ताव पुढे आलेला असताना प्रकाश करात, सीताराम येचुरी, इ. के. नायनार, व्ही. एस. अच्युतानंद अशांनी त्या प्रस्तावास खोडा घातला. त्यानंतर काही काळाने बोलताना स्वतः बसू यांनी ती घोडचूक असल्याचे कबूल केले होते. २००८ साली केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी (यूपीए) सरकारने अमेरिकेशी अणुकरार करण्याचा प्रस्ताव आणला तेव्हा सीपीएमने त्या सरकारला वेठीस धरले होते; एवढेच नव्हे तर लोकसभा सभापती असलेले सीपीएम पक्षाचे सोमनाथ चॅटर्जी यांनी पदाचा राजीनामा द्यावा, असा दबाव आणला होता. पण सभापतिपद हे पक्षातीत असते, अशी भूमिका घेत चॅटर्जी यांनी पक्षादेश मानण्यास नकार दिला तेव्हा त्यांची पक्षाने हकालपट्टी केली. विचारधारेच्या अहंगंडांतून झालेली ती कारवाई होती. अणुकरार संसदेत मंजूर झाला. मात्र परिणाम झाला तो पुढील निवडणुकीत डाव्यांच्या कामगिरीवर.

२००४ सालच्या लोकसभा निवडणुकीत ४३ जागा जिंकणाऱ्या सीपीएमचा आलेख २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ हा अनुक्रमे १६, ९, ३ व ४ असा कमालीचा घसरत गेला आणि मतांचे प्रमाण दीड-दोन टक्क्यांवर येऊन ठेपले आहे.

आताही सीपीएम पक्षाचा कल पक्षबांधणी आणि विस्तारापेक्षा भाजपा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर शरसंधान करण्यात धन्यता मानण्याकडेच आहे. मदुराई अधिवेशनात बोलताना स्वागत समितीचे अध्यक्ष के. बालकृष्णन यांनी तामिळनाडूने भाजपा किंवा संघाला कसे नाकारले आहे, याच्या कथा रंगविल्या. वास्तविक संघाचा विस्तार तामिळनाडूत अनेक वर्षे होत आहे. भाजपाला जागा जिंकता येत नसल्या, तरी २०१९ च्या तुलनेत भाजपाला मिळालेल्या मतांच्या प्रमाणात २०२४ साली साडेसात टक्के वृद्धी झाली आहे. सीपीएमने द्रमुक आघाडीचा घटक पक्ष म्हणून निवडणुका लढविल्या आणि त्या पक्षाला अवघ्या दोन जागा जिंकता आल्या. तेव्हा खरे तर सीपीएमचा भर हवा तो आपल्या पक्षाचा जनाधार का घटतो आहे, याचे मंथन करण्यावर; त्याऐवजी त्या पक्षाला समाधान आहे ते भाजपाला तामिळनाडूत जागा जिंकता आल्या नाहीत याचे. पण त्याच भाजपाने केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली आहे आणि डाव्यांसमोर राजकीय भवितव्याचे संकट उभे राहिले आहे, याचे बालकृष्णन यांना सोयीस्कर विस्मरण झाले. प्राधान्य पक्षबांधणीला द्यायचे की भाजपाला कोणत्या राज्यात अपयश येते हे दुरून पाहण्यात आनंद मानण्यास याची निवड बेबी यांनी करायची आहे.

जगभरात डाव्यांचा सत्ताप्रभाव ओसरत आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण याचा परिणाम डाव्यांच्या पारंपरिक वैचारिक आधारांना धक्का देण्यात झाला आहे. दुसरीकडे स्थलांतरितांच्या मुद्यापासून राष्ट्रवादाच्या मुद्यापर्यंत डाव्यांच्या विचारसरणीला जनता जगभरात विरोध करीत आहे. अमेरिकेपासून जर्मनीपर्यंत डाव्यांना निवडणुकीत दणका बसला आहे आणि उजव्या विचारसरणीला वाढता जनाधार लाभत आहे. भारत म्हणजे रशिया किंवा चीन नव्हे. डाव्यांच्या जगभरात ओसरत असलेल्या प्रभावातून बोध घेऊन आपल्या वैचारिक मांडणीचा पुनर्विचार करायचा की त्याच रूढी-प्रियतेत अडकायचे, याचा विचार सीपीएम आणि बेबी यांना करायचा आहे. पश्चिम बंगालमध्ये डाव्यांचे सत्तेत पुनरागमन होण्याची शक्यता धूसरच. केरळही हातचे गेले तर देशभरात कोणत्याही राज्यात सत्तेत नसलेला पक्ष असा सीपीएमचा लौकिक होईल. अशा पक्षाचे पुढे नेमके काय करायचे हा सवाल बेबी यांना आजपासूनच सतावत असणार. निवडणुकीतील यशापयश हा पक्षाच्या आणि विचारधारेच्या स्वीकारार्हतेचा महत्त्वाचा निकष असतो, यात शंका नाही. तथापि तो एकमेव निकष नव्हे. मुळात ज्या विचारधारेवर पक्ष चालतो त्या विचारधारेची प्रासंगिकता उरली आहे का की तिचा पुनर्विचार आणि शक्य तर पुनर्मांडणी करणे अगत्याचे हा पक्ष नेतृत्वाचा कस आणि धमक यांची परीक्षा पाहणारा निकष. बेबी ती धमक दाखविणार का यावर त्यांचे आणि सीपीएमचे राजकीय भवितव्य अवलंबून आहे.

९८२२८२८८१९

# वाचनसंपन्न होण्यासाठी...

## साहित्य

**अर्चना कुडतरकर**

भाषा, पुस्तके आणि साहित्यिक ही सगळी वाचनाशी संबंधित असणारी अंगे एकत्र येण्याचा आणि सुरेख संगम साजरा करण्याचा अलिकडचा योग सुखावणारा आहे. यातील परस्परसंबंध आणि वाचनानंद वाचकांसाठी कोणकोणत्या अंगाने महत्त्वपूर्ण असतो, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. जगण्यावर आणि जगण्याच्या पद्धतीवर प्रभाव टाकणारी ही माध्यमे जगण्याचे एक अविभाज्य अंग आहेत. त्यामुळे या योगाचे औचित्य न साधणे हे करंटेपणाचे लक्षण ठरेल.

वाचनाची प्रक्रिया बाह्य कृतीप्रमाणेच अंतर्गत पातळीवरही होत असते. म्हणजेच वाचन करताना आनंद मिळतो; त्याचबरोबर मनावरही आपसूक परिणाम होतो. ही संपूर्ण प्रक्रियाच भावनांचे विरेचन होण्यासाठी साह्यभूत ठरते. एका अर्थी वाचन हा वाचकाचा एक अंतर्गत प्रवास असून साहित्यकृती, पुस्तके यांना समांतर जाणारा असतो. त्यामुळे वाचनाचा वाचकाच्या मनावर दीर्घकालीन परिणाम होतो. यातून मनातील द्वंद्व, आनंद वा अशा कोणत्याही भावना अभिव्यक्त होत राहतात. भले ही अभिव्यक्ती मनातल्या मनात असली, तरी त्याचा प्रभाव जाणवल्याखेरीज राहत नाही. नाटक, चित्रपट यासारख्या प्रयोगशील कला पाहताना पडद्यावरील दृश्य पाहून आपल्या आयुष्यातही याला समांतर काही घडत असल्याचा विचार मनात येत असतो आणि तशीच काहीशी प्रक्रिया वाचनावेळीही घडत असते. कथा, कादंबरी, कविता आदी वाचताना त्याबद्दल आपल्यालाही काही म्हणायचे आहे, असे वाटते आणि मनोमन त्या साहित्यकृतीशी बंध जुळतात. कातरवेळी हमखास अशा ओळी स्मरतात आणि साहित्यसंबंध दृढ होतो, अधिक जवळचा वाटतो.

हाच धागा हाती घेत बोलायचे तर अरविंद गोखले यांची 'कातरवेळ' नामक कथा मला प्रत्येक कातरवेळी आठवते आणि वाचलेल्या गोष्टी किती प्रदीर्घ काळ मनात टिकून असतात, याचा साक्षात्कार होतो. या कथेतील 'आक्का' नवविवाहित आहे. सासरी रमू पाहत आहे. अशातच माहेरपणाला आल्यानंतर घरात फिरताना तिला बालपणीचे दिवस आठवतात. मनात कोपऱ्या-कोपऱ्यातल्या आठवणींची गर्दी होते. असेच काही शोधत असताना इतिहासाचे पुस्तक आणि त्यात ठेवलेले पान तिच्या हाती लागते आणि याच टप्प्यावर कथा कलाटणी घेते. पात्राबरोबरच वाचकांचे मनही फिरते, कारण नकळत वाचकांनाही आपल्या कातरवेळेचा प्रवास नायिकेच्या प्रवासाशी समांतर असल्याचे जाणवत असते. इतिहासाच्या पुस्तकात जपलेल्या तिच्या आठवणी त्यांना आपण जपलेल्या गोष्टींचे स्मरण करून देत असतात. हा अनुभव समांतर असला, तरी वेगवेगळा असतो. पण तोच वाचकाला सर्जनशील बनवतो आणि हेच महत्त्वाचेही असते. कारण शेवटी वाचन हीदेखील एक सर्जनशीलता असते, असे आपण म्हणतो. असे असल्यामुळेच आपण एखाद्या कलाकृतीचा अर्थ लावतो, अर्थनिर्णयातून शिकतो आणि स्वत:ला उन्नत करतो. स्वाभाविकच ही प्रक्रिया साहित्यकृतीलाही उन्नत करून जाते. अशा एक ना अनेक साहित्यकृती आज वाचकांच्या भावविश्वात महत्त्वपूर्ण स्थान राखून आहेत.

वैशिष्ट्य म्हणजे वयाच्या एकेका टप्प्यानुसार वाचलेल्या साहित्याचे वेगवेगळे आकलन होते. म्हणजेच एखादी कथा लहानपणी वाचली तर वेगळा अर्थ निघतो, पण तीच कथा प्रौढावस्थेत वाचली तर वेगळा अर्थ समोर येतो. आपल्या म्हणायचे आहे ते म्हणता येत नसताना असे साहित्य, पुस्तके व्यक्त होण्यास साथ देतात. वाचनातून दर वेळी पुन:प्रत्ययाचा आनंद मिळतो. तो अनुभवण्याच्या निमित्ताने एक विश्व निर्माण होते. जगताना अनेक अनुभवांना सामोरे जात ते कसे स्वीकारायचे, कसे हाताळायचे, कसे वागायचे अशा एक ना अनेक गोष्टींचे भान वाचनातून मिळते. म्हणूनच वाचकांनी 'क्रिएटिव्ह रीडिंग'चा ध्यास धरला पाहिजे, असे वाटते.



लेखिका सानियाच्या बऱ्याच कथांमधून मनाचा धांडोळा घेणे विशेष भावायचे आणि मनाच्या खूप आतपर्यंत चाललेले सगळे सुंदर पद्धतीने शब्दबद्ध करण्याची तिची हातोटीही आवडायची. यातूनच अशा प्रकारे आपल्यालाही भावना शब्दबद्ध करता येतील का, हा विचार मनात डोकावला आणि मी लेखन, संपादनाकडे वळले. म्हणूनच वाचनातून आपल्याला एखादा बिंदू सापडतो असे वाटते. वाचन भावना अभिव्यक्त करण्याचे, त्या पडताळून पाहण्याचे माध्यम असते तसेच ते स्वत:ला अभिव्यक्त करायलाही शिकवते. मग ते बोलण्यातून, लिखाणातून वा अन्य माध्यमातून असेल... मात्र वाचनाने माणूस अभिव्यक्त होतो, ही बाबही मला अत्यंत महत्त्वाची वाटते. या अर्थाने पुस्तके आपल्याला चांगला हात देतात आणि पुढे नेतात. त्या पात्रांमध्ये आपण गुंततो, त्यांच्याबरोबर फिरतो. जसे की, 'तुंबाडचे खोत' वाचताना मी त्यातील पात्रांबरोबर फिरले. त्यामुळे प्रत्यक्ष पाहिलेले नसले तरी पेंडसे यांनी या कादंबरीतून साकारलेल्या हर्णे बंदर आणि त्याच्या आसपासच्या परिसराचे चित्र डोळ्यासमोर उभे राहिले. प्रत्यक्ष तिथे गेल्यानंतर त्या अनुभवाच्या पुन:प्रत्ययाचा आनंद अर्थातच खूप मोठा होता. म्हणूनच केवळ पुस्तक दिनाच्या निमित्तानेच नव्हे तर प्रत्येकाने दररोज काही ना काही वाचायला हवे. हे सगळे अनुभव घेतले पाहिजेत.

लोकांना वाचनाची गोडी लावण्यासाठी आज अनेक उपक्रम राबवले जातात. 'पुस्तकांचे गाव' ही त्यातूनच पुढे आलेली संकल्पना होती. आता रत्नागिरीमध्ये अशाच पद्धतीने उपक्रम राबवण्याचा प्रयत्न चर्चेत आहे. मात्र असे प्रयोग दोन-चार जिल्ह्यांमध्ये होण्यापेक्षा प्रत्येक शहर, गावामध्ये, तालुका पातळीवर व्हायला हवेत. तसे झाल्यास त्याचा अधिक फायदा होईल. मध्यंतरी चंद्रपूरमधील एका छोट्या गावात राहणाऱ्या मुलाशी बोलणे झाले. तो पुस्तकांसाठी आसुसलेला होता. त्याला भरपूर वाचायचे होते. ओघात तो म्हणाला, कादंबरी नावाचा साहित्यप्रकार अस्तित्वात असल्याचे मला पुण्यात आल्यावर समजले. तेव्हा मी २२ वर्षांचा होतो...! हे ऐकून मनात चर्रर... झाले. आपल्याकडील वास्तव समोर आणण्यासाठी हे एक उदाहरणच पुरेसे आहे. त्यामुळे पुस्तक दिनी तरी यावर गांभीर्याने विचार होणे गरजेचे वाटते.

मुलांसाठी वेगळी वाचनालये असणे आणि त्यात केवळ मुलांसाठीचे साहित्य असणेही गरजेचे आहे, कारण अनेकदा बाल गट, शिशू गट, कुमारवयीन मुले, पौंगडावस्थेतील मुले यांच्यासाठी असणाऱ्या साहित्यातील फरक कळत नाही. म्हणूनच हे वेगवेगळे विभागून पुरवल्याचा चांगला परिणाम बघायला मिळू शकतो. यातून मुले वाचनाचे वेगवेगळे टप्पे सहज ओलांडतील आणि त्यांना वाचनाची गोडी लागेल. 'प्रथम'ने अशा प्रकारे एक पुस्तक चळवळ चालवली होती. पण तिचा आवाका कमी होता. लोकसहभाग वाढला तर अशा चळवळींची संख्याही वाढेल. अलिकडील पुस्तक महोत्सवात आम्ही मुलांसाठी नाट्यछटा, कथेची पुस्तके १० रुपयांमध्ये उपलब्ध करून दिली होती. तेव्हा ग्रामीण भागातील शिक्षक विद्यार्थ्यांसाठी पदरमोड करून ती घेऊन जात होते. हे चित्र निश्चितच सकारात्मक आहे.

**आठवण विल्यम शेक्सपिअरची**

विल्यम शेक्सपिअर हे जागतिक कीर्ती मिळवलेले नाव. त्यांनी लिहिलेल्या साहित्यकृती वाचण्याचा अनुभव घेता आला नसला, तरी सदानंद रेगे वा त्यांच्यासारख्या मंडळींनी शेक्सपिअर यांच्या नाटकांचे केलेले स्वैर रूपांतर वाचनात आले. त्यांच्या साहित्यामध्ये अनेक नात्यांचे गुंते तसेच मनाचा वेध घेतलेला दिसतो. नात्यांचा मानसशास्त्रीय आढावा घेत त्यांनी केलेले लेखनही भावनांचे विरेचन करणारे आहे. मानसशास्त्राचे शिक्षण घेताना मी हा अनुभव घेतला आहे. आपल्याकडे अशा प्रकारचे साहित्य नव्हते. अर्थात हा संस्कृतीमधील बदलाचा परिणाम आहे. यात दोहोंची तुलना करण्याचा हेतू नाही, पण संस्कृती, प्रतीके वेगळी असल्यामुळे शेक्सपिअरच्या साहित्याने आपल्याला नेहमीच वेगळा अनुभव दिला, हे नाकारून चालणार नाही. एकीकडे असे असताना आपण इंग्रजी भाषा दिनही साजरा करत आहोत. या भाषेतील साहित्यामधूनही आपल्याला वेगळ्या संस्कृतीचा परिचय होतो. मानवी स्वभावाचा वेगळा अनुभव मिळतो. मराठी मनावर तर इंग्रजीचा मोठा प्रभाव आहे. आपल्याकडील अनेकांनी इंग्रजीतून केलेले लेखनही महत्त्वपूर्ण आहे. त्याची दखल घ्यायलाच हवी.

## रविवारची पत्रे

### तरुण भारतमधील खांदेपालट

श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेच्या वतीने गेल्या पंचाहत्तर वर्षांपासून नागपुरातून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी नागपुरातील ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक शैलेश पांडे यांची नियुक्ती तरुण भारत परिवारात नवचैतन्य निर्माण करणारी आहे. आतापर्यंतचा अनुभव असा आहे की, तरुण भारतचे मुख्य संपादक स्व. भाऊसाहेब माडखोलकर यांचा अपवाद वगळता वयाची साठ वर्षे पूर्ण होताच तरुण भारतचे संपादक निवृत्त होतात. आदरणीय स्व. मा. गो. वैद्य यांनीच ही परंपरा सुरू केली. मा. गो. संपादकपद भूषविण्यासाठीच हिस्लॉप कॉलेजमधील जास्त पगाराची नोकरी सोडून तरुण भारतमध्ये रुजू झाले होते. पण ते भाऊसाहेब माडखोलकरांच्या निवृत्तीनंतर लगेच मुख्य संपादक झाले नाहीत. भाऊसाहेबांसोबत कार्यकारी संपादक असलेले स्व. तात्यासाहेब करकरे यांना प्रथम मुख्य संपादक करा, त्यानंतर मी ते पद स्वीकारीन अशी भूमिका त्यांनी घेतली व तात्यासाहेब करकरे यांच्या वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मुख्य संपादकपद स्वीकारले. एवढेच नाही तर स्वतःची वयाची साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर लगेच ते पद सोडले.

मागोंनंतर मुख्य संपादक झालेले स्व. मामासाहेब घुमरे म्हणजे तभा सहकाऱ्यांचे मायपोट. कुणालाही, कोणतीही अडचण आली तर तो मामासाहेबांकडे गेला की, समस्या सुटली म्हणून समजा अशी मामासाहेबांची भूमिका राहत असे. तटस्थ तरीही खंबीर संपादक कसा असावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे मामासाहेब. त्यांनीही साठ वर्षांचा नियम कटाक्षाने पाळला. तरुण भारतचे सगळे कर्तेधर्ते आणिबाणीच्या काळात मिसाबंद झाले असताना मामासाहेबांनी संयमपूर्वक तरुण भारतचा सांभाळ केला. साठ वर्षानंतरच्या निवृत्तीची भूमिका स्व. वामनराव तेलंग यांच्या निवृत्तीनंतर मुख्य संपादक झालेले सुधीर पाठक यांनीही घेतली. खरे तर त्यांच्या निवृत्तीची तारीख साठ वर्षांनंतरची होती. आणखी काही काळ ते मुख्य संपादक राहू शकले असते. पण साठ वर्षे पूर्ण होताच निवृत्त होण्याचा आग्रह त्यांनी धरला व तो अंमलातही आणला.

त्यांच्यानंतर गजानन निमदेव हे मुख्य संपादक झाले. तेही या नियमाला अपवाद राहिले नसते, पण त्यांची विभागीय माहिती आयुक्त म्हणून राज्य सरकारने नियुक्ती केल्याने त्यांना तरुण भारतच्या जबाबदारीतून मुक्त व्हावे लागले. मेहकरसारख्या गावातून येऊन त्यांनी तरुण भारतच्या माध्यमातून केलेल्या कार्यामुळे त्यांना मुख्य संपादक होता आले ही त्यांच्यासाठी अभिनंदनीय बाबच होती. आता नवी मोठी जबाबदारी आल्याने त्यांना जड अंतःकरणानेच तरुण भारतचा निरोप घ्यावा लागत आहे. आपली नवीन जबाबदारीही ते यशस्वीपणे पार पाडतील असा विश्वास व्यक्त करीत मी त्यांना शुभेच्छा देतो.

आता त्यांच्या जागी शैलेश पांडे याची नियुक्ती झाली आहे व त्यानुसार ते सोमवारी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारणार आहेत. शैलेश पांडे हे तरुण भारतसाठी नवीन नाहीत आणि त्यांच्यासाठीही तरुण भारत नवीन नाही. आजही ते डिजिटल तरुण भारतचे संपादक म्हणून कार्य करीत आहेतच, पण आता मुद्रित दैनिक सांभाळण्याची मोठी जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे. ती ते यशस्वीपणे सांभाळतील याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. कारण ते नागपूर, विदर्भाच्या मातीत मुरलेले पत्रकार आहेत. बराच काळ त्यांनी तरुण भारत आणि इतरही दैनिकांची जबाबदारी सांभाळली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे माध्यम सल्लागार म्हणूनही ते कार्यरत होते. शिवाय मराठी व हिंदीमधून त्यांची पुस्तके प्रकाशित झाल्यामुळे साहित्यिक म्हणूनही सर्वज्ञात आहेत. आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन कार्य करण्याची हातोटीही त्यांच्या ठायी आहे. बहुमुखी प्रतिभेचे धनी ही त्यांची ओळख आहे. पत्रकारितेसाठी आवश्यक असलेली अभ्यासू वृत्ती त्यांच्या लेखनातून नित्य अधोरेखित होत असते. त्यांच्या नेतृत्वाखाली तरुण भारत नक्कीच प्रगतीची नवीन शिखरे गाठील असा विश्वास व्यक्त करून मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो व शुभेच्छाही देतो.

**ल. त्र्यं. जोशी**/माजी मुख्य संपादक,
तरुण भारत, नागपूर

### शाळा, कॉलेजमधील भयानक वास्तव

''मॅडम, अकरावीला ॲडमिशन करायची आहे.''

''ठीक आहे, कोणते विषय घ्यायचे आहेत तुला? फॉर्म भरून दे, फी भरून ॲडमिशन घे.'' ॲडमिशन काऊंटरवर बसलेल्या मॅडम म्हणाल्या.

''हो मॅडम, पण मला झीरो अटेण्डन्सवाली म्हणजे डमी ॲडमिशन घ्यायची आहे. तुमच्या कॉलेजमध्ये मिळेल नं?''

आजकाल सगळ्याच ठिकाणी नित्य घडून येणारा हा संवाद. ज्युनिअर कॉलेजमध्ये नोकरी करत असताना गेल्या काही वर्षांपासून जन्माला आलेला हा संवाद आता दरवर्षी जोमाने वाढीला लागलाय. शिक्षण क्षेत्रात गेली तीस वर्षे मी काम करीत आहे. इतक्या वर्षांत मी हे क्षेत्र फार जवळून बघितलंय. ज्या पद्धतीने मागील चार पाच वर्षांत शिक्षण क्षेत्र बदलतंय तसं पूर्वी कधीच नव्हतं आणि नसणार असं मला वाटतं.

पूर्वी बारावीनंतर मेडिकल, इंजिनीयरिंग किंवा कुठल्याही तत्सम ग्रॅज्युएशनसाठी कोणतीही स्पर्धा परीक्षा नसायची. बारावीच्या मार्कांच्या आधारेच सगळे प्रवेश होत असत. १९९८ नंतर मेडिकलच्या सीईटी परीक्षेला सुरुवात झाली. नंतर इंजिनीरिंगचे प्रवेश सुद्धा या परीक्षेतूनच व्हायला लागले. जरी प्रवेश परीक्षा आल्या तरी बारावी बोर्डाच्या मार्कांना महत्त्व होते. त्यामुळे प्रवेश परीक्षेसोबतच बोर्डाच्या परीक्षेकडेही विद्यार्थी लक्ष देत असत. त्यासाठी शाळा, कॉलेजमध्ये त्यांची नियमित उपस्थिती राहत असे. प्रायव्हेट ट्युशन्स लावून, शिवाय कॉलेजमध्ये रेगुलर क्लासेस करून मुलं ही तयारी योग्य पद्धतीने करत असत.

हळूहळू कोचिंग क्लासेसचा जमाना आला. एकाच छताखाली सगळे विषय शिकवण्याची पद्धत सुरू झाली. सुरुवातीला लोकांनी त्याला विशेष रिस्पॉन्स दिला नाही. कारण एका कोचिंगच्या सगळ्याच शिक्षकांचे शिकवणे चांगले राहत नसे. मग जो विषय समजत नाही तो विषय फक्त बाहेर लावून बाकीचे विषय कोचिंग क्लासमध्ये शिकण्याकडे कल वाढला. तरीही बरेच विद्यार्थी शाळा, कॉलेजात येत असत. वर्षभर होणाऱ्या सगळ्या परीक्षा, विविध उपक्रम यात भाग घेत असत.

२०१४-१५ नंतर परीक्षा, परीक्षांची पद्धत सुरू झाली. राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या या कठीण परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी मात्र हळूहळू खाजगी शिकवणीकडे पाठ फिरवणे सुरू केले. कोचिंग क्लासेसमध्ये सुरुवातीला चार पाच तास विद्यार्थ्यांना जावे लागे. तरी पण सगळेच विद्यार्थी काही या परीक्षा देत नसत. त्यामुळे काही विद्यार्थी सोडता बाकी विद्यार्थी कॉलेजमध्ये हजेरी लावत असत. मध्यंतरी या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठमोठ्या महानगरांमध्ये, नागपूर, पुणे, मुंबई, कोटा किंवा हैदराबादला नावाजलेल्या कोचिंगमध्ये मुलांना पाठवण्याची होड लागली. तिथे दिवसातले आठ आठ, दहा दहा तास मुलांना शिकवणे, प्रॅक्टिस करून घेणे सुरू असते. त्यात काही मुलं यशस्वीही होतात. पण काहींच्या बाबतीत अगदी निराशाही पदरी पडते. अशी ही मुलं मग स्थानिक शाळा, कॉलेजमध्ये नॉमिनल ॲडमिशन घेऊन ठेवत. आणि बोर्डाच्या परीक्षेच्या एक दीड महिना आधी येऊन प्रॅक्टिकल आणि लेखी परीक्षा देत असत. पण हे प्रमाण त्यावेळी बरेच अल्प असे.

कोरोनाची साथ आली. दोन वर्षे सगळे जण घरात बसले. साथीनंतर जेव्हा सगळे सुरू झाले तेव्हा मुलांना बाहेर पाठवण्यासोबतच शहरातल्याच कोचिंग क्लासेसमध्येही पाठवणे सुरू झाले. छोट्या शहरातील कोचिंग क्लासेस सुद्धा आता महानगरातील कोचिंगचं अनुकरण करायला लागलेय. स्पर्धेच्या या युगात प्रत्येकच पालक आपल्या पाल्याला या दौडीत भाग घ्यायला लावतोय. त्यासाठी कोचिंगवाले जे म्हणतील ते करण्याकडे कल वाढत चाललाय. या कोचिंग क्लासेसच्या चालकांनी आता मोठ्या शहरांच्या क्लासेस प्रमाणेच आठ दहा तास शिकवणे आणि मुलांना अभ्यासाच्या नावाखाली अडकवून ठेवणे सुरू केले. मग त्याचे पर्यवसान मुलांनी फक्त आणि फक्त कोचिंगच करावे यात होऊ लागले. अजूनही काही कोचिंग क्लासेस असे आहेत जे शाळा, कॉलेजच्या वेळाचे भान ठेवून आपल्या वेळा ठरवतात, त्यानुसार बॅचेस बनवतात. पण अशा क्लासेसचे प्रमाण अत्यल्प आहे.

या सगळ्या गोष्टींचा परिणाम म्हणजे आता मुलांनी शाळा, कॉलेज, खेळ मैदानाकडे पूर्णपणे पाठ फिरवलीय. कोचिंगचे चालक आता पालकांना सांगतील त्याच शाळा, कॉलेजमध्ये विद्यार्थी प्रवेश घेऊ लागले. जे शाळा, कॉलेज विद्यार्थ्यांनाही झीरो अटेंडन्स आणि डमी ॲडमिशन देतील त्यांच्याकडेच ॲडमिशन घेण्याकरिता रांगा लागू लागल्या.

वरवर पाहता साधी वाटणारी ही गोष्ट जेव्हा कॉलेजची एक शिक्षिका म्हणून मी बघते तेव्हा मन हेलावून जातं. प्रत्येकच विद्यार्थी जर अशी डमी ॲडमिशन घेऊ लागला तर पुढे काय होणार? बऱ्याच लोकांना असं वाटतं की शाळा, कॉलेजमध्ये शिकवले जात नाही म्हणून मुलं बाहेर ट्युशन्स लावतात. पण सत्य परिस्थिती ही आहे की विद्यार्थी शाळेत आलेच नाहीत तर शिक्षक शिकवतील तरी कसे? विद्यार्थिसंख्या कमी झाली की शिक्षक कमी होणार, असलेल्या नोकऱ्या जाणार, शहरातील प्रायव्हेट शाळांचे हाल तर विचारूच नका, विद्यार्थ्यांशिवाय शाळा चालणार तरी कशा? प्रत्येकाने या भयानक वास्तवाची दाहकता ओळखण्याची गरज आहे.

**वीणा आचार्य**/९४२३१७५७१५

### ज्योतिष शास्त्राचे महत्त्व आणि दिव्यत्व

वेदस्य निर्मलम् चक्षुः ज्योतिः शास्त्रम् कल्मक्षम विनैतदखिलम् मोतरमार्त कर्म न सिद्ध तस्माज्जीहतायेदम् ब्रह्मणा रचिता पुरा

- नारद संहिता

ज्योतिष हा शब्द संस्कृतमधील ज्योती: शब्दापासून झाला असून ज्यापासून तेज वा प्रकाश उत्पन्न होतो अशा सूर्यादी घटकांचे ते दिग्दर्शक नाम होय. सूर्यादी नक्षत्र स्वयंप्रकाशी असून जीवसृष्टीवर तसेच यच्चयावत सृष्टीवरही ते परिणाम करतात. या ताऱ्याभोवती फिरणारे ग्रहसुद्धा प्रकाशमान होतात व त्यांची चुंबकीय प्रावरणे अत्यंत शक्तिशाली असतात. त्यामुळे या सर्वच ग्रहगोलांचा मनुष्यमात्रावर होणारा परिणाम ज्या शास्त्राद्वारे अभ्यासला जातो, त्याचप्रमाणे हे ग्रह, तारे व त्यांचे उपग्रह यांचे स्वरूपाविषयी, गतीविषयी, कक्षेविषयी सर्वंकष अभ्यास ज्यामध्ये केला जातो, ते हे ज्योतिषशास्त्र होय.

आपल्या सूर्यमालिकेतील समस्त ग्रह हे भारतीयांना देव, देवतांइतकेच परम पूजनीय आहेत. ही बाब आमच्या

ब्रह्मा, मुरारिस्त्रिपुरांतकारी भानुः शशी भूमिसुतो बुधश्च गुरुश्च शुक्रः शनि राहुकेतवः, कुर्वंतु सर्वे मम सुप्रभातम् या प्रातःस्मरणीय श्लोकातून स्पष्ट होते. त्यामुळेच आमच्या मौंज, विवाह, वास्तुशांती इत्यादी पूजा विधींमध्ये तसेच यज्ञ वा हवन कार्यामध्ये, नवग्रहांचे आवाहन, पूजन, उपासना आवश्यक कर्तव्य समजले जाते. महर्षी व्यासांनी तर या नवग्रहांची स्तोत्रे रचली आहेत. मुद्गलपुराण, ब्रह्मांडपुराण, पद्मपुराण, रुद्रयामल ग्रंथ, श्रीमद्भागवतम् इत्यादी प्राचीन ग्रंथात ग्रहांची वर्णने केलेली आहेत. इतकेच काय, पण स्वतः भगवान श्रीकृष्णानेच गीतेमध्ये अशी स्पष्ट घोषणा केली आहे की,

आदित्यानामहं विष्णू ज्योतिषाम् रवीरंशुमान मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्रामहम् शशी

महर्षी पाराशरांनी तर आपल्या सुप्रसिद्ध बृहतपाराशर होराशास्त्रम् या ग्रंथात अवतारकथनाध्याय हे संपूर्ण प्रकरण, दैत्यांच्या संहाराकरिता, सज्जनांच्या व देवांच्या रक्षणाकरिता, तसेच धर्मसंस्थापनेसाठी झालेले परमेश्वराचे सर्व अवतार हे वेगवेगळ्या ग्रहांपासून कसे झाले आहेत, त्याचे सुरेख व सविस्तर विवेचन रामोवतार सूर्यस्थ चंद्रस्य यदुनायकः नृसिंहो भूमिपुत्रस्थ, बुधः सोम सुतस्य च इत्यादी श्लोकांद्वारे केलेले आहे.

सद्यःकालीन खगोलशास्त्र हे ज्योतिषशास्त्राचेच अपत्य आहे. ज्योतिष हा विषय मानवाला नेहमीच उत्कंठावर्धक राहिलेला आहे. पूर्ण जगभर अभ्यासले जाणारे हे शास्त्र भारतीयांच्या तर जणू रक्तातच भिनलेले आहे. ज्योतिषशास्त्र हे नेहमीच विद्वानांच्या चर्चेचा विषय राहिलेले, पीडित मनुष्याचा आधार बनलेले, त्रस्त जीवांना आशा निर्माण करणारे, बुद्धिमान मनुष्यासाठी आकर्षण उत्पन्न करणारे, सामान्यांची उत्सुकता ताणणारे, काळाच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या हतबल जीवांना संजीवनी प्रदान करणारे, ईश्वरभक्तांना परम मार्गदर्शक ठरणारे, असे हे ज्योतिषशास्त्र वेदांचे एक अंग आहे. याला वेदचक्षू असेही म्हणतात. वेदांच्या सहा अंगांपैकी ज्योतिष हे एक अंग असले तरी इतर अनेक शास्त्रांपेक्षा ज्योतिषशास्त्राचे महत्त्व फार जास्त आहे. ही महती ऋग्वेद ज्योतिषाच्या सातव्या खंडात फार सुरेख वर्णन केली गेली आहे.

शेवटी एवढेच म्हणावे वाटते की, हे शास्त्र म्हणजे परमतत्त्वाशी जवळीक असलेले रहस्य आहे. आणि हे रहस्य जो जाणतो त्याला सर्व पुरुषार्थ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांची प्राप्ती होऊन तो जीवनाच्या आपल्या विशिष्ट क्षेत्रात यशस्वी तर होतोच, शिवाय आपले आयुष्य सुखा समाधानाने, आनंदाने समृद्ध करतो यात शंका नाही.

**मोहनशास्त्री जलतारे**/९८२२७११७३३

### देशात भेसळीचे वाढते प्रमाण चिंताजनक

नुकतेच सोशल मीडिया हाताळताना समाजाच्या दृष्टीने जागृती करणारा एक महत्त्वाचा व्हिडीओ दृष्टीस पडला. या व्हिडीओत दाखविलेल्या भेसळप्रमाणे देशात आज अन्नपदार्थांत केली जाणारी भेसळ किती मोठ्या प्रमाणात केली जात आहे आणि याचे दुष्परिणाम अगदी लहान मुलांसह सर्वांना भोगावे लागत आहे. भाषेवरून भारतातील उत्तर भागातील व्हिडिओ असावा असे प्रथमदर्शनीच जाणवत असलेल्या या व्हिडीओत एका टरबूज विक्रेत्यावर छापा घालून स्थानिक पोलिसांनी मोठी भेसळ उघडकीस आणली आहे. याबद्दल खरेच त्यांचे कौतुक करायला हवे. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने बाजारात सर्वत्र टरबूज विक्रीसाठी आलेले आहेत. आरोग्याच्या दृष्टीने हितकारक असलेले टरबूज घेताना कुणीही ते आतून लाल असले की, पटकन घेतो. पण, हेच टरबूज आतून लाल दिसावे आणि गोड वाटावे म्हणून मानवी देहावर प्रतिकूल परिणाम करणारे विविध रसायने त्यात इंजेक्शनद्वारा आत सोडून विक्रीला पाठविण्यात येत होते. पोलिसांनी छापा मारून हा प्रकार निव्वळ उघडकीसच आणला नाही, तर त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल करून सामान्य जनतेला जागृत करण्याचे काम केले आहे. यातील नोकर जरी ही भेसळ करत असला तरी आयुष वर्मा नावाचा व्यावसायिक हे सर्व करवतो आहे, याचा कबुलीजबाब त्याने दिलेला आहे.

मागे असाच एक व्हिडिओ भेसळयुक्त दुधापासून आईस्क्रीम तयार करणाऱ्या कंपनीच्या आतील घेऊन कुणीतरी तो व्हायरल केला होता. यात सुद्धा युरियापासून दूध तयार करून त्या दुधापासून आईस्क्रीम तयार करत असल्याचे संपूर्ण दृश्यांकन त्यात करण्यात आले होते. स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी हे व्यावसायिक, विक्रेते का करतात अशी भेसळ? आज देशात या सर्व प्रकारावर लक्ष ठेवण्यासाठी अन्न व औषध प्रशासन नेमले गेले असले तरी, त्यांच्या निदर्शनास या सर्व बाबी येत नसाव्यात काय? असे एक ना अनेक प्रश्न आपल्याला हे असे भेसळ करणारे बघितले की पडतात. अन्नपदार्थांत केल्या जाणाऱ्या रसायन भेसळीमुळे कर्करोगासारख्या रोगांना निमंत्रण दिल्यासारखे आहे. अशाच एका प्रकरणी मागे राजस्थान उच्च न्यायालयाने चिंता व्यक्त करत स्वतःहून दखल घेतली होती. इतकेच नाही तर राज्य सरकारांनी यावर कठोर पाऊले उचलावी, कठोर कायदे करावे असे निर्देशच कोर्टाने दिले होते. केंद्रीय गृहमंत्रालय, आरोग्य, कृषी आणि अन्न पुरवठा, अन्न सुरक्षा प्राधिकरण यांच्यासह इतरांना सुद्धा नोटीस पाठवून यावर उत्तर मागविले होते. यावरून अन्न पदार्थातील भेसळ किती महत्त्वाचा प्रश्न आहे, हे लक्षात येते.

एप्रिल महिन्यातील ऐन सणासुदीच्या काळात नागपुरातील हुडकेश्वर भागातील नकली सोयाबीन तेल बनविणाऱ्या एका कंपनीवर धाड टाकून नागपूर गुन्हे शाखेने तब्बल आठ लाख रुपयांच्या मुद्देमाल जप्त केला. ब्रँडेड कंपनीच्या लेबलखाली याठिकाणी नकली तेल बनवून लोकांच्या आरोग्याशी खेळले जात होते. तर मागे लकडगंज पोलिसांनी मिळालेला माहितीच्या आधारे वासुदेव खंडवाणी याच्या बनावट खाद्य तेलाच्या गोदामावर धाड टाकून १ लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला होता. मागच्या वर्षी जूनमध्ये सरकारने राजस्थानमध्ये १८ हजार लिटर बनावटी खाद्यतेल ताब्यात घेतले असल्याची माहिती भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने त्यांच्या संकेतस्थळावरून शेअर केली होती.

भेसळ होत असल्याचे आढळल्यास त्याची तक्रार नेमकी कोठे, कशी करायची याचीही माहिती व शिक्षण झाले पाहिजे. ही प्रक्रिया अत्यंत सोपी झाली पाहिजे. यामध्ये तक्रारकर्त्यांची ओळख गुप्त ठेवण्याबाबतही विचार झाला पाहिजे. त्यामुळे आसपास घडत असलेल्या भेसळीच्या तक्रारी करण्यासंदर्भातील सर्वसामान्याच्या मनातील भीती कमी होईल. निदान देशाची युवा पिढी सशक्त आणि सुदृढ असावी, यासाठी अशा भेसळखोरांवर योग्य कारवाई करण्यासाठी शासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ पत्रकारिता विभागाचा निरोप समारंभ

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अंतर्गत भाई छन्नूसिंह समाजकार्य महाविद्यालयाच्यावतीने वृत्तविद्या व जनसंज्ञापन पदविका या एक वर्षाच्या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ पुणे विभागीय संचालक डॉ. विश्वास गायकवाड, पुणे विभागाचे कक्ष अधिकारी संतोष वामन, पुणे विभागाचे सहाय्यक प्रदीप गायकवाड, पत्रकार विजय गायकवाड तसेच नोंदणी विभागाचे उपकुलसचिव मनोज घंटे ,भाई छन्नूसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालय संचालिका रोझा चंदेले, केंद्रप्रमुख प्राचार्य सिद्धार्थ गायकवाड, केंद्र संयोजक मनीषा पाटील, प्रा. ॲड. अरविंद देडे, कृषी विभागाचे मनोज पाल, पर्यावरण दूत मनोज देवकर, ॲड. स्नेहल शिवपुंजे, विभागप्रमुख प्रा. विजयकुमार लोंढे, प्रा.विशाल पाटील उपस्थित होते. प्रारंभी दीपप्रज्वलन आणि महापुरुषांच्या प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी संविधान प्रास्ताविकेचे वाचन संतोष पवार यांनी केले. यावेळी विद्यार्थी गौतम थापटे, अरुणा वैरागकर , पालक रविकिरण चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व स्मृतिचिन्हे प्रदान करण्यात आली. प्रास्ताविक डॉ. अशोक मर्डे यांनी केले. सूत्रसंचालन अंजली काकडे यांनी केले तर आभार सुभाष माने यांनी मानले.



### अग्निशामक दल कामगारांच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

भवानी पेठ अग्निशामक दल कामगार स्टाफ यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन अग्निशामक दलाचे प्रमुख साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस प्रमुख उपस्थिती म्हणून नॅचरल ब्ल्यू कोब्रा संस्थेचे अध्यक्ष दीपक इंगळे, प्रमुख उपस्थिती दुधाळ, कलशेट्टी, मंडळाचे अध्यक्ष अनिल जगताप, दिनेश चिंता, स्वप्नील कांबळे, पठाण बाबा, अर्जुन तळभंडारे, तानाजी मंडळकर, अमन जगझाप, सुमित कसबे, सोमा कालेकर, राजू डांगे, धम्मदीप जगताप उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल जगताप यांनी तर आभार तानाजी मंठाळकर यांनी मानले.

### हिराचंद नेमचंद वाचनालयातर्फे बुधवारी व्याख्यानांचे आयोजन

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

श्री हिराचंद नेमचंद वाचनालयातर्फे जागतिक ग्रंथदिनानिमित्त बुधवार दिनांक २३ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहामध्ये व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सुप्रसिध्द साहित्यिक समीर गायकवाड व डॉ. सुलेखा आराध्ये यांचे व्याख्यान होणार आहे आणि वाचनालयाच्या अभ्यासिकेतील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थांचा सत्कार होणार आहे. कार्यक्रम सर्वासाठी खुला आहे. कार्यक्रमासाठी सर्व साहित्यप्रेमीनी अवश्य यावे, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी केले आहे.

### महाराष्ट्रातील हरित ऊर्जा परिवर्तनाची गती वाढली

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सार्वजनिक पायाभूत सोयीसुविधांना सौर ऊर्जा सक्षम बनवण्याच्या महाराष्ट्र राज्य सरकारच्या उपक्रमाच्या समर्थनार्थ, टाटा पॉवरने राज्यभरात २३० पेक्षा जास्त सार्वजनिक संस्थांना यशस्वीपणे सौर ऊर्जा सक्षम बनवले आहे. हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलून टाटा पॉवरने एकूण जवळपास १०७ मेगावॅट शुद्ध ऊर्जा क्षमतेचे योगदान दिले आहे. सौर ऊर्जा सक्षम संस्थांमध्ये प्रमुख जिल्ह्यांमधील १०० रुग्णालये (३.६ मेगावॅट), ६४ शाळा (२ मेगावॅट) आणि ७२ सरकारी व इन्स्टिट्यूशनल इमारतींचा (१०० मेगावॅट) समावेश आहे. टाटा पॉवरची ही सर्व इन्स्टॉलेशन्स एकूण १.३ लाख टन कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन रोखत आहेत, ज्यामुळे होणारा प्रभाव २० लाख झाडे लावण्याइतका आहे.टाटा पॉवर सोलरूफ व्यवसायाने ७०० पेक्षा जास्त शहरांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण केले असून महाराष्ट्रातील हरित ऊर्जा परिवर्तनाची गती वाढली आहे.

## वाहतुकीच्या माध्यमातून
# मध्य रेल्वेला ४२२ कोटींचा महसूल

**वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांची माहिती**

### सिमेंट, साखर, गूळ यांची वाहतूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात मालवाहतुकीत प्रभावी कामगिरी केली आहे. यामाध्यमातून मध्य रेल्वेला ४२१.५६ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. सिमेंट, साखर, गुळ, अन्नधान्य, कोळसा विविध वस्तूंची इतर राज्यात मालवाहतूक मोठ्या प्रमाणात करण्यात आल्याची माहिती रेल्वे अधिकार्यांनी दिली. सदरची कामगिरी सोलापूर रेल्वे विभागाच्या धोरणात्मक उपक्रमांचे फलित असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान सोलापूर विभागातील लातूर, सोलापूर, ताजसुलतानपूर, पंढरपूर, आरग, भिगवण, कुर्डुवाडी, उस्मानाबाद, बाळे, वाडी आणि तिलाटी परिसरात असलेले विविध सिमेंट फॅक्टरी, साखर कारखाने विविध कंपन्या यांच्या माध्यमातून मालवाहतूक करण्यात आली. एसीसी सिमेंट वाडी, अल्ट्राटेक होटगी, चेट्टीनाड तिलाटी, झुआरी तिलाटी, एनटीपीसी होटगी, आणि हिरेनांदुरू आणि पाकणी येथील गतिशक्ती मल्टी-मॉडल कार्गो टर्मिनल. आय. ओ.सी.एल पाकणीची महाराष्ट्रातील पहिली रेक लोडिंग सुविधा येथे २८ जानेवारी २०२५ रोजी वाहतूक सुरू झाली. यातून सुमारे ३.01 कोटी महसूल उत्पन्नासह २४ रेक लोड करण्यात आले. पंढरपूर आणि बाळे येथे दोन वर्षांनी गुळ वाहतूक यशस्वीरित्या पुनरुज्जीवित झाली. ५ रॅकच्या माध्यमातून २.७0 कोटी महसूल प्राप्त झाला. गुळ वाहतूक हि ११ रॅकवर वाढली, त्यातून ५.१६ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले.

नवीन खत भरण्याच्या उपक्रमांमुळे कुर्डुवाडी आणि पंढरपूर ते कोकण रेल्वेमध्ये वेर्णा येथे पहिल्यांदाच खत भरण्याचे काम झाले. २ मिनी रॅक भरून ३0 लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. दरम्यान सदरची ही कामगिरी तत्कालीन सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक लखनजी झा, सध्याचे सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक ए के यादव, मुख्य वाणिज्यिक निरीक्षक दीपक मिश्रा, वाणिज्य निरीक्षक निहाल सिंग आणि इतर समर्पित टीम सदस्यांच्या सततच्या प्रयत्नांचे फलित आहे. अशी माहिती सोलापूर रेल्वे विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी दिली.

**प्रमुख कामगिरीचा आढावा**

- एकूण उत्पन्न: ४२१.५६ कोटी
- एकूण रॅक लोड केले: १,७८३
- एकूण मालवाहतूक: ५.३४ दशलक्ष मेट्रिक टन




**मालवाहतुकीतील प्रमुख वस्तू**

सिमेंट, क्लिंकर, साखर, गूळ, डीओसी (डी-ऑइल केक), पीओएल (पेट्रोलियम, तेल आणि वंगण), मोलॅसिस, खते, चुनखडी, अन्नधान्य, कोळसा, राख, जिप्सम, बॉक्साइट आणि इतर.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांचा कार्यकाळ ११ महिन्याचा

### कागदपत्रे पडताळणी करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी दि. १० मार्च किंवा त्यापूर्वी आपले सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असेल अशांना उर्वरित पाच महिने कार्यप्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या वाढीव ५ महिन्यांच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण घेण्यास इच्छुक उमेदवार तसेच सद्य:स्थितीत प्रशिक्षण घेत असलेले उमेदवार व योजनेचा नव्याने लाभ घेण्यास इच्छुक उमेदवारांनी आधार पडताळणी व आवश्यक कागदपत्रे ( उदा.आधार, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र इ.) तपासणी करुन घेण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्तांनी केले आहे.




कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दि.९ जुलै २०२४ अन्वये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन DBT द्वारे ऑनलाईन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे योजनेच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील प्रतिज्ञापत्राचा नमुना प्रशिक्षणार्थी व आस्थापना यांनी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. यापुढे Adhar Seeded DBT होऊ शकेल. त्यामुळे सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी बँक खाते अपडेट करून घ्यावे.

# नोकरी निर्माण करणारे व्हा : ॲड. म्हेत्रस

**सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये तृतीय वर्ष विद्यार्थीनींचा निरोप समारंभ**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

एआयच्या युगात विद्यार्थ्यांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता नोकरी निर्माण करणारे व्हावे. सध्याच्या प्रगत जीवनात स्वतः साठी वेळ काढावा, छंद जोपासणे महत्वाचे आहेत. प्रत्येकाकडे ऑक्सफर्ड शब्दकोश असावी आपण भारताचे सूज्ञ नागरिक या नात्याने आपल्याला भारतीय संविधानाची माहिती व ज्ञान असणे आवश्यक आहे हे सांगितले मूल्य शिक्षणाचे ज्ञान असणे गरजेचे आहे, आयुष्य जगताना ताणविरहीत रहा, असे प्रतिपादन ॲड. म्हेत्रस यांनी केले.

श्री सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये तृतीय वर्ष विद्यार्थीनींचा निरोप समारंभ संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते. कार्यकमाचे अध्यक्षस्थानी मल्लिनाथ मसरे होते. यावेळी प्राचार्य गजानन धरणे, विभागप्रमुख डॉ. नीता आळंगे, प्रा. नवनाथ माने, प्रा. प्रमोद शिवगुंडे, प्रा. प्रतिमा पाटील, प्रा अतुल कंदले, प्रा. श्रीशैल मळेवाडी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. सुचेता चौधरी उपस्थित होते.

कार्यकमाची सुरूवात दिपप्रज्वलाने करण्यात आली. विद्यार्थीनीच्या तीन वर्षातील आठवणींना उजाळा देणारा व्हिडिओ सादर करण्यात आला. मृणाल एकबोटे, मृणाल मसरे, संस्कृती कुलकर्णी, कुंजल मचाले, वैष्णवी कोकाटे, संजना बमन्नगीने या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यकमाचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे यांनी विद्यार्थीनींना शुभेच्छा दिल्या.

कार्यकम यशस्वी होण्यासाठी प्रा. मृदुला हरसुरे, प्रा. कोमल कांबळे, प्रा. रविकिरण पतंगे, प्रा. किर्ती देवसानी, प्रा. साक्षी लोखंडे, श्री धोंडप्पा कोळी, विशाल दुधगी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन विजयालक्ष्मी सदलाम व अनन्या शिरसी यांनी केले व आभार प्रा. सुचेता चौधरी यांनी मानले.

# मौलाना आझाद पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची यशस्वी वाटचाल

### प्रा. डॉ. सरफराज शेख
### विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सोलापूर मौलाना आझाद पॉलिटेक्निक येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना भावनिक निरोप देत असताना या स्पर्धेच्या युगात आमच्या पॉलिटेक्निकचे विद्यार्थी तग धरून असल्याचे मत प्रा. डॉ. एस. एन. शेख यांनी मांडले.

होटगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील मौलाना आझाद पॉलीटेक्निक कॉलेजमधील सेमिनार हॉलमध्ये संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या वेळी ते बोलत होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अमिरोद्दीन शेख हे होते तर स्वामी विवेकानंद हायस्कूलचे मुख्याध्यापक सुभाष बेईमानवरून आदरणीय शिक्षक विजयकुमार बालाजी हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.




यावेळी एम.एस.बी.टी.ई. हिवाळी २०२४ च्या परीक्षेत सर्व विभागातील पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा देखील सन्मान करण्यात आला. सर्वोत्कृष्ट आउटगोइंग विद्यार्थी कुमार मोहम्मद अकमल शेख व कुमारी विभाग कौसर पठाण यांनाही पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. संस्थेबद्दल जिव्हाळा आणि आठवण राहावे म्हणून अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना संस्थेच्या वतीने विशेष स्मृतीचिन्ह देण्यात आली. जी भविष्यात त्यांच्या संस्मरणात राहतील. विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव आणि भावना शेअर केल्या. सूत्रसंचालन व आभार खराडी यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एम.ए. पटेल, गिरगावकर, गाडेकर, मोईन शेख, गवंडी, नीता वाघमारे, नाझिया व सर्व शाखा प्रमुख यांनी परिश्रम घेतले.

# सोलापूर गारमेंट असोसिएशनच्या प्रगतीची गती वाढणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सोलापूरच्या गारमेंट असोसिएशनच्या प्रगतीची गती देशाबरोबरच विदेशात अधिकच वाढणार, अशी आशा निवृत्त आयएएस अधिकारी उज्वल उके यांनी व्यक्त केली.

संपूर्ण देशात अत्यंत नावाजलेल्या युनिफॉर्म गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन सोलापूरच्या पहिल्या प्रदर्शनाला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. शासन दरबारी मदत मिळवून देण्यात सिंहाचा वाटा असलेले निवृत्त उज्वल उके, माजी सनदी अधिकारी माजी अप्पर मुख्य सचिव व माजी वस्त्रोद्योग सचिव महाराष्ट्र शासन यांनी सोलापूर यूनिफॉर्म गारमेंट इंडस्ट्रीला भेट दिली.



या भेटी दरम्यान सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या वतीने असोसिएशनच्या वेगवेगळ्या उपक्रमामधे त्याच्या अनुभवाचे मदत मिळावी यासाठी असोसिएशनच्या प्रमुख सल्लागारपद स्वीकारावे असे निवेदन त्यांनी स्वीकारले असल्याची घोषणा अध्यक्ष निलेश शहा यांनी केली. या भेटीसाठी आमदार सुभाष देशमुख यांचे साथ लाभले. असोसिएशनचे गारमेंटचे प्रशिक्षण देणारे ट्रेनिग सेंटर उभारणे तसेच भारतातील पहिले यूनिफॉर्म गारमेंट पार्क उभारणे या प्रमुख उद्देशामधे आमदार देशमुख प्रयत्नशील आहेतच व आता या निवडीमुळे उके यांचेही अनुभव व मार्गदर्शन मदतीला येईल.

२०१७ ला सोलापूर युनिफॉर्म गारमेंट उत्पादक संघाच्या पहिल्या प्रदर्शनाला त्यांनी भरभरून साथ दिली होती. आणि त्याला साजेशी मेहनत सोलापूरच्या गारमेंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी केली त्यामुळेच आज त्याचे चित्र देशात अत्यंत यशस्वी झाल्याचे दिसत आहे. आता सोलापूरचा डंका विदेशात जाण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे या निवडीला महत्त्व प्राप्त झालेले आहे. भारत देशात व विदेशात देखील युनिफॉर्म गारमेंट प्रचंड लोकप्रिय होऊन सोलापूर करिता युनिफॉर्म गारमेंटचे उत्पादन वाढेल अशी आशा पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

निवृत्त आयएएस अधिकारी उज्वल उके हे ठाणे येथील सहाय्यक जिल्हाधिकारी असताना ठाण्याकरिता जिल्हा आपत्ती आराखडा तयार केला. हा आराखडा पंतप्रधान कार्यालयाला सादर करण्यात आला. असे अनेक प्रकल्प त्यांनी शासन दरबारी राबविलेले आहेत. एमआयडीसी अक्कलकोट रोड येथील रमेश डाकलिया यांच्या कारखान्यात झालेल्या या कार्यक्रमात उपाध्यक्ष सतीश पवार, प्रकाश पवार, श्रीकांत अंबुरे, अजय रंगरेज, शैलेंद्र गणाते, रोहन बंकापूर, व्यंकटेश मेंगजी आदी उपस्थित होते.

# जेईई ॲडव्हान्ससाठी वालचंदचे १६ विद्यार्थी पात्र



**सोलापूर, दि. १९ एप्रिल**

वालचंद आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेजचे १६ विद्यार्थी प्रतिष्ठित जेईई ॲडव्हान्स परीक्षा लढवण्यासाठी पात्र ठरले आहेत. एप्रिलमध्ये जाहीर झालेल्या जेईई मेन्स परीक्षेच्या निकालात या विद्यार्थ्यांनी आपल्या कष्ट, चिकाटी आणि गुणवत्ता सिद्ध करत ही यशस्वी घौडदौड साधली आहे. त्यांचा सत्कार प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते करण्यात आला. ते म्हणाले, हे यश म्हणजे सुरुवात आहे.

आता 'जेईई डव्हान्स' क्रॅक करून स्वतःचं स्वप्न साकार करण्याची वेळ आहे. यावेळी उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, 'स्वयंअर्थ सहाय्य' विभाग समन्वयिका प्रा. सारिका महिंद्रकर, आणि मार्गदर्शक शिक्षक उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांनी मिळविले पर्सेंटाइल :** अथर्व गौर - ९६.५५ (सामान्य प्रवर्ग), अभय शिंदे - ९३.६६ (सामान्य प्रवर्ग), रितेश नागोडे - ९२.0८ (ईडब्ल्यूएस - सामान्य), हर्ष बोम्मा - ८८.८२ (ओबीसी), अक्षया बिंगी - ८८.५८ (ओबीसी), सक्षम फडे - ८८.४८ (ईडब्ल्यूएस - सामान्य), अनिरुद्ध होमकर - ८६.४५ (ओबीसी), साईचरण पेंडम - ८४.८९ (ओबीसी), पौर्णिमा अन्नलदास - ८४.८४ (ओबीसी), अच्युतानंद कवडदेवी - ८४.२0 (ओबीसी), वृषाली येमूल - ८३.१६ (ओबीसी), प्रणिती दासरी - ८१.७२ (ओबीसी), तनिष्का हिरेमठ - ८१.३९ (ओबीसी), मयंक मोरे - ८0.९७ (एससी), सागर बहिर्जे - ८0.१३ (ओबीसी), संस्कृती कुंभार - ७९.५0 (ओबीसी).

**नगर परिषद कार्यालय, तुळजापूर**
जाहीर निविदा प्रसिध्दीकरण

जा.क्र.नपतु/बां.वि/२०२५/८२८ दि.१७/0४/२०२५

**- जाहीर ई-निविदा प्रसिध्दीकरण -**

याद्वारे सर्व नोंदणीकृत अभियंता, एजन्सी, Consultant यांना कळविण्यात येते की, नगर परिषद तूळजापूर अंतर्गत यात्रा मैदान १२४ भक्त निवास बांधण्यात आलेल्या इमारतीचे Structural Audit करणे या कामासाठी Structural इंजिनीअर नेमणेची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने दि. २१/0४/२०२५ ते दि. २९/0४/२०२५ रोजी सायं. 0६.00 वा. पर्यंत मागविण्यात आल्या आहेत.

तरी त्याचा तपशील या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहावयास मिळतील. ई-मेल -tuljapurmc@gmail.com

(अजिंक्य रणदिवे)
मुख्याधिकारी
नगर परिषद, तूळजापूर

**जाहिर नोटीस**

माझे अशील मनोज दादासो भिंगारदिवे राहणार यशवंत नगर तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर यांचे मौजे माळशिरस तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर येथील गट नं.२१८८ क्षेत्र ७.७१ हे.आर., आकार १.९९ ही बागायत शेती मिळकत असून ती वडिलोपार्जित असून उत्तम तुकाराम केंदळे, योगीराज तुकाराम केंदळे, मंगल संपत साठे, नीलिमा प्रभाकर भिसे, किशोर दादासो भिंगारदिवे, मनोज दादासो भिंगारदिवे, लता विलास कुचेकर, बिरा अजित चव्हाण, सुनिता अशोक भिंगारदिवे, अभिजीत अशोक भिंगारदिवे, आदित्य अशोक भिंगारदिवे, मोनिका अशोक भिंगारदिवे, नितीन कमलाकर केंदळे यांचे मध्ये सामायिक स्वरूपाचे असून सदर मिळकतीचे माझे अशिल आणि इतर सह हिस्सेदार यांच्यात आज अखेर कोणतेही कायदेशिर वाटप झालेले नाही. तसेच माझे अशिल यांनी त्यांचा वरील मिळकती मधील अविभक्त हिस्सा कोणासही खरेदी खत, साठेखत, मुखत्यारपत्र, बक्षीस पत्र व इतर कोणत्याही दस्ताने कोणासही हस्तांतरित केलेली नाही तरी वरील मिळकतीचा कोणताही व्यवहार माझे अशील यांचे परस्पर करता येणार नाही.

तरी या जाहिर नोटिसीने सर्वास कळविण्यात येते की सदर मिळकतीची माझे अशिलाचे परस्पर अविभक्त हिस्सा विक्री किंवा कोणत्याही प्रकारे कोणासही हस्तांतरण किंवा तबदिल करणे बेकायदेशीर आहे. या प्रकारे जर सदर मिळकतीचे हस्तांतरण झाल्यास होणाऱ्या परिणामास व नुकसानीस माझे अशिल जबाबदार राहणार नाहित.

सही/-
ड. ओंकार अनंत जाधव
कार्यालय श्रीपुर, ता. माळशिरस, जि. सोलापूर.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज नं. ३२/२०२५
नि-५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात**

१) **सद्दाम बशीर बागवान,** वय-३२ वर्षे, धंदा - मजूरी, रा. पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **इम्रान बशीर बागवान,** वय-३३ वर्षे, धंदा मजूरी, रा. सदर
३) **यास्मीन मुहीद्दीन बागवान,** वय- ३६ वर्षे, धंदा - घरकाम, रा. दास प्लॉट, कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलापूर
— **अर्जदार**

**विरूध्द**

**कोणी नाही - सा.वाला**

**अर्ज वारस दाखला मिळणेबाबत**

ज्या अर्थी, यातील शहनाज बशीर बागवान या ता. १०/0७/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. मयत शहनाज बशीर बागवान यांचे पश्चात यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. यातील अर्जदारांशिवाय मयत शहनाज बशीर बागवान यांना दुसरे कोणीही जवळचे वारस नव्हते व नाहीत. मयत शहनाज बशीर बागवान यांचे नावे घरकुल मंजूर झालेले आहे. सदरचे घरकुल वारसांना मिळणेकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबंधीत अधिकारी यांनी दि. १३/0२/२०२५ रोजी शासकीय योजनेचा लाभ व घरकुल योजनेचा लाभ मिळणेसाठी यातील अर्जदार नं. १ ते ३ हेच जवळचे व कायदेशीर वारस (Legal Heirs) आहेत असे प्रमाणपत्र मे. कोर्टाचे आणण्यास सांगितलेमुळे अर्जदार नं.१ ते ३ यांनी वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज केला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार यांचे व्यतिरीक्त मयत शहनाज बशीर बागवान यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३0 दिवसाचे आत किंवा नेमली ता. ११/0६/२०२५ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल. कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता. ७/४/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी



## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – ९

### हार्ट रेट ट्रेनिंग

मी आज एच आर रन केला म्हणजे काय? तर, हार्ट रेट ट्रेनिंग ही एक सायंटिफिक पद्धत आहे जी धावपटूंना त्यांच्या धावण्याचा प्रभाव वाढवण्यासाठी मदत करते. यामध्ये आपल्या हृदयाच्या धडधडण्याचा (BPM- beats per minute) वेग लक्षात घेऊन रनिंगचे इंटेन्सिटी लेव्हल ठरवले जातात. ही पद्धत विशिष्ट झोनमध्ये रनिंग करून शरीराच्या ऊर्जा वापराच्या पद्धतींचा (fat burning, aerobic, anaerobic) योग्य वापर करते.निरनिराळ्या झोन मध्ये ट्रेनिंग करणे योग्य सराव दर्शवितो.

**हार्ट रेट ट्रेनिंग ५ मुख्य झोनमध्ये विभागले जाते:**

१. झोन १ (५०-६०%): रिकव्हरी झोन - अतिशय सौम्य रनिंग. बॉडीला आराम देण्यासाठी उपयुक्त.

२. झोन २ (६०-७०%): फॅट-बर्निंग झोन - लाँग रनसाठी उपयुक्त. धावपटू यामध्ये जास्त वेळ राहतात.

३. झोन ३ (७०-८०%): अॅरोबिक झोन - कार्डिओ क्षमता वाढवते. टेम्पो रनसाठी आदर्श.

४. झोन ४ (८०-९०%): अॅनअॅरोबिक झोन - स्पीड व स्टॅमिना वाढवण्यासाठी इंटरव्हल्समध्ये वापरले जाते.

५. झोन ५ (९०-१००%): मॅक्सिमम एफर्ट झोन - शॉर्ट बर्स्ट ट्रेनिंगसाठी वापरले जाते. लवकर थकवा येतो.

आपली Maximum Heart Rate (MHR) साधारणपणे २२० मधून वय वजा करून काढली जाते. (उदाहरणार्थ, ३० वर्षाच्या व्यक्तीसाठी MHR = २२० - ३० = १९० BPM.) हे ट्रेनिंग Garmin, Coros, Polar सारख्या स्मार्टवॉचसह सोपं करता येतं. यामुळे ओव्हरट्रेनिंग टाळता येतं. परफॉर्मन्स सुधारतो आणि धावपटूंची एकूण धावण्याची कार्यक्षमता अधिक स्मार्ट पद्धतीने वाढते.

**सारांश**

हार्ट रेट ट्रेनिंग ही रनिंगमध्ये सायंटिफिक अॅप्रोच असून ती फिटनेसच्या विविध लेव्हल्ससाठी योग्य आहे. ती धावपटूंना जास्त स्मार्ट, सुरक्षित व प्रभावी पद्धतीने प्रगती साधण्यास मदत करते.कमी गती मध्ये म्हणजे ऐरोबीक मधून आपण छान प्रकारे हार्ट ट्रेन करू शकतो जी पुढे जाऊन मॅक्सिमम परफॉर्म साठी उपयोगी पडू शकते.

- अतिश शहा
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

## आशियाई ब्रिज स्पर्धेत भारतीय संघाला सुवर्ण

**नवी दिल्ली :** दुबई येथे संपलेल्या ब्रिज फेडरेशन ऑफ एशिया अॅण्ड मिडल ईस्ट स्पर्धेत भारताने तीन सुवर्णपदके आणि एक रौप्यपदक जिंकले. जागतिक ब्रिज फेडरेशनच्या आश्रयाखाली १० ते १८ एप्रिल दरम्यान झालेल्या स्पर्धेत भारतीय पुरुष, महिला आणि वरिष्ठ संघांनी सुवर्णपदक जिंकले तर मिश्र संघाने रौप्यपदक जिंकले. चारही भारतीय संघ २० ते ३१ ऑगस्ट दरम्यान डेन्मार्कमधील हर्निंग येथे होणाऱ्या ४७ व्या जागतिक ब्रिज चॅम्पियनशिपसाठी पात्र ठरले. २०२५ च्या जागतिक ब्रिज चॅम्पियनशिपमध्ये बर्म्युडा बाउल, व्हेनिस कप, डीओर्सी ट्रॉफी आणि वुहान कप यांचा समावेश असेल.

# गुजरात टायटन्स ७ गड्यांनी विजयी

**दिल्ली कॅपिटल्सवर ७ गड्यांनी मात**

**गुजरातची अव्वल स्थानावर झेप**

◆ **अहमदाबाद, १९ एप्रिल**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शनिवारी नरेंद्र मोदी स्टेडियमवर जोस बटलर व शेर्फन रदरफोर्डच्या दमदार फलंदाजीच्या बळावर गुजरात टायटन्सने दिल्ली कॅपिटल्सवर ४ चेंडू शिल्लक ठेवत ७ गड्यांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबरच गुजरात टायटन्सने गुणतालिकेत दिल्ली कॅपिटल्स व पंजाब किंग्जला मागे टाकत अव्वल स्थान मिळविले. या तिन्ही संघांचे प्रत्येकी १० गुण झाले असून सरस धावगतीच्या आधारे ते पहिल्या तीन क्रमांकावर आहेत.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुभमन गिलने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. अक्षर पटेलच्या दिल्ली कॅपिटल्सने १०.१५ च्या सरासरी धावगतीने मर्यादित २० षटकांत ८ बाद २०३ धावा उभारल्या आणि गुजरात टायटन्ससमोर विजयासाठी २०४ धावांचे लक्ष्य ठेवले. गुजरातने १९.२ षटकांत ३ बाद २०४ धावा काढून आपला विजय साकारला. जोस बटलरने नाबाद ९७ धावांची, तर शेर्फन रदरफोर्डने ४३ धावांची विजयी खेळी केली. बटलर सामनावीर ठरला.




सामनावीर जोस बटलर

दिल्ली कॅपिटल्सच्या पहिल्या व मध्यम फळीतील फलंदाजांनी गुजरातच्या गोलंदाजांविरुद्ध तडफदार फलंदाजी आणि छोट्या-छोट्या भागीदारी करत संघाच्या धावसंख्येला आकार दिला. अभिषेक पोरेल (१८) व करुण नायरने (३१) पहिल्या गड्यासाठी २३ धावांची भागीदारी करत दिल्लीच्या डावाची चांगली सुरुवात केली. पोरेलने केएल राहुलसोबत दुसऱ्या गड्यासाठी ३५ धावांची भागीदारी केली. पुढे राहुल (२८), अक्षर पटेल (३९), ट्रिस्टन स्टब्स ( ३१) व आशुतोष शर्माने (३७) महत्त्वपूर्ण भागीदारी करत संघाला दोनशे धावांच्या जवळपास आणले. मिचेल स्टार्क व कुलदीप यादवने नाबाद खेळी करत दिल्ली कॅपिटल्सला ८ बाद २०३ धावांचा टप्पा गाठून दिला. गुजरातच्या प्रसिध कृष्णाने ४ बळी, तर मोहम्मद सिराज, अर्शद खान, ईशांत शर्मा व साई किशोरने प्रत्येकी १ बळी टिपला.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना साई सुदर्शन व कर्णधार शुभमन गिल मैदानावर गुजरात टायटन्सचे सलामीवीर आले, परंतु गिल सात धावा काढून धावबाद झाला. मात्र गुजरातचे फलंदाज डगमगले नाही. सुदर्शन व जोस बटलरने दुसऱ्या गड्यासाठी ६० धावांची भागीदारी करून गुजरातचा डाव सावरला. साई सुदर्शनने अवघ्या २१ चेंडूंत ५ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ३६ धावांची भर घातली. पुढे बटलरने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत शेर्फन रदरफोर्डसोबत तिसऱ्या गड्यासाठी ११९ धावांची शतकी भागीदारी केली व संघाला १८.५ षटकांत ३ बाद १९३ धावांचा टप्पा गाठून दिला व विजयाबद्दल आश्वस्त केले. मुकेश कुमारच्या गोलंदाजीला बळी पडण्यापूर्वी रदरफोर्डने ३४ चेंडूंत ३ षट्कार व एका चौकारसह ४३ धावांचे योगदान दिले. पुढे बटलर व राहुल तेवतियाने नाबाद खेळी करत १९.२ षटकांत ३ बाद २०४ धावा नोंदवून गुजरात टायटन्सच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. जोस बटलरने ५४ चेंडूंत ११ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद ९७ धावांची विजयी खेळी केली. राहुल तेवतिया ११ धावांवर नाबाद राहिला.

◀(वृत्तसंस्था)

## चहल आयपीएलमधील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक : अय्यर

◆ **बंगळुरू, १९ एप्रिल**

अनुभवी लेग-स्पिनर युझवेंद्र चहल हा इंडियन प्रीमियर लीगमधील 'सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक आहे' अशा शब्दांत पंजाब किंग्जचा कर्णधार श्रेयस अय्यरने चहलचे कौतुक केले आहे.

आयपीएल स्पर्धेच्या प्रारंभी निराशाजनक कामगिरी केल्यानंतर पंजाब किंग्जच्या फिरकीपटू चहलला आरसीबीविरुद्ध पंजाब किंग्जला पाच गड्यांनी विजय मिळवून देताना सूर गवसला. त्याने रजत पाटीदार व जितेश शर्मा हे दोन महत्त्वपूर्ण बळी घेतले.

मी चहलशी वैयक्तिकरित्या संसवाद साधला. मी त्याला म्हटले की तू सामना जिंकून देणारा खेळाडू आहेस व तुने आम्हाला शक्य तितके जास्त बळी मिळवून देण्याची गरज आहे. तुला तुझ्या दृष्टिकोनात सुरक्षित राहण्याची गरज नाही. तुझ्याकडे मुसंडी मारण्याची क्षमता आहे. लेग स्पिनर म्हणून आम्ही त्याचे हेच कौतुक करतो, असे अय्यर म्हणाला.

तो आयपीएलमधील सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक आहे, कदाचित आयपीएलमधील आतापर्यंतचा सर्वोत्तम गोलंदाज आहे. आम्ही नेहमीच त्याचे समर्थन करतो, असे अय्यर आरसीबीवर विजय मिळवल्यानंतर म्हणाला.

विविधता हे जीवनाचे अंग आहे असे म्हणतात. आम्ही येथे सर्व प्रकारचे खेळ अनुभवू शकतो. हे एक मोठे आव्हान आहे, असे अय्यर म्हणाला.

प्रामाणिकपणे सांगायचे तर माझा कोणताही विचार नव्हता. मी सहजतेने योजना आखत होतो व अर्थातच आम्हाला बळी मिळत होते. मला नवीन फलंदाजाला खेळपट्टीवर स्थिर होऊ द्यायचे नव्हते, असे त्याने सांगितले. आरसीबीने नियमित अंतराने महत्वपूर्ण फलंदाज गमावले. अर्शदीप सिंग, चहल, मार्को जानसेन व हरप्रीत ब्रार सारख्या खेळाडूंनी पाहुण्या संघाला जोरदार हादरे दिले.

◀(वृत्तसंस्था)







सोलापूर : नेहरूनगर शासकीय मैदानावर शनिवारी आयपील फॅन पार्कचा मोठ्या स्क्रीनवर गुजरात वि.दिल्ली या सामन्यात बाद केल्याचा क्षण. दुसऱ्या छायाचित्रात सामन्याचा आनंद घेताना सोलापूरकर.(छाया : केवल तिवारी)

## शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेता

**आदित्य गिराम व त्याचे प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे सोलापुरात जंगी स्वागत**



**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेता आंतरराष्ट्रीय डायव्हिंग खेळाडू आदित्य अनिल गिराम व त्याचे प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे होमकर नगरमध्ये जंगी स्वागत करण्यात आले.

गेले पंचवीस वर्षे परिश्रम करून वयाच्या पाचव्या वर्षी सुरु झालेला हा प्रवास शालेय स्पर्धा, विद्यापीठ स्पर्धा, खुल्या गटाच्या स्पर्धेमध्ये पदके मिळवून शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल होमकर नगर रहिवाशांना आनंद झाला. त्यामुळे शुक्रवारी सायंकाळी दहा वाजता कॉलनीच्या प्रवेशद्वारासमोर आतिषबाजी करून फेटा बांधून, हार घालून सत्कार करून पेढे वाटून जल्लोष करण्यात आला. त्यावेळी होमकर नगरमधील सर्व पुरुष, महिला व लहान मुले मित्रपरिवार उपस्थित होते

सुरुवासीतस एकता गणेश मंडळाचे ज्येष्ठ सदस्य जगदीश अण्णा इंडी व शहर, जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, जिल्हा अलिबाग संघटनेचे सदस्य किरण शिंदे, गणेश इडली ग्रहाचे मालक सतीश पै यांच्या हस्ते शिवछत्रपती पुरस्कार विजेता आदित्य व त्यांचे मार्गदर्शक श्रीकांत शेटे या दोघांचे फेटा, शॉल, हार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख उपस्थिती मंडळाचे खजिनदार सिद्धेश्वर कबाडे , सराफ व्यापारी अमित वर्णेकर, नागेंद्र रायकर, विघ्नेश्वर वर्णे कर, नंदकिशोर भराडीया नागनाथ माळगे, नागनाथ स्वामी, मुळे परिवार, सास्तुर परिवार, रंगदाळ परिवार विभुते परिवार, भटाने परिवार, मंदोळीकर परिवार, हवळगी परिवार व इंडी परिवार व गुरव परिवार इत्यादी ओंकार नगर मधील सर्व महिला मंडळ व मित्रपरिवार उपस्थित होते



## पंढरपूरचा रायझिंग स्टार विजेता

**श्री साई समर्थचा चषक क्रिकेट : श्री साई समर्थ क्रीडा भारती उपविजेता**

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

रायझिंग स्टार पंढरपूरने श्री. साई समर्थ १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

श्री साई समर्थ क्लबने ही स्पर्धा आयोजित केली होती. डोणगाव रोडवरील पुष्प अकादमीच्या मैदानावर ही स्पर्धा झाली. श्री साई समर्थ व क्रीडा भारतीचे प्रशिक्षक अनिल सांब्राणी यांच्या मार्गदर्शनाखाली हे साखळी सामने खेळवण्यात आले होते.

या मध्ये श्री साई समर्थ के.बी.सी.ए., साऊथ सोलापूर व रायझिंग स्टार पंढरपूर या तीन संघांनी सहभाग नोंदवला होता. यात श्री साई समर्थ के.बी. सी.ए. या संघाने अत्यंत चांगली कामगिरी करत चार पैकी दोन सामने जिंकत अंतिम सामन्यात प्रवेश केला होता. अंतिम सामन्यात शेवटच्या षटकापर्यंत कडवी झुंज या संघाने दिली. श्री साई समर्थ के.बी. सी.ए. संघाकडून रिधम कचरे याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून चषक देण्यात आले. हर्ष जगताप याने संघाला विजयी करण्यासाठी ६६ चेंडूमध्ये ५५ धावा तर क्षेत्ररक्षणात ६ खेळाडू बाद केले.

रायझिंग स्टार पंढरपूरच्या रुद्र चौगुले याला सर्वोत्तम फलंदाज म्हणून चषक आणि ग्रे निकोल्सची इंग्लिश विलो बॅट तर सर्वोत्तम गोलंदाज म्हणून आनंदी पाटील हिला चषक आणि ब्रँडेड कंपनीचे शूज देण्यात आले. यशस्वी संघाचे श्री साई समर्थ क्रीडा भारतीचे राजेश कळमणकर, डॉ. हरपाळे यांनी अभिनंदन केले.

## रेल्वेच्या परेल वर्कशॉप संघास ब गटाचे विजेतेपद

**७८ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : रोशन परते सामनावीर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

मुंबईच्या मध्य रेल्वे मेकॅनीक परेल इन्स्टिट्युटने मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिट्युटच्या ७८ व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन ब गट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

येथील रेल्वे मैदानावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात परेलने ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट अकादम ीवर ५ गडी राखून विजय मिळविला. ख्वाजा बंदेनवाज क्रिकेट अकादमीचा डाव परेलने ८८ धावांत गुंडाळला. विजयी लक्ष्य परेलने ५ गडी गमावीत गाठले. अष्टपैलू कामगिरी करणारा रोशन परते सामन्याचा मानकरी ठरला. प्रत्येक सामनावीर चे पुरस्कार सुदेश मालप व सुनील म ालप यांच्याकडून देण्यात येत आहेत. पंच म्हणून नवीन माने व सचिन गायकवाड यांनी तर गुणलेखक म्हणून गेनबा सुरवसे यांनी काम पाहिले.





तत्पूर्वी या अंतिम सामन्याचे उदघाटन व नाणेफेक सीटीआय वाय. के. फडतरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सीटीआय एम. एस. सलवडे, आर. के. गुप्ता, इन्स्टिटयूटचे सेक्रेटरी किशोर पिल्ले, अंबादास तोरा, वैभव इराबत्ती परेल वर्कशॉपचे रमेश ढाले उपस्थित होते. सूत्रसंचालन राजा पटेल यांनी केले. अ गटाचे सामने २३ एप्रिलपासून सुरू होतील. हे सामने ४० षटकांचे आहेत. दोन्ही स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघाचे बक्षिस वितरण अ गटाच्या अंतिम सामन्यावेळी होईल.

**संक्षिप्त धावफलक**

**के.बी.एन.सी.ए :** १५.२ षटकांत सर्व बाद ८८ (वसीम बैग १९, जावेद अहमद १८, समीर शेख १४ धावा, रोशन परते ३ बळी, रीशब शर्मा व सौरभ भंडारी २ बळी, अभिषेक शर्मा व शांतापा जलपुर प्रत्येकी १ बळी) पराभूत विरुद्ध **परेल वर्कशॉप मुंबई :** १७ षटकांत ५ बाद ८९ (निशांत शिवलकर ३४, रोशन परते १८, राहुल सावंत १० धावा, सईद जहागीरदार, सलमान तांबोळी, जाहिद पठाण व जकवान हबीब प्रत्येकी १ बळी).

## पिलीवच्या तिघांची राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ एप्रिल -**



पिलीवच्या तिघांची इंडिया तायक्कांदोकडून घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड झाली. शुभम जाधव, शिवतेज लोखंडे, तमसिन शेख हे निवड झालेले खेळाडू आहेत. त्यांना प्रशिक्षक वाजीद शेख यांचे मार्गदर्शन लाभले. येथील लोकसेवा तायक्कांदो स्पोर्ट्स अकॅडमीतील तमसिन हिने कॅडेट वजनी गटात तसेच ज्युनिअर वजनी गटात शिवतेज तसेच सीनियर वजन गटात शुभम याची महाराष्ट्र संघात निवड झाली. तसेच शिवतेजने त्याच्या गटात प्रथम क्रमांक पटकाविला. त्यांचे सोलापूर जिल्हा तायक्कांदो असोसिएशनचे सचिव प्रमोद दौंडे, महाराष्ट्राचे म हासचिव गफार पठाण, आप्पासाहेब लोखंडे, माजी सभापती संग्रामसिंह जहागिरदार, माजी उपसरपंच आरिफ खान पठाण, मोहन करांडे, दामोदर लोखंडे, सागर लोखंडे, माजी सरपंच आप्पासाहेब लोखंडे, पुष्पाताई लोखंडे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### रविंद्र कटके यांचा कौस्तुभमणी पुरस्काराने माळशिरस येथे झाला सन्मान

**सोलापूर, दि.१९ एप्रिल-**

माळशिरस येथील श्री सन्मती सेवा दल व सकल जैन समाजातर्फे सोलापूर येथील रविंद्र कृष्णकांत कटके यांना ३५ वर्षाच्या कार्याबद्दल कौस्तुभमणी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. माळशिरस येथे भगवान महावीरांच्या २६२४ व्या जन्मकल्याणक प्रभावना महोत्सवात हा पुरस्कार देण्यात आला. सोलापूर, पुणे, सातारा, धाराशीव, नगर, बीड, मुंबई या सात जिल्ह्यातून श्री. कटके यांची या पुरस्कारासाठी एकमताने निवड करण्यात आली आहे.

### पती आणि सासरच्यांकडून सतत छळ; महिलेची पोलीस स्टेशनला तक्रार

**बार्शी, दि. १९ एप्रिल-**

बार्शी येथील हिना इरफान लुकडे (वय २९) यांनी अंधेरी, मुंबई येथील आपल्या पती व सासरच्या मंडळींविरोधात शारीरिक व मानसिक छळ, पैशांसाठी जबरदस्ती, आणि मुलींच्या शिक्षणाला अडथळा आणल्याबाबत बार्शी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. हिना यांनी सांगितले की, त्यांचे लग्न १ मे २०१५ रोजी मुस्लिम



रीतिरिवाजाने मेहदीनगर, बार्शी येथे झाले होते. लग्नात आठ तोळे सोने व संसारोपयोगी वस्तू दिल्या होत्या. सुरुवातीच्या काही वर्षांत सर्व काही सुरळीत होते, मात्र ११ ऑक्टोबर २०१९ पासून पती इरफान लुकडे यांनी 'बिझनेस करायचा आहे' म्हणून पाच लाख रुपयांची मागणी करत मानसिक व शारीरिक छळ सुरु केला. महिनांनी आरोप केला की, पतीसह सासू, दिर, नणंद यांनीही त्यांना सतत पैशासाठी छळले. उपाशी ठेवले गेले, शिवीगाळ व मारहाण झाली. लॉकडाऊनच्या काळात दोन लाख पाच हजार रुपये दिल्यानंतरही त्रास थांबला नाही. इरफान यांचा दुसऱ्या महिलेसोबत संबंध असल्याचा संशयही तिने व्यक्त केला आहे. मुलींच्या शिक्षणाचा खर्च सासरच्या मंडळींनी नाकारल्याने फेब्रुवारी २०२५ पासून त्यांच्या मुली शाळेत जाऊ शकलेल्या नाहीत. या सर्व त्रासाला कंटाळून हिना यांनी २२ मार्च २०२५ रोजी माहेरी परत येण्याचा निर्णय घेतला. हिना यांनी फिर्यादीत इरफान हाजी लुकडे (पती) नुरज खान शबनम हाजी लुकडे (नणंद) अलन्बी हाजी लुकडे (सासू) वसीम हाजी लुकडे (दिर) तौफिक हाजी लुकडे (दिर) यां संशयिता विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु आहे.

### बोरी उमरगेत मंगळसुत्र चोरी व विनयभंग; दोघांवर गुन्हा दाखल

**अक्कलकोट दि. १९ एप्रिल-**

तालुक्यातील बोरीउमरगे येथे एका घरत घुसून नवरा बायकोला मारहाण करून महिलेच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करत गळ्यातील अंदाजे ३५ हजार रुपये किमतीचे अर्धा तोळा वजनाचे सोन्याचे मणीमंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गेल्याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या बाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रविवारी दुपारी एकच्या दरम्यान फिर्यादी व त्यांचे पती घरात बसले होते. दरेप्पा कामण्णा उम




राणीकर कुमठा व भागेश भिमाशंकर बागदरी असे दोघे घरात घसले. दरेप्पा याने तुमच्या मुलाने माझ्या पत्नीसोबत भांडण करुन आमची इज्जत घालवली आहे. आत्ता मी तुमची इज्जत ठेवत नाही असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादीचे पती यांनी तुम्ही आम्हाला शिवीगाळ करु नका. मुलाला विचारा आम्हाला विचारु नका असे म्हणत असताना दरेप्पा यांनी फिर्यादीचे घरात पडलेली लोखंडी सळई घेवुन फिर्यादीचे पतीचे हातावर, पाठीवर, उजवे पायावर मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीने त्यांना मारु नका असे म्हणत भांडण सोडविण्याचा प्रयत्न केला असता भागेश भिमाशंकर बागदरी याने कन्नड भाषेत तुमच्या मुलांनी आमची इज्जत घातली आहे. आता आम्ही पण तुझी इज्जत घालतो असे म्हणून फिर्यादिला घाणघाण शिवीगाळ करून हाताने लाथाबुक्याने मारहण करून अश्लील भावनेने फिर्यादीचे अंगावरील साडी ओढून, ब्लाऊज फाडून मनास लज्जा वाटेल असे कृत्य करत गळ्यातील अंदाजे ३५ हजार रुपये किमतीचे अर्धा तोळा वजनाचे सोन्याच्या धातुचे मणीमंगळसुत्र जबरदस्तीने हिसकावून घेवुन गेला आहे. या प्रकाराबाबत कोठे तक्रार दिलीतर आम्ही तुम्हाला कुत्र्यासारखे गाडीला बांधुन घेवुन जातो असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी आमचे गावातील रविंद्र शरणप्पा कोळी व संगीता देवेंद्र कोळी यांनी येवून भांडण सोडवले. त्यावेळी ते दोघे त्यांनी आणलेल्या मोटारसायकल वरुन निघुन गेले. याबाबत अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोहेका चिंचोलकर अधिक तपास करीत आहेत.

### श्री भगवंत महोत्सवामध्ये स्थानिक कलाकारांना सुवर्णसंधी

**बार्शी, दि.१९ एप्रिल-**

प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्री भगवंत महोत्सवाचे आयोजन ४ ते १० मे या कालावधीमध्ये करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये स्थानिक कलाकारांना वाव मिळण्यासाठी व स्थानिक कलाकारांच्या कलागुणांचे प्रदर्शन करण्यासाठी भगवंत मैदान येथे एक दिवसीय स्थानिक कलाकारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी दि. २२ एप्रिल रोजी यशवंतराव चव्हाण संस्कृतीक सभागृह या ठिकाणी सायंकाळी ५ ते १० या वेळेमध्ये कलाकारांच्या निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी स्थानिक कलाकारांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या कलाकारांनी वेळेवर उपस्थित राहून संधीचा लाभ घेण्याचे आवाहन श्री भगवंत महोत्सव समितीमधील संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

## आदिनाथ कारखान्याच्या निवडणुकीत

# आमदार नारायण पाटील यांची एकहाती सत्ता

## सर्वच्या सर्व २१ उमेदवार विजयी; माजी आ. संजय शिंदे व प्रा.रामदास झोळ गटाचा धुव्वा

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१९ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील राजकीय, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या श्री



आदिनाथ सहकारी साखर कारखान्यावर आमदार नारायण आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली संजीवनी पॅनलने २१ जागांवर विजय मिळवत एकहाती सत्ता आणली आहे. माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या पॅनलचा धुव्वा उडाला आहे.

या कारखान्याच्या २१ संचालक निवडीसाठी गुरुवारी दि.१७ एप्रिल रोजी मतदान झाले. एकूण ६०.७९ टक्के मतदान झाल्याने कोणाची सत्ता येणार याबाबत उत्सुकता होती. आज शनिवार दि.१९



रोजी मतमोजणी झाली. त्यात आमदार नारायण आबा पाटील यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या आदिनाथ कारखाना संजीवनी पॅनलने २१ जागांवर विजय मिळवत एकहाती सत्ता आणली आहे. आमदार नारायण आबा पाटील यांना माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी महत्वाची साथ दिली. तर माजी आमदार संजय मामा शिंदे यांनी या निवडणुकीत आदिनाथ कारखाना आपल्या वर्चस्वाखाली यावा यासाठी बेरजेचे राजकारण केले. परंतू त्याना अपयश आले. त्यांना या निवडणुकीत बारामती ग्रो चे व्हाईस चेअरमन सुभाष आबा गुळवे यांनी साथ दिली. मात्र सभासदांनी आमदार पाटील यांच्यावर विश्वास ठेवून कारखान्याची एकहाती सत्ता पाटील गटाकडे सुपूर्द केली आहे. कारखान्याच्या या निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. सुरुवातीला बागल गटांनी जाहीर केलेले आपले सर्व उमेदवार निवडणुकीच्या तोंडावर मागे घेतले तर जयवंतराव जगताप यांनी सुद्धा आपल्या सर्व उमेदवारांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास सांगितले. त्यामुळे आमदार नारायणआबा पाटील व माजी आमदार संजय मामा शिंदे यांच्यात सरळ लढत दिसून आली. प्रा. रामदास झोळ यांनी सुद्धा कारखान्याच्या विकासासाठी सभासदांपुढे मते मागितली मात्र सभासदांनी नारायण आबा पाटील यांच्यावर विश्वास ठेवून कारखान्याची सर्व सत्ता पाटील गटाकडे दिली .बागल गटाच्या तटस्थ भूमिकेमुळे पाटील गटाला ही निवडणूक सोपी केली. मा.आ.जयवंतराव जगताप यांनी संजय मामा शिंदे यांच्यावर निशाणा साधून नारायण आबा पाटील यांचे नेतृत्वाखालीच कारखाना उत्कृष्ट पद्धतीने चालू शकतो असा विश्वास सभासदांमध्ये निर्माण केला. त्यामुळे नारायणा आबा पाटील गटाचे सर्व २१ उमेदवार विजयी झाले आहेत.

> अनेक दिवसांपासून बंद असणारा हा कारखाना सुरू करणे व कामगार, वाहन मालक यांची देणे देणे कारखान्यासाठी कर्ज उपलब्ध करणे हे जटिल प्रश्न पाटील गटाला सोडवावे लागणार आहेत.

**पाटील गटाचे विजयी उमेदवार :** आमदार नारायण पाटील, दत्तात्रय गव्हाणे, चौधरी साहेब, महादेव पोरे, वसंत अंबारे, रविकिरण फुके, दशरथ हजारे, किरण कवडे, नवनाथ झोळ, संतोष पाटील, दत्तात्रय देशमुख, विजय नवले, महेंद्र पाटील, अमोल घाडगे, देवानंद बागल, राहुल सार्वत, राजेंद्र कदम, दादासाहेब पाटील, हरिदास केवारे, राधिका तळेकर, उर्मिला सरडे.

## महाळूंगचे पोलीस सोमनाथ सुरवसेंचा झाला गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १९ एप्रिल-**

महाळुंग (ता. माळशिरस) येथील रहिवासी व सध्या सोलापूर शहर पोलीस दलातील पोलीस सोमनाथ सुरवसे यांच्यासह अन्य चौघांनी दागिने चोरून पोबारा करण्याच्या तयारीतील आरोपींना तत्काळ पकडल्याबद्दल सोलापूरचे पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.



करणी-भानामती काढून तुमची सर्व दुःखे दूर करतो असे सांगून १ लाख ७६ हजार रुपयांचे दागिने लबाडीने चोरून नेलेल्या नगीना मोहम्मद अरिफ (वय ३७ ) व अबिद रशीद (वय ५५ ) (दोघेही रा.गाजियाबाद, उत्तर प्रदेश) यांना पोलीसांनी तत्काळ अटक केली. सोलापूर येथील सदर बाझार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका महिलेच्या घरी वरील आरोपी आले. जादूटोणा करून तुझे सारे दुःख दूर करून करणी धरणीच्या माध्यमातून तुला सुखी करतो असे सांगत त्या महिलेची दिशाभूल केली. त्या महिलेला आपल्या जवळील १ लाख ७६ हजार किमतीचे २२ ग्रॅम सोने आणण्यास सांगितले. ते सोने एका गाठोड्यात बांधून तिच्यावर हळदी -कुंकू व इतर पावडर टाकून तिच्याभोवती पणत्या लावण्यात आल्या. हे सोने रात्री बारा वाजण्याच्या आधी उघडायचे नाही असे त्या महिलेला बजावले. महिलेला गप्पांमध्ये गुंतवत त्या गाठोड्यातून सर्व सोने काढून त्या दोघांनी पोबारा केला. रात्री दहा वाजता महिलेने गाठोडे उघडून पाहिले तर सोने गायब होते व ते दोन्ही आरोपीही गायब होते. त्यावेळी संबंधित महिलेने सदर बाजार पोलीस ठाण्यात धाव घेतली. सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस निरीक्षक अजित लकडे, पोलीस उपनिरीक्षक नितीन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सोमनाथ सुरवसे, राजेश चव्हाण, सागर सरतापे आणि सागर गुंड या चार कर्मचाऱ्यांचे पथक तपासासाठी नेमले. या पथकाने केवळ चार तासाच्या आत गाजियाबादच्या त्या महिलेस व पुरुषाला सोलापूर रेल्वे स्टेशनवरून अटक केली. त्यांच्याकडून सर्व मुद्देमाल जप्त केला. कसलाही पुरावा अथवा आरोपींचे छायाचित्र नसताना या चार पोलीस कर्मचाऱ्यांनी तत्काळ या गुन्ह्याचा तपास लावल्यामुळे सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते चौघांना विशिष्ट कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. सोमनाथ सुरवसे हे महाळुंग गट नंबर २ (ता. माळशिरस) येथील रहिवासी आहेत. त्यांचे गावात विशेष कौतुक होत आहे.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी सरकार सकारात्मक

### केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव

### पंढरपुरात शेतकरी सेनेचा शेतकरी मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ एप्रिल -**

राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. शेतकरी बांधव समस्यांमध्ये अडकला आहे.

राज्यातील शेतकऱ्यांसाठी महायुतीचे सरकार आर्थिक लाभाच्या विविध योजना राबवत आहे. येत्या काळातही शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी झाली पाहिजे. यासाठी महायुतीचे सरकार सकारात्मक भूमिका घेत आहे असे प्रतिपादन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पंढरपूर येथील शेतकरी सेनेने आयोजित केलेले शेतकरी मेळाव्यात केले.

पुढे बोलताना केंद्रीय राज्यमंत्री जाधव म्हणाले की विरोधकांकडून शेतकऱ्यांमध्ये खोटा नेरीटिव्ह पसरवला जात आहे म्हणून शेतकऱ्यांची मुले शेती व्यवसायाकडे नकारात्मक भूमिकेने पाहत आहेत.



> संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या विठ्ठलाच्या पंढरपूर नगरीत शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी मेळावा पार पडत असल्याबद्दल केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी समाधान व्यक्त करीत आयोजकांना धन्यवाद दिले.

शेतकऱ्यांनी नकारात्मक भूमिका न घेता परिस्थितीला तोंड देऊन नोकरीला पर्याय म्हणून शेती केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आजकाल कोणीही शेतकऱ्यां बाबत बोलून त्यांच्या भावनांशी खेळण्याचे काम करत आहेत. मी स्वतः शेतकरी आहे. शेती करतो मला शेतकऱ्यांबाबत बोलण्याचा अधिकार आहे असे सांगत आदित्य ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. यावेळी बोलताना सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, शवसेना शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश साठे, शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय जाधव, झोपडपट्टी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुमित वजाळे, माढा लोकसभा संपर्कप्रमुख संजय कोकाटे, साईनाथ अभंगराव, अनिता माळगे, प्रियंका परांडे, सागर पाटील, शिवाजी बाबर, मुन्ना भोसले, बालाजी बागल, गणेश जाधव, लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायतचे सरपंच संजय साठे, ग्रामपंचायत सदस्या नागराबाई साठे, रोहिणी साठे, रेश्मा साठे, समर्थ साठे यांच्यासह जिल्ह्यातील शेतकरी बांधव शिवसैनिक उपस्थित होते.

## पिलीव येथील अवैध धंदे बंद करा अन्यथा पोलीस ठाण्यासमोरच दारु विकणार

### कुमार लोखंडे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ एप्रिल-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील सर्व अवैध धंदे आठ दिवसाच्या आत पुर्णपणे बंद न केल्यास पिलीव पोलीस स्टेशन समोरच दारु विक्री करत बसणार असल्याचा इशारा येथील कुमार लोखंडे यांनी दिला आहे. याबाबतचे निवदेन त्यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधिक्षक सोलापूर ग्रामीण, पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक, ठाणे अंमलदार यांना दिले आहे.

येथे अवैध धंद्यांमुळे सर्वसामान्यांना अक्षरशः जगणे मुश्किल झाले आहे. हातभट्टी दारु, जुगार, मटका, गुटखा, शिंदी याची राजरोस विक्री सुरु आहे. मंदिर, शाळा तसेच किंवा मुख्य रस्ता परिसरात हे सर्व धंदे राजरोसपणे सुरू आहेत. याचा सर्वसामान्य नागरिक तसेच विदयार्थी, महीला यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. याच अवैध धंद्यांमुळे अनेक विवाहीत तरुणी विधवा झाल्या आहेत. अनेक तरुण मुले व्यसनांच्या आहारी गेले आहेत. अनेकांनी जुगार, मटक्याच्या नादात जमिनी विकल्या आहेत. या अवैध धंद्यांमुळे शाळा, कॉलेजला जाणाऱ्या विदयार्थीनींना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

> पिलीव परीसरात अवैध धंदे जोरात सुरु असुन ऑपरेशन परिवर्तन ही मोहीम गुंडाळली आहे. हातभट्टी विक्री सुद्धा जोरात सुरु आहे. येथील दोन धंदेवाल्यांची मुजोरी असुन आम्ही कोणालाच घाबरत नसल्याची त्यांची भाषा आहे. याबाबत पोलीस काय कारवाई करणार याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## 'सिंहगड' मध्ये वेब ॲप्लिकेशन बनवण्याची कार्यशाळा संपन्न

**पंढरपूर, दि.१९ एप्रिल-**

कोर्टी (ता.पंढरपूर) येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'रिऍक्ट जे.एस.आणि नोड जे.एस.वापरून वेब ॲप्लिकेशन बनवणे' या विषयावर दहा दिवसीय मूल्यवर्धन कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांना संपूर्ण वेब विकास प्रक्रिया, आधुनिक फ्रंटएंड व बॅकएंड तंत्रज्ञान तसेच उद्योगातील अद्ययावत पद्धती यांची सखोल माहिती देण्यासाठी कार्यशाळा घेतल्याचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी सांगितले. रिऍक्ट जे.एस. आणि नोड जे.एस. या तंत्रज्ञानांच्या मदतीने रिअल-टाइम वेब ॲप्लिकेशन तयार करण्याचे ज्ञान विद्यार्थ्यांना मिळाले. लीड सॉफ्ट सोल्युशनचे सुरज पवार यांनी विद्यार्थ्यांना वेब ॲप्लिकेशन विकासातील मूलभूत संकल्पना, प्रात्यक्षिक सत्रे, प्रकल्प कार्यशाळा आणि व्यावसायिक दृष्टिकोन या विषयांवर मार्गदर्शन केले. यामध्ये ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी रिऍक्ट जे.एस. आणि नोड जे.एस. च्या मदतीने विविध वापरकर्ता इंटरफेस तयार करणे, एपीआय वापर, राऊटिंग, सर्व्हर साईड रेंडरिंग संकल्पनांचा सराव केला. प्रा. सोमनाथ ए. झांबरे यांनी समन्वयन केले. विभागप्रमुख डॉ. सुभाष पिंगळे यांनी कौशल्य आत्मसात करण्याचे महत्त्व समजावले.

## वाईन शॉपच्या मालकावर युवकाकडून बाटलीने हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ एप्रिल-**

बार्शी शहरातील दूध चौक परिसरात असलेल्या एका वाईन शॉपमध्ये बिअर पिण्याची परवानगी नाही, असे सांगितल्याने संतापलेल्या एका युवकाने वाईन शॉपच्या वृद्ध मालकाच्या डोक्यात काचेची बाटली फोडल्याची धक्कादायक घटना गुरुवारी दि. १८ एप्रिल सायंकाळी घडली.

शंकरराव बाळासाहेब कोकाटे (वय ७७, रा. टिळक चौक, बार्शी) असे जखमी वृद्धाचे नाव असून, ते अश्विनी वाईन शॉपचे मालक आहेत. घटनास्थळी उपस्थित त्यांच्या नातवाने व कामगारांनी त्यांना तत्काळ मिरगिणे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, सायंकाळी साडेपाचच्या सुमारास तीन अनोळखी युवक दुकानात आले. त्यांनी बिअरच्या तीन बाटल्या घेतल्या व त्यातील एकाने दुकानातील काउंटरसमोर उभे राहून बिअर पिण्यास सुरुवात केली. कोकाटे यांनी त्यास वाईन शॉपमध्ये दारु पिणे नियमबाह्य असल्याचे सांगत तात्काळ थांबवण्यास सांगितले. यावरुन संतापलेल्या अमन नुरमहम्मद शेख (रा. चांदणी, ता. परांडा, जि. धाराशिव) या युवकाने काचेच्या बाटलीने कोकाटे यांच्या डोक्यात वार केला. हल्लेखोर त्याचे दोन साथीदारांसह घटनास्थळावरुन पळून गेले असून, या प्रकरणी बार्शी पोलीस ठाण्यात संबंधित आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

## अक्कलकोट शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ एप्रिल-**

अक्कलकोट शहरातील भीम नगर येथील विश्वरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने शुक्रवार दिनांक १८ एप्रिल रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयघोषात भीम नगर येथून सायंकाळी भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली.



याप्रसंगी या मिरवणुकीचा प्रारंभ भगवान गौतम बुद्ध आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीचे पूजन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बागाव, रासपा नेते सुनील बंडगर, गटविकास अधिकारी शंकर कवितके आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सजवलेल्या ट्रॅक्टर मधून भगवान गौतम बुद्ध व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूर्तीची भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. अक्कलकोट शहरातील फत्तेसिंह चौक, एवन चौक, बस स्थानक परिसर छत्रपती शिवाजी महाराज चौक, विजय कामगार चौक, कारंजा चौक , मेन रोड , फत्तेसिंह चौक मार्गे भीम नगर पर्यंत मिरवणूक काढण्यात आली. रात्री दहा वाजता या मिरवणुकीची सांगता करण्यात आली.

या मिरवणुकीत हजारो अबालवृद्ध सहभागी झाले होते. तरुणाईने डॉल्बीच्या गीतांवर नृत्य करत मिरवणुकीत सहभाग घेतला. शहरातील विविध ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षाचे नेते मंडळींनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या भव्य जयंती मिरवणुकीत माजी नगरसेवक उत्तम गायकवाड, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे , शिलामणी बनसोडे,संदीप मडिखांबे ,कल्याणी घाडगे,अर्जुन साळे, भारत सोनकांबळे,विजयकुमार बाळशंकर, दत्ता मडीखांबे, तम्मा सुतार, गंगाराम मडीखांबे, शिवशरण शिंदे, अंबादास बनसोडे, विरपक्ष माने, स्वामीराव मडीखांबे, सिद्धार्थ बनसोडे, राहुल रूही, जयंती उत्सव अध्यक्षः सतीश सुतार, उपाध्यक्षः रोहित वाघमारे, महादेव बनसोडे, अजय मडीखांबे, खजिनदारः स्वामीनाथ गायकवाड, सचिवः तुषार गायकवाड, सहसचिवः दशरथ मडीखांबे, विजय मडीखांबे, पांडुरंग घाटगे, कार्याध्यक्षः लखन वेस्कर, सहकार्याध्यक्षः सिद्धार्थ मडीखांबे पप्पू इब्रामपूर, दत्ता शिंदे शुभम मडीखांबे,नागेश मडिखांबे,अमित बनसोडे, सचिन बनसोडे, बाळासाहेब मडीखांबे, नितेश मडिखांबे, सिद्धाराम मडिखांबे, दिनेश रुही, पंकज मडिखांबे किशोर खरात, प्रशांत खरात, प्रकाश गायकवाड ,चंद्रकांत गायकवाड, प्रशांत मडिखांबे, पंकज मडिखांबे, प्रशिक बनसोडे, सागर सुतार, मेजर सचिन मडिखांबे, विशाल माने, किरण किरात, चन्नू मडखांबे, सुनिल शिंगे उपस्थित होते.

## महत्वाचे...



### जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरचा पदग्रहण समारंभ उत्साहात

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

जायंट्स ग्रुप ऑफ सोलापूरचे नूतन अध्यक्ष व माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, सचिव हरिनिवास सोमा व अन्य पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण समारंभ जायंट्स वेलफेअर फौंडेशन स्पेशल कमिटी मेंबर विनोद शेवतेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी जायंट्स वेलफेअर फौंडेशनचे प्रेसिडेंट डॉ. गुरुदत्त राजपूत, फेडरेशन व्हाईस चेअरमन रत्नाकर महाजन ,फेडरेशन डायरेक्टर किसन आडम, ऑफिसर श्रीनिवास कोंडले व माजी फेडरेशन व्हाईस प्रेसिडेंट नागनाथ कोंडा, मेघनाथ येमूल व हरिनिवास सोमा उपस्थित होते. प्रारंभी नागनाथ कोंडा यांनी प्रास्तावीक केले. शपथप्रधान अधिकारी किसन आडम यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. कार्यक्रमास सेडाचे अध्यक्ष आनंद येमूल, विवेक महिंद्रकर, श्रीधर बुरा,नारायण छाब्रिया, शावरप्पा नोरा,मनोहर कोडम, आदिनारायण पडाल,भास्कर पिट्टा, अनिल व्हनमाने, चंद्रकांत गालपल्ली, मदन बुर्गुल आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. विठ्ठल वंगा यांनी तर श्रीनिवास कोंडले यांनी आभार मानले.



### नूमवि मराठी शाळेत इंटर ॲक्टिव बोर्डचे उद्घाटन

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

नू.म.वि. मराठी शाळेत इंटर ॲक्टिव बोर्डचे उद्घाटन बापूसाहेब जमादार, शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या हस्ते व अनिल थोरबोले, मुख्याध्यापिका वर्षा जेधे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. मुख्याध्यापिका जेथे यांनी प्रास्ताविकेतून तंत्रज्ञानाचा वापर केल्यास शिकवण्याचा व शिकण्याचा अनुभव अधिक प्रभावी होते. तंत्रज्ञान ही दिशा आहे, पण ज्ञान हेच खरे उद्दिष्ट असे सांगितले. जमादार साहेब मार्गदर्शन करताना सर्व शिक्षकाने इंटरक्टिव्ह बोर्डाचा वापर जास्तीत जास्त करून मुलांचे ज्ञान अद्ययावत करावे. सूत्रसंचालन व आभार रोहिणी चौधरी यांनी केले.

### मंत्रीचंडक पार्क सोसायटी चेअरमनपदी दिपक पवार

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

मंत्री चंडक पार्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. विजापूर रोड येथील १५ बिनविरोध नवनिर्वाचित संचालकांची तालुका सहकारी निवडणूक निर्णय अधिकारी व्ही. टी. चवरे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात पहिली सभा संपन्न झाली. या संस्थेच्या सन २०२५-२६ ते २०२९-३० या कार्यकालासाठी चेअरमन दिपक पवार यांची एकमताने निवड करण्यात आली असून सचिवपदी प्रा. तडमोड सरदार महंमदली आणि कोषाध्यक्षपदी येवले सोमनाथ अप्पासाहेब यांची निवड करण्यात आली. चवरे यांनी त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा केली. याप्रसंगी नवनिर्वाचित संचालक ज्येष्ठ विधिज्ञ जवळगी महादेव, स्वामी मल्लय्या, व्हनमराठे रेवणसिद्ध, पवार दिगंबर, पाटोळे नारायण, कुलकर्णी विनायक, परीक्षाळे रावसाहेब, पवार सुरेश, क्षिरसागर विकास, कदम रत्नमाला, कांबळे जयश्री, इत्यादी. बहुसंख्य संचालक सभेला आवर्जून उपस्थित राहून सहकार्य केले. उपरोक्त सभेचे सूत्रसंचालन प्रा. तडमोड सरदार तर आभार कदम अरुण यांनी मानले.

# बाजार समिती निवडणूक प्रक्रिया सुरू परंतु केंद्रच निश्चित नाही

## प्रचारात येताहेत अडचणी; उमेदवारांनी केली केंद्र ठरवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या मतदान प्रकियेसाठी केवळ ८ दिवसच शिल्लक आहे. मतदान केंद्र निश्चित न झाल्याने उमेदवारांना प्रचार करण्यासाठी अडचणी येत असून, निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्वरित मतदान केंद्र निश्चित करावेत. अशी मागणी उमेदवाराच्या वतीने करण्यात येत आहे.



दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण व उत्तर सोलापूर तालुक्याचे कार्यक्षेत्र असलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणूक प्रकियेस गती आली आहे. सण २०२४ ते २०२९ म धील १८ संचालक मंडळासाठी ७० उमेदवार रिंगणात आहेत. उत्तर,दक्षिण व अक्कलकोट मधील अनेक नेते,आजी माजी आमदार यांनी पॅनलच्या माध्यमातून आपली उमेदवारी निश्चित केली आहे. दोन पॅनेलच्या माध्यमातून ,३० उमेदवार आपले नशीब अजमावणार असले तरी आणखीन ४० उमेदवारही मैदानात उतरले आहेत. यामध्ये सहकारी सोसायटी,ग्रामपंचायत, व्यापारी व हमाल -तोलार मधील उमेदवाराची नावे पॅनलमध्ये समाविष्ट झाली असल्याने पॅनलमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे.

रविवार (दि.२७) एप्रिल २५ रोजी मतदान होणार आहे. मात्र मतदान प्रकिया कुठे होणार,स्थळ निश्चित न झाल्याने प्रचारात मतदारांना स्थळ सांगण्यासाठी कालावधी कमी प्रम णात मिळणार आहे.मतदान केंद्र अंतिम झाल्याशिवाय माहितीपत्रक छापता येत नाही. त्यामुळेच लवकरात लवकर स्थळ निश्चित करण्यात यावे, अशी मागणी आता उमेदवारांकडून केली जात आहे. मागील नियोजनानुसार सोसायटी व ग्रामपंचायत मतदान हे स्थानिक स्तरावरील गावातच तर हमाल - तोलार व व्यापारी संघासाठी सोलापूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी घेण्यात आले होते. यंदाच्या निवडणूकीमध्ये मागील प्रमाणेच नियोजन होईल, असे म्हटले जात असून मतदान केंद्र लवकर जाहीर केल्यास नियोजनबद्ध प्रचार होण्यासाठी मदत होणार असल्याचे उमेदवारांनी सांगितले आहे.

## डॉ. आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीची तयारी



**सोलापूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त रविवारी काढण्यात येणाऱ्या सामाजिक प्रबोधनाच्या मिरवणुकीतील देखावे तयार करताना पीजी ग्रुपचे कार्यकर्ते. शनिवारी टिपलेले छायाचित्र. (छायाचित्र : केवल तिवारी)**

# भावजयीस ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दिरास मुंबई उच्च न्यायालयातून अटकपूर्व जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

भावजईस जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दिर शेखर बाळासो कडलासकर, वय २७, रा- देवडे ता- पंढरपूर, जि:- सोलापूर यास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राजेश पाटील यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला.

सविता कडलासकर हिचे लग्न पोपट कडलासकर याच्यासोबत २००७ साली झाले होते, लग्नानंतर पतीचे अनैतिक संबंध असल्याबाबत तिला समजले होते. ही बाब तिने तिच्या सासू सासऱ्यांना सांगितली होती, त्यावेळी तिस सर्वांनी बेदम म ारहाण केली होती. दि:- २३/०७/२०१८ रोजी सविता हिने अभ्यास करण्याच्या कारणावरून मुलीस रागावले असता, तिस पती सासू सासरे व दिर यांनी मारहाण करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला होता, अशा आशयाची फिर्याद सविता



हिने सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचार घेत असताना दिली होती. त्यावरून करकम पोलीस ठाणे, ता- पंढरपूर येथे गुन्हा दाखल झाला होता. आपणास अटक होऊ नये म्हणून म्हणून आरोपी शेखर याने पंढरपूर सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता, तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता.

त्यावर आरोपी शेखर याने ॲड. रितेश थोबडे यांचेमार्फत मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता.

जामीन अर्जाच्या सुनावणीच्या वेळी ॲड. रितेश थोबडे यांनी आपले युक्तीवादात, सदरचा गुन्ह्यात इतर आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल होऊन खटला पूर्णत्वात आला असून आरोपीची कोठडीची आवश्यकता नसल्याचा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायमूर्तींनी ३०,०००/- रुपयांच्या जातमुचलक्यावर आरोपीस जामीन मंजूर केला. यात आरोपीतर्फे ॲड. रितेश थोबडे यांनी तर सरकारतर्फे ॲड. पल्लवी दाभोळकर यांनी काम पाहिले.

### मुलाला मारताना सोडविण्यासाठी गेलेल्या आईला मारहाण

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

न्यू बुधवार पेठ येथे शुक्रवारी रात्री १०.३० वाजता मुलाला मारहाण होताना सोडविण्यासाठी गेलेल्या आईलाही मारहाण करण्यात आली. निर्मला महानंद शिंदे (वय ४८, रा. न्यू बुधवार पेठ) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. शुक्रवारी रात्री निर्मला या डॉ. आंबेडकर उदयान येथील भावाच्या घरी गेल्या होत्या. त्यावेळी तेथे शिवाजी गायकवाड व इतर तीन हे यशपाल यास मारहाण करत होते. ते भांडण सोडविण्यासाठी निर्मला गेल्या असता, त्यांना शिवाजी गायकवाडसह इतरांनी मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने मुलगा यशपाल याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### गरम पाण्याचे पातेले पडून तरुणी जखमी

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

आंघोळीसाठी गरम पाण्याने भरलेले पातेले नेत असताना ते पायावर पडल्याने तरुणी भाजून जखमी झाली. हा प्रकार न्यू बुधवार पेठ येथे १२ एप्रिल रोजी सकाळी ९.३० वाजता घडला.प्रज्ञा हिरालाल मस्के (वय १८, रा. न्यू बुधवार पेठ) असे तरुणीचे नाव आहे. १२ एप्रिल रोजी प्रजा हि आंघोळीसाठी गरम पाणी असलेले पातेले उचलून नेत होती. त्यावेळी त्या पातेलेत्यातील पाणी पायावर पडून भाजल्याने शनिवारी दुपारी १२.३० वाजता नणंद रजनी मस्के यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर अनंतात विलीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

शहरातील प्रसिध्द मेंदू विकार तज्ञ डॉ. शिरिष वळसंगकर यांच्या पार्थिवावर श्राश्रू नयनांनी मोदी स्मशानभूमीतील विद्युत दाहिनेमध्ये शनिवारी दुपारी साडे चार वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान अंत्यविधीवेळी एसपी हॉस्पिटलच्या कर्मचा-यांना शोक अनावर झाला. त्यामुळे उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा पानावल्या. अंत्य विधीसाठी इंडियन मेडीकल असोसिएशन, निमा व होमिओपॅथी संघटनेचे पदाधिकारी यांची उपस्थित होते.



डॉ. वळसंगकर यांनी शुक्रवारी रात्री ८.३० वाजण्याच्या सुमारास मोदी परिसरातील त्यांच्या राहत्या घरात डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केली. त्यानंतर तातडीने त्यांना उपचारासाठी एसपी रुग्णालयात हलवले. तज्ञांनी त्यांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र काळाच्या पढे त्यांचे काहीएक चालले नाही. स्वत : उभ्या केलेल्या हॉस्पीटलमध्येच त्यांनी शेवटचा श्वास घेतला. शनिवारी पहाटेच्या सुमारास शव विच्छेदन करण्यासाठी पार्थिव सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. सिव्हिलच्या न्याय वैद्यक शास्त्र विभागाच्या टीमकडून त्याचे शव विच्छेदन करण्यात आले. त्याच्या प्राथमिक अहवालातही डोक्यात गोळी झाडून आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. शव विच्छेदन एक वाजता झाल्यानंतर डॉ. वळसंगकर यांचे पार्थिव सात रस्ता येथील घरी हलवण्यात आले. दुपारी एक ते चार च्या सुमारास पार्थिव दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. अनेक मान्यवरांनी त्याच्या पार्थिवाचे शेवटचे दर्शन घेतले. दुपारी चार वाजता अंत्यविधी करण्यासाठी पार्थिव रुग्णवाहिकेतून हलवण्यात आले. ४ वाजून २० मिनिटांनी पार्थिव मोदी स्मशानभूमीत पोहोचले. अंत्यसंस्काराची विधी झाल्यानंतर साडे चार वाजता विद्युत दाहिनीम ध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीच्या वेळी डॉ.अश्विन वळसंगकर, डॉ. सतीश वळसंगकर, डॉ. नितीन ढेपे, डॉ.दत्तप्रसन्न काटीकर, डॉ.एस.प्रभाकर आदींसह त्याचे नातेवाईक व मित्रमंडळी उपस्थित होते.

# जयंती महोत्सवात भीम विचार, कार्याचा जागर

## ‘वाचू संविधान १२ तास’ उपक्रम ठरला मानदंड; मिलिंद व्याख्यानमालेचा रौप्य महोत्सव

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सोलापुरातील विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा देशात नावलौकिक आहे. येथील मिरवणूक सर्वात मोठी आणि दिमाखदार अशी काढण्यात येते. त्याचबरोबर डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा जागरही या महोत्सवात होतो. मिलिंद व्याख्यानमालेच्या माध्यम ातून एक विचार पर्वणी देण्यात आली. ‘‘वाचू संविधान १२ तास‘‘ उपक्रम मानदंड ठरला. शाहीर संभाजी भगत यांच्या जलसा कार्यक्रमाने स्फूल्लिंग चेतवले.

शहरात भीम जयंती मोठ्या उत्साही वातावरणात साजरी केली जाते यंदा दिनांक १४ ते २० एप्रिल दरम्यान भीम जयंती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या दरम्यान, विविध सामाजिक संस्था , संघटनांच्या म ाध्यमातून विविध उपक्रमाद्वारे भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या कार्य आणि विचारांचा जागर करण्यात आला.

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १८ तास अभ्यास केला. तो आदर्श पुढे ठेवत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून डॉ. वै. स्मृ. शा. वैद्यकीय महाविद्यालय व म हाकारुणिक एज्युकेशनल फौंडेशन याच्या विद्यमाने ‘‘वाचू संविधान १२ तास‘‘ हा अभिनव उपक्रम डॉ. व्ही. एम. मेडीकल कॉलेजच्या ग्रंथालयात घेण्यात आला. हा कार्यक्रम या जयंतीचा एक मानदंड ठरला.







सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत संविधान वाचनाची ही स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्धा महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

कार्यक्रमाचे संयोजक प्रा.डॉ. औदुंबर मस्के, डॉ. शुक्लधन रोडे, डॉ. संचीत खरे, ॲड. रवी गजधाने, प्रवीण सोनवणे, ॲड. अमित कांबळे, अशोक मस्के, आनंद शिंदे, विशाल इरागंटी होते.

**ड्रीम फाउंडेशन तर्फे ७५ तास वाचन अभ्यास**

ड्रीम फाउंडेशन, जय हिंद करिअर अकॅडमी, चाणक्य गुरुकुल यांच्या संयुक्त विद्यमाने ७५ तास वाचन - अभ्यास अभिवादन उपक्रम पार पडला. संस्थापक काशिनाथ भतगुणकी, संगीता भतगुणकी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या अनेक वर्षापासून उपक्रम राबविण्यात येतो.

**सम्यक विचार मंचची मिलिंद व्याख्यानमाला**

येथील सम्यक विचारमंचच्या वतीने मिलिंद व्याख्यानमालेच्या माध्यमातून महापुरुषांच्या विचारांचा जागर करण्यात आला. महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती ते डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीपर्यंत चार दिवसीय व्याख्यानमालेत विचार मंथन घडले. व्याख्यानमालेचे हे रौप्य महोत्सव आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून अखंडितपणे विचार मंथन घडविण्यात येते. आतापर्यंत सुमारे १०० वक्त्यांनी व्याख्यान दिले आहे. अध्यक्ष चंद्रकांत कोळेकर, सचिव सुधीर चंदनशिवे यांच्यासह पदाधिकारी सातत्यपूर्ण परिश्रम घेतात.

**शाहीर संभाजी भगत यांच्या जलसा कार्यक्रमाने स्फूल्लिंग चेतवले**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने डॉ. आंबेडकर उद्यानात अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांच्या मार्गदर्शनाखाली शाहीर संभाजी भगत यांच्या जलसा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाहिरीच्या माध्यमातून त्यांनी उपस्थितांमध्ये स्फूल्लिंग चेतवले.

**‘सम्यक’ आणि लोकराजा फाउंडेशनतर्फे प्रज्ञाशोध परीक्षा**

भीमजयंती निमित्त सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सम्यक प्रज्ञाशोध परीक्षा घेण्यात आली. डॉ. आंबेडकरांनी दिलेला शासनकर्ती जमात व्हा हा संदेश आत्मसात करून स्पर्धा परीक्षेचा सराव या माध्यमातून घेण्यात येतो.

**‘भीम बंधू माझा’ ओव्याद्वारे अभिवादन**

‘भीम बंधू माझा’ हा ओव्याद्वारे अभिवादन कार्यक्रम हा विशेष आकर्षण ठरला. ओवी गायनातून भगिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यामध्ये डॉ. अंजना गायकवाड, डॉ. वनिता चंदनशिवे, सुनिता गायकवाड, सुचित्रा थोरे, शीला हावळे यांनी सहभाग नोंदवला.

**भीम प्रतिष्ठानचा रौप्य महोत्सवी पुरस्कार वितरण सोहळा**

येथील भीम प्रतिष्ठानच वतीने संस्थापक बाबा बाबरे यांच्या मार्गदर्शनाखाली रौप्य महोत्सवी पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात येतो. सुमारे दीडशे ते दोनशे मान्यवरांचा या पंचवीस वर्षात सन्मान करण्यात आला. उल्लेखनीय कार्याची प्रेरणा इतरांना मिळावी या उदात्त हेतूने हा कार्यक्रम नियमितपणे घेण्यात येतो. अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे यांच्यासह पदाधिकारी यासाठी प्रयत्नशील असतात.

**उत्तम सोशल फाउंडेशनतर्फे मेरा जीवनही मेरा संदेश है कार्यक्रम**

उत्तम सोशल फाउंडेशनतर्फे ‘मेरा जीवनही मेरा संदेश है’ या उपक्रमांतर्गत नृत्य-गायनाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन प्रवास सादर करण्यात आला.बोधीवृक्ष फाउंडेशनच्या वतीने अध्यक्ष अजयकुम ार भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने एकूण २ हजार वृक्षांचे रोपण करण्याचा उपक्रम हाती घेतला. नेत्रदान संकल्प तसेच बोधिवृक्ष बँक संकल्पना राबविण्यात येत आहे.


**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## घर बांधायला पैसे घेवून ये म्हणत विवाहितेस क्रूर वागणूक

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

विवाहितेस लग्नात सोने व पैसे दिले नाहीत, फुकट आलीस, घर, रिक्षा व दुचाकी घेण्यासाठी पैसे घेवून ये म्हणत विवाहितेस क्रुर वागणूक दिली. याप्रकरणी पतीसह सासरच्या सहा जणांवर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत पद्मिनी रामदास कोळेकर (वय ३८, रा.रोहिणी नगर भाग ३, जुळे सोलापूर) यांनी फिर्याद दिल्याने पती रामदास, सासू शांताबाई, सासरा यशवंत, दीर रमेश(सर्व रा. औज.ता. दक्षिण सोलापूर)अशी आरोपींची नावे आहेत. ही घटना १९ जून २०११ ते आजतागायत पर्यंत दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज या ठिकाणी घडली आहे. फिर्यादी ही सासरी नांदत होती. आरोपींनी तीस वेळोवेळी लग्नात सोने व पैसे न आणता फुकट आलीस असे म्हणून टोमणे मारून त्रास दिला. घर बांधयला, दुचाकी घेण्याकरता ८० हजार व रिक्षा घेण्यासाठी १ लाख रुपये घेवून ये असे म्हणून फिर्यादीस क्रुर वागणूक दिली आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस हवालदार गावडे करीत आहेत.



### महत्वाचे...

## लिमयेवाडीत गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

अज्ञात कारणातून तरुणाने राहत्या घरात फेट्याच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार शुक्रवारी दुपारी चारच्या सुमारास उघडकीस आला.



संतोष बसवराज गायकवाड (वय ३५, रा. लिमयेवाडी) असे तरुणाचे नाव आहे. संतोष राहत्या घराच्या लोखंडी बारला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला गळफासातून सोडवून नातेवाईक राहुल याने सायंकाळी पाच वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## बाजूच्या दुचाकीबरोबर अपघात होऊन दोघे जखमी

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सोलापूर ते मुस्ती असे दुचाकीवरून जाताना बाजूने जाणा-या दुचाकीबरोबर झालेल्या अपघातात दोघे जखमी झाले. हा अपघात



दोड्डी फाट्याजवळ शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास घडला. नवनाथ नरसिंग गेजगे (वय २७) व दिपक सिध्दु केंगार (वय २३, रा. दोघे मुस्ती ता. द. सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. शुक्रवारी सायंकाळी ६.३० वाजता सोलापूरहून मुस्तीकडे जात होते. दरम्यान दोड्डी फाट्याजवळ आल्यानंतर बाजूने जाणा-या दुचाकीला धडक बसली. यात नवनाथच्या डोक्याला, खांद्याला व पाठीला मार लागला तर दिपकच्या चेह-याला जखम झाली व उजव्या पायाला मार लागल्याने युवराज गोडले याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## सुट्टे पैशाची मागणी करीत पंपावरून २५ हजारांची चोरी

**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सुट्टे पैसाची मागणी करीत पेट्रोल पंपावरील गल्ल्यातून २५ हजाराचा रक्कम चोरी केली आहे. याबाबत उमेश मल्लिनाथ वाडीकर वय ५३ रा. प्लॉट नं ४२ कितुरचन्नमा नगर, सैफुल सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात व्यक्ती विरुध्द एमआयडीसी पोलिसांत १८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ एप्रिल रोजी दुपारी साडे चार च्या सुमारास अक्कलकोट रोडवरील सादुल पेट्रोलंपपावर घडली. फिर्यादी हे अक्कलकोट रोड, श्री स्वामी समर्थ ऑटो सेंटरवर च्या सादुल पेट्रोल पंपावर काम करतात. पेट्रोल पंपावर दिवसभर जमा झालेल्या रोख रकमेची मोजणी करत होते. मोजणी करत असताना रोख रकमेपैकी २५ हजार ही रक्कम लबाडीने चोरून नेल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे.

# व्यापाऱ्यांकडून छुप्या पद्धतीने अडत वसुली सुरुच

- बाजार समितीत व्यापाऱ्यांचा सुलतानी कारभार
- कलिंगडे न मोजताच तोलाई वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

बाजार समितीत कलिंगडे विक्रीसाठी आणल्यानंतर शेतकऱ्यांकडून दोन टक्के आडत व नियमापेक्षा जास्त हमाली तोलाई वसूल केली जात आहे. आडत बंदीचा कायदा होऊन तब्बल दहा वर्षे उलटले तरी छुप्या पद्धतीने अडत वसुली सुरुच आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांकडून कैरेट भाडे व इतर बाबींच्या नावाखाली लूट सुरू आहे.

मंद्रुप येथील शेतकऱ्याने सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कलिंगडे विक्रीसाठी आणली होती. कलिंगडे विक्री करण्यासाठी त्यांनी दोन अडत्याकडे आपली फळे विक्रीसाठी ठेवली. यापैकी एका अडत्याने कलिंगडे विक्रीनंतर दिलेल्या पावतीवर छुप्या पद्धतीने दोन टक्के अडत, कैरेट भाडे तसेच दुप्पट दराने हमाली, तोलाई वसूल केली. वास्तविक कलिंगडे



विक्रीसाठी आणल्यानंतर कुठल्याही प्रकारची मोजदाद करण्यात आली नाही. कलिंगडे कैरेट भरून ठेवण्यात आली होती. तसाच त्यांचा लिलाव झाला. मात्र, नियमाचा फायदा घेत अडत्याने शेतकऱ्याची ही लूट केल्याची तक्रार करण्यात आली आहे. यासंदर्भात मंद्रुप येथील शेतकरी रवी मेत्रे यांनी बाजार समिती प्रशासनाकडे रीतसर लेखी तक्रार दाखल केली आहे. त्याच दिवशी दुसऱ्या अडत्याकडे विकलेल्या कलिंगडाला कुठलेही छुपे खर्च लावलेले दिसून आले नाहीत. २०१४ मध्ये तत्कालीन पणन व



सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी अडत वसुली बंद करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. मात्र, या निर्णयाची पूर्णपणे कधीच अंमलबजावणी झाली नसल्याचे वारंवार दिसून आले आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काही अपवाद वगळता अडती खरेदी दाराकडून ही अडत वसूल करतात. त्याचबरोबर शेतकऱ्याकडून ही अडत वसूल करतात. मात्र, ही अडत वसूल करताना पावतीवर रोख उचल व इतर खर्च अशा रकान्यामध्ये ही रक्कम टाकली जाते. या संदर्भात बाजार समिती प्रशासनाकडे कित्येक लिखित तक्रारी पडून आहेत. मात्र, या लुटीत बाजार समिती प्रशासन सामील असल्यामुळेच गेली अकरा वर्ष हा गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप होतो. या संदर्भातल्या पावत्या तपासल्या असता प्रत्येक पावतीवर दोन टक्केच रोख उचल कशी येते असा प्रश्न उपस्थित होतो. संबंधित व्यापाऱ्याचे परवाना रद्द करण्याची मागणी शेतकरी मेत्रे यांनी केले आहे.

### अपेक्षित पन्नास हजार, मिळाले ११ हजार रुपये

कलिंगडाला जागेवरच व्यापाऱ्यांनी प्रति किलो सहा रुपये इतक्या दराने मागितले. मात्र सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील अडत्यांनी आपण यापेक्षाही जास्त भाव मिळवून देऊ असे आमिष दाखवले. यामुळे कलिंगडे सोलापूरला विक्रीसाठी आणली. मात्र या विक्रीतून दोन्ही अडत्याकडून त्यांना एकूण ११ हजार रुपये इतकीच रक्कम हातात पडली. माझ्याकडून दोन टक्के आडत वसूल करण्यात आली. विचारणा केली असता आमच्या अडत संघटनेचा निर्णय असल्याची माहिती दिली. प्रशासनाची डोळेझाक असल्यामुळेच हा प्रकार निरंतर सुरू आहे.

**- रवी म्हेत्रे, शेतकरी, मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर.**

### अद्याप मला माहिती नाही

तक्रार प्राप्त झाली असल्यास त्यावर कारवाई केली जाईल. अडत वसूल केली जात असल्याबाबत अद्याप मला माहिती नाही, याबाबत मी सखोल चौकशी करून पुढील कारवाई करणार आहे .

**- प्रगती बागल, प्रशासक, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती**

### संबंधित व्यापाऱ्याला प्रशासनाकडून नोटीस

शेतकऱ्यांनी अडतसह इतर खर्चाबाबत बाजार समिती प्रशासनाकडे लेखी तक्रार दिल्यानंतर बाजार समितिकडून संबंधित व्यापाऱ्याला नोटीस देण्यात आल्याचे या विभागाचे प्रमुख महेश बोराळकर यांनी सांगितले.

## गीत गायनाच्या कार्यक्रमात नाव घेण्याच्या कारणावरून मारहाण

### आठ जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

भीम गीत गायनामध्ये गायकाने नाव न घेतल्याच्या कारणावरून मारहाण झाली. यामध्ये आठ जणांवर फौजदार चावडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. याबावत दिलीप रोहिदास फडतरे (वय ५० रा.गंगानगर लक्ष्मी पेठ सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रोनक गायकवाड, दत्ता गायकवाड, रविराज सोनकांबळे, नंदीत गायकवाड, मयूर गायकवाड, देवराज सोनकांबळे, अनिकेत रणसुर, मोहित गायकवाड (सर्व रा.हब्बू वस्ती,जुना देगाव नाका, सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. ही घटना जुना देगाव नाका, हब्बू वस्ती या ठिकाणी घडली आहे. या ठिकाणी सुहास सदाफुले या गायकाच्या भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित केला होता.

कार्यक्रम रात्री आठच्या सुमारास सुरु झाला होता. तो कार्यक्रम पाहण्यासाठी हब्बू वस्ती व परिसरातील लोक तसेच मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. भीम गीतांच्या कार्यक्रमाच्या शेवटी गायक सुहास सदाफुले यांनी फिर्यादीचे व एन.के.उर्फ नवनाथ क्षीरसागर यां दोघांचे नाव घेतले होते. हा कार्यक्रम पाहण्यास आलेला रोनक गायकवाड हा कार्यक्रमाच्या मध्ये उठून तुम्ही सरांचे नाव का घेता, त्याच्या या कार्यक्रमाशी काय संबंध आहे, असे म्हणून कार्यक्रम बंद करा म्हणून जोरजोरात ओरडू लागला. तेव्हा फिर्यादीच्या पुतण्या व बी.आर.क्रीडा व युवक सेवा मंडळाच्या खजिनदार सचिन फडतरे याने रोनक गायकवाड यास गोंधळ का घालतोस, कार्यक्रम बंद करून नको हा कार्यक्रम आपल्या सर्वांचा आहे. असे सांगत असताना रोनक याने फिर्यादीस व सचिन फडतरेला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करण्यात सुरवात केली.

फिर्यादी त्यास शिवीगाळ करू नको, असे बोलत असताना कार्यक्रमाच्या ठिकाणी आलेल्या रोनकचा भाऊ व इतर जणांनी मारहाण केली. रोनक याने धारधार शस्त्राने फिर्यादीच्या कपाळावर वार केला. भांडणे सोडवण्यासाठी आलेल्यांनाही मारहाण केली आहे. ऋषीकेश फडतरे व रविराज सोनकांबळे यांनी त्याच्या जवळील असलेल्या फायटरने मारून जबर दुखापत केली.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आज सांगता मिरवणूक

- १८०० पोलिसांचा शहरात बंदोबस्त तैनात असणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिलपासून सुरू असलेल्या सप्ताहाचे सांगता रविवारी मिरवणुकीने होणार आहे यासाठी शहर पोलिसांच्या वतीने सुमारे १८०० पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे

डॉ. आंबेडकर यांची जयंती सोलापुरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येते १४ एप्रिलपासून शहरात विविध सार्वजनिक मंडळाच्या वतीने बाबासाहेबांच्या प्रतिमेचे तसेच मूर्तीची प्रतिष्ठापना करून जयंती उत्सव साजरा करण्यात येतो. या उत्सवाच्या सप्ताहाची सांगता रविवारी २० एप्रिल रोजी निघणाऱ्या मिरवणुकीने होणार आहे यासाठी शहर पोलिसांच्या वतीने पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली शहरात ३ पोलीस उपायुक्त, ५ सहा. पोलीस आयुक्त, २३ पोलीस निरीक्षक, ६० पोलीस उपनिरीक्षक अकराशे पोलीस कर्मचारी ५०० होमगार्ड तसेच राज्य राखीव बलाची एक कंपनी असा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. त्याशिवाय शहरात २५ ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आलेले आहेत. मिरवणुकीकरिता पोलीस बंदोबस्त तसेच पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात आलेली आहे. वाहतुकीची कोणतीही समस्या निर्माण होऊ नये म्हणून शहर वाहतूक शाखेतील स्वतंत्र पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे रविवारी सकाळी साडे अकराच्या सुमारास डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीस प्रारंभ होईल. डफरीन, जुना एम्प्लॉयमेंट चौक, वाडिया हॉस्पिटल, फॉरेस्ट, रेल्वे स्टेशन, भैय्या चौक, सुपर मार्केट, नवी पेठ, सोन्या मारुती, माणिक चौक, मधला मारुती, बाळीवेस मार्गे ही मिरवणूक मिलिंद नगर येथील अस्थिविहार येथे विसर्जित होते.







## शोएब कुरेशी युवा भिमसेना श्रीचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

येथील शोएब कुरेशी हा जिल्हा शरीरसौष्ठव स्पर्धेतील युवा भिमसेना श्रीचा मानकरी ठरला. त्याला १० हजार रुपये, सन्मान चिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

जुना विडी घरकुल येथे भारतरत्न प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्त सोलापूर व धाराशिव जिल्ह्यासाठी महेश अण्णा डोलारे यांच्या पुढाकाराने व युवा भिम सेना सामाजिक संघटना, महाराष्ट्र राज्य तसेच सोलापूर जिल्हा शरीर सौष्ठव संघटना यांच्या सहकार्याने डॉ. संजय मोरे व राजकुमार सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन केले होते. ५५ ते ७५ किलो अशा ६ वजनी गटातील प्रथम विजेत्याम ध्ये पुन्हा एकदा स्पर्धा झाली. यात शोएबने बाजी मारली.





स्पर्धेचे उदघाटन आमदार विजयकुमार देशमुख, विडी घरकुल पोलीस स्टेशनचे पी.आय. प्रमोद वाघमारे, मुश्ताक शेख, मनिष काळजे, रियाज म ोमीन, लिंगप्पा रामपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या स्पर्धे साठी परिक्षक म्हणून प्रमोद काटे, नजीर शेख, गोरख गडसिंग, शफि शेतसंदी, शकील बडेघर, शरणकुमार कुंभार व रतिकांत पाटील यांनी काम पाहिले. विजयी खेळाडूंचे संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सुरवसे, अजित कंडरे, मनोज भागवत, प्रतिक भागवत, पृथ्वी सुरवसे यांनी अभिनंदन केले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विकास गायकवाड, हारुन मंगलगिरी, व आसिफ शेख यांनी परिश्रम घेतले.

### विविध वजनी गटाचे अंतिम निकाल

५५ किलो : अक्षय जगताप (टेंभूर्णी), निखिल सोनकांबळे (माढा), शुभम सोनवणे (टेंभूर्णी), तेजस माने (सोलापूर).
६० किलो : राजशेखर श्रीराम, राकेश जगताप (सोलापूर), सर्फराज कुरेशी (धाराशिव), प्रतीक कुलकर्णी (सोलापूर).
६५ किलो : शावाद नदाफ (सोलापूर), राजेश प्रजापती (बार्शी), अलोक वर्मा, प्रणव लाळसंगी (सोलापूर),
७० किलो : भिमाशंकर कोरडे, निखिल चव्हाण, इस्माईल शेख, शरणु कुर्ले (सोलापूर).
७५ किलो : आकाश सुरवसे (बाळे), अश्पाक शेख (सोलापूर), चेतन जाधव (वैराग), प्रज्वल माने (टेंभूर्णी).
७५ किलोवरील : शोएब कुरेशी (सोलापूर), लक्ष सुरवसे, शुभम बनसोडे (पंढरपूर).

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०९२

**तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा ।**
**तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।**

वाढत्या लोकसंख्येत माणुसकी जपणाऱ्यांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. अनेकांना माणूसकीची आठवण देण्याची वेळ येत आहे. प्रत्येक व्यक्ती जर माणूस म्हणून वागू लागला तर समाजातील अनेक प्रश्न आपोआप मार्गी लागतील. समाजात नको ते प्रश्न निर्माण करण्यास मूळात माणूसच कारणीभूत आहे. ज्याला माणूसकीची परिभाषा कळत नाही, त्याच्याकडून चुकीच्या कार्यवाह्या होत असतात. समाज तर सोडाच, पण अनेकांना आपल्या कुटूंबातही नीट वागता येत नाही. स्वार्थ व अहंकारी लोक आई-वडीलांनाही योग्य ते स्थान देत नाहीत. पोटचा गोळाच जर नीट नसेल तर आपल्याकडील धन, संपत्तीला काय अर्थ असणार आहे?. खरी धन संपत्ती ही आपली मुलेच होत. आपली मुले जर चांगल्या मार्गावरुन चालत असतील, माणुसकीची जोपासना करीत असतील, तर खरा आनंद मिळतो. आई-वडीलाच्या जीवनाचे खरे उद्दिष्ट हे मुले चांगली घडविण्याचेच असायला हवे. आई-वडीलांनी कष्ट करायचे आणि मुलाने आळशी वृत्तीने वागायचे हे चुकीचे असते. प्रत्येकाला आपली मुले चांगली व्हावीत असे वाटत असते. आई-वडीलांचा तसा प्रयत्नही असतो. आई-वडीलांच्या प्रयत्नाला पुष्टी देण्याचे कार्य मुलांनी करायला हवे. आई-वडीलांची सेवा करायला भाग्य लागते.आईवडील चरणी भगवंत पाहणाऱ्या व सात्वीक वृत्तीने वागणाऱ्याला समाज डोक्यावर घेत असतो. अशा सात्वीक मुलांची महती विचारात घेऊन त्यांची सेवा करण्याची अपेक्षा व्यक्त करतांना तुकाराम महाराज म्हणतात, तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा । तरी माझ्या दैवा पार नाहीं ।।.



आई-वडील चरणी स्वर्ग पाहणाऱ्या सात्विक वृत्तीच्या व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळाली तर आपल्या दैवाला पार असणार नाही. हे जगदगुरु तुकाराम महाराजांचे वाक्य अशा व्यक्तीची महती आपल्या लक्षात आणून देतात. पूर्ण मानव समाज ज्या तुकोबांच्या चरणी लीन होतो, ते तुकोबा सात्वीक वृत्तीच्या व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळण्याची अपेक्षा करतात. यावरुन आई-वडीलांची सेवा, वडीलधाऱ्यांचा मान-सन्मान तसेच डोळस ईश्वर भक्ती इत्यादीची महती आपल्या लक्षात यायला हवी. मानवतेची, माणुसकीची महती जवळपास सर्वांनाच समजते. तरीपण प्रत्यक्ष आचरणात आणणारे कमी आहेत. सर्वांनी जर माणुसकी जोपासली तर खूण, बलात्कार, चोरी, फसवेगिरी अशा वाईट घटना घडणारच नाहीत. स्वार्थ मानवाला मानवतेपासून दूर नेतो आणि काम, क्रोध, मोह, मत्सर, द्वेष, ईर्षा अशा शत्रुंना जवळ आणतो. हे शत्रू मानवाला माणूस म्हणून जगू देत नाहीत. म्हणून महाराजांच्या वचनांवर विश्वास ठेवून आपण सात्वीक वृत्ती बळावेल असे वागायला हवे. प्रत्येकांवर समाजाचे ऋण असते, त्या ऋणाची सात्वीक वृत्तीने परतफेड होईल असा प्रयत्न करायला हवा. आपली सात्वीक वृत्ती समाजाला, कुटूंबातील सर्व घटकांना, संत सज्जनांना तर आनंद देईलच, पण आपणाला स्वत:चा खरा परिचयही करुन देईल. स्वत:चा परिचय हेच आनंदाच्या मंदिराचे खरे शिखर असल्याचे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : रविवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, इस्टर संडे** |
| **दि. २० एप्रिल २०२५** | **काळभैरव व जोगेश्वरी यात्रा** |
| **विक्रम संवत् २०८१** | **....राहू काल....** |
| **शके - १९४७** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **मास - चैत्र** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **कृ. सप्तमी (१९.००)** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **ऋतु - ग्रीष्म** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **नक्षत्र - पूर्वाषाढा (११.४७)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **योग - सिध्द (२४.११)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **करण - विष्टि (०६.४६)** | |

### राशीभविष्य

**मेष :** मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. **वृषभ :** आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका.

**मिथुन :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील.

**सिंह :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल.

**कन्या :** मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील.

**धनु :** आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल. आर्थिक योजना वेळेत पूर्ण होतील. आळस करू नका.

**मकर :** नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन :** आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या. व्यापारा निमित्ताने केलेला प्रवास सफल होईल. अश्वासन देऊ नका.

# टिकेकरवाडीच्या प्रस्तावास मिळणार का ग्रीन सिग्नल?

## रेल्वे बोर्डाने पुन्हा एकदा मागवला सुधारित प्रस्ताव; सोलापूरकरांना नवीन रेल्वे मिळण्यासाठी टर्मिनस होणे गरजेचे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ एप्रिल-**

सोलापूर शहराजवळ टिकेकरवाडी येथे ३८३ कोटी रुपये खर्चुन नवे टर्मिनस आणि वर्कशॉप बांधण्यासाठी सोलापूर विभागीय रेल्वेने मागील वर्षी रेल्वे मंडळाला प्रस्ताव दिला होता. त्यावर निर्णय झाला नाही. मात्र, मंडळाने तो प्रस्ताव पुन्हा पाठवण्यास सांगितले आहे. त्यामुळे आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. सध्याच्या स्टेशनची मर्यादा पाहता हे टर्मिनस झाल्याशिवाय सोलापूरकरांना नवीन रेल्वेगाडी मिळणार नाही, अशी स्थिती आहे. प्रस्ताव मागवल्याने मंडळ सकारात्मक असल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### रेल्वे मंत्र्यांना पुन्हा एकदा भेटेन



टिकेकरवाडी येथे टर्मिनससाठी रेल्वे विभागाचा प्रस्ताव आहे. त्यास मान्यता मिळावी म्हणून पंधरा दिवसापूर्वी रेल्वे मंत्री अश्विन वैष्णव यांनाभेटले. पुन्हा पाठपुरावा करते.'

**- खासदार प्रणिती शिंदे**

### रेल्वे बोर्ड सकारात्मक

टिकेकरवाडी येथे टर्मिनस होण्य जागा उपलब्ध आहे. त्यामुळे रेल्वे मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठवला आहे. यासाठी रेल्वे विभाग सकारात्मक पध्दतीने पाहत असून, लवकरच मंजुरी मिळेल.'

**- योगेश पाटील, मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, सोलापूर रेल्वे**

दरम्यान, नवीन रेल्वेगाडी सुरू करण्यासाठी अतिरिक्त रूळांची गरज असते. रेल्वे स्टेशन येथे डब्यांची खभाल करण्यासाठी तीन पिट लाइन आहेत. वर सिद्धेश्वर, हसन, वंदे भारत एक्स्प्रेस,हुतात्मा एक्स्प्रेस, तसेच पॅसेंजर गाड्यांचा समावेश आहे. सोलापुरातून दिल्ली, पुणे, तिरुपती, मुंबई, राजकोट येथे नवीन रेल्वे करण्याची प्रवाशी संघटनेची जुनी मागणी आहे. दरम्यान, टिकेकरवाडी येथे टर्मिनस झाले. तर त्याचा फायदा दक्षिण सोलापूर तसेच जुळे सोलापुरातील नागरिकांना होणार आहे. येथील स्टेशन मधून नव्या रेल्वे गाड्या सुटतील. जुळे सोलापूरसह दक्षिण सोलापुरातील नागरिकांना तेथून रेल्वेने प्रवास करता येईल. रेल्वे स्टेशनपर्यंत जाण्याचा वेळ वाचेल.

घराजवळ स्टेशन होईल. तेथे पार्किंगची सोय होईल आणि गाड्या सावलीत राहतील. त्या परिसरात नव्याने रोजगार निर्माण होईल. प्लॅटफॉर्म अभावी गाड्या सिग्नल थांबणे बंद होतील.

# रोजंदारी सेवकांच्या कागदपत्र पूर्ततेसाठी शिबीर

## 'या' अहवालानुसार होणार यादी अद्यावत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

महापालिकेतील सन १९९५ नंतरचे रोजंदारी/बदली कर्मचारी यांची माहिती शासनाकडे प्रस्तावित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची मागणी केली होती. त्या अनुषंगाने आज महापालिका कौन्सिल हॉल सभागृहात रोजंदारी / बदली सेवकांबाबत कागदपत्राची पूर्तता करण्यासाठी एक दिवस शिबीर घेण्यात आले. या अहवालानुसार यादी अद्यावत होणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे एक दिवसीय शिबिर घेण्यात आले. महापालिका सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी यांच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी प्रक्रिया पार पाडली. या शिबिरात सादर केलेल्या अहवालानुसार यादी अद्यावत होणार आहे. सर्व संबधित खाते/विभाग प्रमुख व सर्व सेवक उपस्थित होते.



### वैयक्तीक संचिका तयार करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे अशी

आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वैयक्तीक संचिका तयार करण्यात येत आहे. यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांचे मुळ नियुक्ती आदेश, प्रथम नियुक्ती झाल्यापासून ३ महिन्यातील वेतन पत्रिका/पगार बिलाचे छायाकित प्रत, हजेरी पुस्तकाचे पान ही सर्व कागदपत्रे खाते प्रमुख यांनी साक्षांकित करुन माहिती सादर करावयाची आहेत.

सन १९९५ नंतरचे २४९ रोजंदारी / बदली कर्मचारी यांची माहिती शासनाकडे प्रस्तावित करण्या करीता आवश्यक कागदपत्रांची मागणी केली होती. परंतु सर्व प्रकरणाचे अवलोकन केले असता अनेक सेवकांचे वैद्यकीक संचिकेमध्ये तफावत आढळून आले आहे. संबंधित विभाग/खाते प्रमुख यांना रोजंदारी/बदली सेवकांचे संचिका तयार करुन व सर्व अभिलेख हे प्रमाणित करुन (कार्यरत, मयत, गैरहजर, सेवानिवृत्त) या कार्यालयाकडे तात्काळ २४ तासाच्या आत माहिती सादर करण्यात यावे असे अंतिम आदेशित करण्यात आले होते. यामुळे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी वैयक्तीक संचिका तयार करण्यात येत आहे. दरम्यान, संबंधित खात्याकडून व सेवकांकडून कोणत्याही प्रकारचे कागदपत्राची पूर्तता होत नसल्यास या बाबत खाते/विभाग प्रमुख यांनी सद्याची वस्तुस्थितीस अनुसरुन या कार्यालयाकडे लेखी कळविण्यात यावे. याबाबत कोणत्याही प्रकारची दिरंगाई होणार नाही यांची दक्षता घ्यावी असे सूचित केले होते.



## शहा कोठारी हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूल मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरा करण्यात आली. कार्यक्रमास मुख्याध्यापक रमेश यादवाड अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. प्रशालेतील शिक्षकेतर कर्मचारी खंडू सोनवले व शिवशरण यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. प्रशालेतील विद्यार्थिनी सृष्टी कोळी, सिद्धार्थ सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन बनसोडे, चंदनशिवे यांनी केले तर आराध्या नाडगुंडे यांनी आभार मानले.



## रेवप्पा कोळी यांना पीएच.डी पदवी प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

संगमेश्वर महाविद्यालय येथे गेल्या २१ वर्षापासून शिक्षकेतर कर्मचारी म्हणून त्यासोबत संगमेश्वर रात्र महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले रेवप्पा सिद्धप्पा कोळी यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयातील पीएच. डी पदवी प्रदान करण्यात आली. त्यांना वसुंधरा कला महाविद्यालय येथील प्रा. डॉ. राजाराम पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील सेवक सहकारी पतसंस्थांचा विश्लेषणात्मक अभ्यास या विषयावर शोधप्रबंध सादर केला. यावेळी मौखिक परीक्षेचे अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. बी. एच.दामजी, बहिस्त पर्यवेक्षक प्रा. डॉ. सुनील नरवडे ( छत्रपती संभाजी नगर) प्रा. डॉ. जम्मा अविनाश, प्रा. डॉ. कांबळे एम.बी. उपस्थित होते. या मिळवलेल्या यशाबद्दल संगमेश्वर महाविद्यालयाचे अध्यक्ष धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य ऋतुराज बुवा, संगमेश्वर रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. गोटे, उपप्राचार्य एस एस पाटील, प्रा. वांगी एस. एस, प्रा. काळे एम. के, प्रा. कुलकर्णी एस. पी. यांच्यासमवेत प्राध्यापक प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# सोलापुरात २६ एप्रिलला बौद्ध विचारांवरील कवी संमेलन

## राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलनाअंतर्गत उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

सोलापूर नगरीत होणाऱ्या राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलना अंतर्गत शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरातील रंगभवन नजीकच्या समाज कल्याण केंद्र येथे बौद्ध विचारांवर आधारित कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे.




सोलापूर शहरात शनिवार दिनांक ३ मे २०२५ रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात बौद्ध विचार अथांग सागर, चला सारे करूया जागर ! हे घोषवाक्य घेऊन राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलन ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले आहे. या अंतर्गतच कवींना आपल्या कविता सादर करण्यासाठी आवश्यक वेळ मिळावा या उद्देशातून स्वतंत्रपणे कवी संमेलन शनिवारी २६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले आहे. या कवी संमेलनात उपस्थित कवींना बुद्ध आणि त्यांचा धम्म, बौद्ध धम्माची आधुनिक काळात गरज, बुद्धांचे जीवन कार्य यावर आपल्या कविता सादर करता येतील. धम्म विषयक विचार संदेश देणाऱ्या केवळ सकारात्मक कविता यामध्ये अपेक्षित आहेत. प्रत्येक कवीला एकच रचना सादर करता येईल.

या संमेलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी आपली नावे ९८२२ ६१६१४१ आणि ७७२२० ३५०३६ या व्हाट्सअप नंबरवरच नोंदवावीत, असे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर , कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे यांनी केले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाचा राष्ट्रपिता घोषित करावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

### बोधिसत्व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाची मागणी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाचा राष्ट्र पिता घोषित करावे, अशी मागणी बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जनमनातील राष्ट्रपिता या पुस्तक रुपी पत्राद्वारे लेखक सुशील फडके, सह लेखक रजनीकांत क्षीरसागर , बापू भास्कर ,परमेश्वर हासबे हे एक वर्षापेक्षा जास्त काळापासून ही मागणी करत असून याची साधी दखल आजपर्यंत घेतलेली नाही. आमची संबंधित २०० पेक्षा जास्त मंडळे आहेत. या सर्वांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाचा राष्ट्रपिता घोषित केले जावे अशी मागणी करत आहोत. जन मनातील राष्ट्रपिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना देशाचा राष्ट्रपिता घोषित केलेच पाहिजे अशी तीव्र जनभावना आहे. या प्रक्रियेस महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी या जाहीर पत्राद्वारे बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.

# चिंचोळी औद्योगिक वसाहतीत अग्निशमन सेवा सप्ताह साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

अग्निशमन सेवा सप्ताहानिमत्त अग्निशमन वाहनांची चिंचोली औद्योगिक वसाहतीतून अग्निप्रतिबंध जनजागृती करीत प्रभातफेरी काढण्यात आली. त्यानंतर अग्निशमन केंद्र चिंचोली येथे कारखान्यातील कामगार व कर्मचाऱ्यांकरिता फायर ड्रिल स्पर्धा आयोजित केली होती. त्यामध्ये फायर एक्स्टिंग्यूशर ड्रिल, कीचेन फायर ड्रिल या स्पर्धेचे आयोजन केले गेले.


स्पर्धेमधे १५ कारखान्यातील ६० ते ७० पुरुष व महिला कामगार व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी पाहुणे म्हणून इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष डी. राम रेड्डी, उपाध्यक्ष गणेश सूत्रावे, महानगरपालिका मुख्य अग्निशमन आधिकारी राकेश साळुंके, डेप्यूटी डायरेक्टर इंडस्ट्रीयल सेफ्टी वकील व व्यवस्थापक शुद्धोधन गायकवाड उपस्थित होते. पाहुण्याचे स्वागत दिनेश अंभोरे अग्निशमन अधिकारी जे. जे. शिंदे उप अग्निशमन अधिकारी, काकासाहेब साळुंखे, नितीन राठोड, तुषार साबळे यांनी पर्यावरण पूरक झाडे भेट देवून केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता दिनेश अंभोरे, जे. जे. शिंदे, काकासाहेब साळुंखे, नितीन राठोड, व्ही. टी. शिंदे, आर. एन. अबदागिरी, एल. आर. घुगे, जे. टी. दोलतोडे, डी. ए. रकटे, आर. बी. तांदळे, तुषार साबळे यांनी परिश्रम घेतले.

### स्पर्धेमध्ये विजयी झालेल्यांची नावे प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे

किचन फायर ड्रिल : मंजू वाणी (मे. एल. डी. के कंपनी), पल्लवी पडवळकर अकवा फार्मा), तैहसीन शेख (स्मृति ओर्गेनिक). फायर एक्स्टिंग्यूशर ड्रिल : पूजा पाठक (मे. एल. डी. के कंपनी), पूजा ढाले (मे. एल. डी. के कंपनी), मनीषा खंडतारे ( मे. एल. डी. के कंपनी). फायर एक्स्टिंग्यूशर ड्रिल : विश्वजित भोसले (मे.बालाजी स्पेशयलिटी केमिकल), विशाल सपकाळ (मे. स्मृतिओर्गेनिक) रितेश बागलाने (मे.बालाजी अमाइन्स यूनिट -४).

# मरणातून अमरत्वाकडे

पुनरूत्थान म्हणजे मरणावर विजय मिळविणे, पवित्र शास्त्रातील शास्त्र लेखा प्रमाणे तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठवण्यात आले (१ करिथ १५:४) तर ज्या आपल्या प्रभु येशूला आपल्या अपराधांमुळे धरून देण्यात आले, व आपण नितीमान ठरावे म्हणून त्याला पुन्हा उठविण्यात आले, त्याला मेलेल्यातून ज्याने उठविले त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या आपणाकडे ते गणले जाईल, त्यांच्यासाठी हि लिहिले आहे. (रोम ०४:२४,२५) कारण आपल्याला माहित आहे की मेलेल्यातून उठवलेला खिस्त पुन्हा मरत नाही, त्याच्या वर पुढे मरणाची सत्ता नाही (रोम ६:९) म्हणून ज्याने येशूला मेलेल्यातून उठविले त्याचा आत्मा जर तुमच्या मध्ये वास करतो तर ज्याने खिस्ताला मेलेल्यातुन उठवले तो तुमच्यामध्ये वास करणाऱ्या आपल्या आत्माने तुमची मर्त्य शरीरेहि जीवंत करील (रोम ८:११) व त्याने तीच कृति ख्रिस्ताच्या ठायी दाखवुन त्याला मेलेल्यातुन उढवले, आणि सर्व सत्ता, अधिकार, सामर्थ्य, धनीपण, सांप्रत आणि भावी युगातील कोणतेही नाव घ्या, त्या सर्वाहुन त्याला उंच करून स्वर्गलोकि आपल्या उजवीकडे बसविले. (इफिस ०१:२०) कारण आपल्याला देवाजवळ नेण्यासाठी ख्रिस्तानेही पापांबद्दल म्हणजे धार्मिक पुरूषाने अधार्मिक लोकांकरता, एकदा दु:ख सोसले, तो देहरूपे जिवे मारला गेला पण आत्मात जिवंत केला गेला. (१ पेत्र ३:१८) तो स्वर्गात जाऊन देवाच्या उजवीकडे बसला आहे आणि त्याच्या स्वाधीने देवदूत, अधिकारी व सत्ताधीश हे ठेवले आहेत (१ पेत्र ३ : २२) म्हणुन प्रभु येशू म्हणतो, मी आपला प्राण परत घेण्याकरिता देतो म्हणून पिता माझ्यावर प्रिती करतो कोणी तो माझ्या पासुन घेत नाही, तर मी होऊनच ते देतो मला तो देण्याचा व घेण्याचा अधिकार आहे, ही आज्ञा मला माझ्या पित्यापासुन प्राप्त झाली आहे. (योहान १०:१७,१८) कारण मी मेलो होतो तरी पाहा, मी युगानुयुग जिवंत आहे, आणि मरणाच्या व अधोलोकाच्या किल्लया माझ्याजवळ आहेत. (प्रकटी ०१: १८) म्हणुन जो पवित्र व सत्य आहे, ज्याच्या जवळ दावीदाची किल्ली आहे, ज्याने उघडल्यावर कोणी बंद करणार नाही आणि ज्याने बंद केल्यावर कोणी उघडणार नाही, तो असे म्हणतो, तुझी कृत्ये मला ठाऊक आहेत पाहा, मी तुझ्यापुढे दार उघडुन ठेवले आहे, ते कोणी बंद करू शकत नाही, तुला शक्ती थोडी आहे, तरी तू माझे वचन पाळले व माझे नाव नाकारले नाही (प्रकटी ०३:७,८) आपल्या प्रभु येशु ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवार्दित असो, जिवंत आशा प्राप्त होण्यासाठी आणि अविनाशी, निर्मळ व अक्षय वतन मिळण्यासाठी त्याने आपल्या महादयेनुसार येशु खिस्त्याच्या मृतातून पुनरूत्थानाच्या व्दारे आपल्याला पुन्हा जन्म दिला. जे तारण शेवटच्या काळी प्रगट होण्यास सिध्द आहे, ते प्राप्त व्हावे म्हणून जे तुम्ही देवाच्या शक्तीने विश्वासाच्या योगे रक्षिलेले आहे, त्या तुम्हासाठी ते वतन स्वार्गात राखून ठेवले आहे. (१ पेत्र ०१: ३ ते ५) धीराविषयीचे माझे वचन तु राखले आहे म्हणून पृथ्वीवर राहणाऱ्या लोकांची परीक्षा होण्याचा, जो परीक्षा प्रसंग सर्व जगावर येणार आहे, त्यापासुन ही मी तुला राखीन. मी लवकर येतो, तुझा मुगूट कोणी घेऊ नये म्हणुन जे तुझ्याजवळ आहे ते घट्ट धरून राहा (प्रकटी ०३:१०:११) हे आश्वासन विश्वास ठेवणाऱ्यांना ताकद देणारे व सर्व जगिक नकारार्थी विचारावर विजय मिळवून देणारे आहे. कारण इस्त्राएल देशामध्ये प्रभु येशूची रिकामी कबर ही आजही साक्ष देत आहे. आमच्या मानवी जीवनाला ह्या अस्थिर व अशांत जगात जगण्यासाठी आध्यात्मिक रीतिने दैवी उर्जा देऊन खऱ्या अर्थाने जीवन जगण्याचा आनंद प्राप्त करून देत आहे. प्रभू येशूला कोटो-कोटी धन्यवाद.



**- सुनिल मोरे, ९८८१७२१५७८**

## महत्वाचे...



### नातेपुते एज्युकेशन प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**नातेपुते, दि. १९ एप्रिल-**

नातेपुते एज्युकेशन प्राथमिक विभागाच्या चौथीच्या (ब तुकडी) विद्यार्थ्यांचा निरोप संभारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नातेपुते एज्युकेशनचे चेअरमन धैर्यशील देशमुख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून व्हॉइस चेअरमन संतोष काळे, प्राथमिक विभाग सभापती बाहुबली चंकेश्वरा, ॲड. शिवाजी पिसाळ, नगराध्यक्षा अनिता लांडगे, माजी उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, विस्ताराधिकारी सुषमा महामुनी, मुख्याध्यापक दत्तात्रय यादव, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कुंडलिक इंगळे, उपप्राचार्य भारत पांढरे, अनन्या क्लासचे संचालिका आम्रपाली वाळके, सहशिक्षक संजय जाधव, रवी ननवरे उपस्थित होते. नातेपुते एज्युकेशन प्राथमिक विभागाचे सहशिक्षक अभिजीत वाळके व त्यांचे सहकाऱ्यांनी डॉ. बा. ज. दाते सभागृहात निरोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला होता. यावेळी इयत्ता चौथीच्या ७० मुलांनी आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे व सर्व पालकांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. यावेळी वाळके यांनी सर्व पालक तसेच मुलांना व पाहुण्यांना जेवण दिले.




### सिंहगड महाविद्यालयात गुणवंतांचा सत्कार

**पंढरपूर, दि. १९ एप्रिल-**

येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रथम वर्ष विद्यार्थी पालक मेळावा व गुणवंत विद्यार्थी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. कैलाश करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. अनिल निकम, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट विभाग प्रमुख डॉ. समीर कटेकर, पालक प्रतिनिधी दशरथ सांगोलकर व सुरेश पाटील यांचे हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या सुरवातीस प्रथम वर्ष विभाग प्रमुख डॉ. अनिल निकम यांनी पालक मेळाव्याच्या आयोजनाचे उद्दिष्ठ स्पष्ट केले. तसेच विद्यापीठाच्या परीक्षेत यश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केला. यावेळी त्यांनी नमूद केले कि पंढरपूर सिंहगडचे ८ विद्यार्थी हे विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पहिल्या १० मध्ये आलेले आहेत. त्याचप्रमाणे १९ विद्यार्थ्यांनी १०/१० ग्रेड पॉईंट मिळविले आहेत. तसेच यावेळी विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञान वर्धित शिक्षणावरील राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत एकूण ३३५ विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याची माहिती दिली. यामध्ये तीन विद्यार्थ्यांनी सुवर्ण पदक मिळविले आहे तसेच ७५ विद्यार्थ्यांनी रौप्य पदक मिळविले आहे. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्याकडून घेण्यात आलेल्या परीक्षेत उत्तुंग यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे यावेळी विद्यार्थ्यांची भारतीय ज्ञान परंपरा प्रतिकृती स्पर्धा घेण्यात आली होती या स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान या प्रसंगी करण्यात आला. तसेच प्रथम वर्षातील स्वप्नजा काळे, वेदिका डुबल, प्रतीक फुंडे, वैशाली चव्हाण, आयमान बेदरेकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन वैभवी पवार व सृष्टी अरकिले, आभार प्रा. शिवाजी पवार यांनी मानले.

### कृष्णा रेवडकर यांची महसूल सहाय्यक मंत्रालयपदी निवड

**बार्शी, दि. १९ एप्रिल-**



परांडा तालुक्यातील कुंभोज येथील कृष्णा जेजेराम रेवडकर याची एमपीएससी मधून महसूल सहाय्यक मंत्रालयपदी निवड झाली आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद कासुर्डी, (ता. दौंड) माध्यमिक शिक्षण जय हिंद विद्यालय, कासुर्डी, ता. दौंड तसेच त्याचे इंजिनिअरिंगचे शिक्षण इंदिरा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग, पुणे येथे पूर्ण झाले. त्यांच्या आई-वडिलांनीआपल्या दोन्ही मुलांना चांगले शिकवायचे हे स्वप्न उराशी बाळगले. दोन्ही मुलांना त्यांनी चांगले शिक्षण दिले.थोरला मुलगा गोकुळ हा नामांकित कंपनीमध्ये इंजिनियर म्हणून काम करत आहे. त्याने आपल्या भावाची शिक्षणाची जबाबदारी उचलली व भाऊ आज एमपीएससी उत्तीर्ण होऊन त्याची महसूल मंत्रालय सहाय्यक म्हणून निवड झाली आहे.

### जिल्हा वाहतूक शाखेच्या पथकाची तत्परता; एकास मिळाले जीवदान

**मंगळवेढा, दि.१९ एप्रिल-**

मंगळवेढा-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील दामाजी कारखाना पाटीच्या अलिकडे माळकोटा (ता.उत्तर सोलापूर) येथील एका व्यक्तीस अज्ञात वाहनाने उडविल्याने ते महामार्गावर बेशुध्द अवस्थेत पडले होते. त्या दरम्यान जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस जात असताना त्यांना हे दृश्य दिसताच त्यांनी तात्काळ १०३३ नंबरला कॉल करुन ॲम्ब्यूलन्स बोलावून उपचारासाठी सोलापूर सिव्हीलला पाठविल्याने त्या व्यक्तीला जीवदान मिळाले आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील जिल्हा वाहतूक शाखेचे पथक ड्रींक अँड ड्राईव्ह या कारवाईसाठी मंगळवेढ्यात आले होते. कारवाई करुन सोलापूरकडे परतत असताना मंगळवेढा-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गावरील दामाजी कारखाना पाटीच्या अलिकडे माळकोटा येथील चंद्रकांत कोळी हे पायी चालत जात असताना मंगळवेढ्याकडून सोलापूरकडे जाणाऱ्या एका अज्ञात वाहनाने सायंकाळी ६ च्या दरम्यान धडक दिल्याने ते जागेवर जखमी होवून बेशुध्द अवस्थेत पडले होते. या दरम्यान सोलापूरकडे निघालेले जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार तानाजी मुदगूल,पोलीस अंमलदार दिपक गाडवे,पोलीस अंमलदार श्रीकांत दुधाळ आदींनी तत्परता दाखवत तात्काळ अपात्कालीन क्रमांक १०३३ वर कॉल करुन रुग्णवाहिका बोलवून सोलापूर शासकीय रुग्णालयाकडे त्या व्यक्तीस उपचारासाठी पाठविण्यात आल्याने त्यांना जिवदान मिळाले आहे. या घटने दरम्यान येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची बघ्याची गर्दी जमली होती. पोलीस पथकाने दाखविलेली तत्परता हा येथे उपस्थितामध्ये चर्चेचा विषय बनला होता.

# पोलीस ठाण्यासमोरच दोन गटात हाणामारी; चार जण जखमी

## गुन्हा दाखलची प्रक्रिया सुरु, टेंभुर्णीत काही काळ मात्र तणाव

**तभा वृत्तसेवा । अनिल जगताप**
**टेंभुर्णी, दि.१९ एप्रिल-**

टेंभुर्णी पोलीस स्टेशन समोरच कुर्डूवाडी चौकात गुरूवारी दुपारी बारा ते साडेबाराच्या दरम्यान येथील दोन गटात झालेल्या जोरदार हाणामारीत चार जण जखमी झाल्याची घटना घडली. याबाबत अद्याप गुन्हा नोंद झाला नसला तरी तो नोंदवण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे 'दै. तरूण भारत'शी बोलताना पोलीसांनी सांगितले.

सुत्रांच्या माहितीनुसार येथील जाणता राजा मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुधीर बापू महाडिक व अटकेपार झेंडाचे संस्थापक अध्यक्ष दयानंद नाना महाडिक यांचे बंधू राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)चे माजी माढा तालुका अध्यक्ष औदुंबर (भाऊ) देशमुख-महाडिक व इतर तीन जण जखमी या हाणामारीत जखमी झाले आहेत. ही घटना पोलीस ठाण्यासमोर कुर्डूवाडी चौकात घडल्याने शहरातील मेन रोड व कुर्डूवाडी चौकात काही काळ तणाव होता.

या घटनेबाबत गोपनीय सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, सध्या शेतीसाठी उजनी धरणावरून सीना - माढा सिंचन योजनेअंतर्गत कॅनॉलचे पाणी चालू आहे. त्याचे पाणी छोट्या मायनरला घ्यायचे होते मात्र हे पाणी घेण्याच्या वादावरून बुधवारी संध्याकाळी दोन्ही गटात शिवीगाळ व धक्काबुक्की होऊन किरकोळ भांडणे झाल्याचे समजते. याच गोष्टीचा राग मनात धरून गुरुवारी सकाळी अटकेपार झेंड्याचे संस्थापक अध्यक्ष दयानंद महाडिक-देशमुख व राष्ट्रवादीचे माजी माढा तालुकाध्यक्ष औदुंबर महाडिक देशमुख व जनता राजा मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुधीरबापू महाडिक व त्यांचे पुतणे टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य वैभव महाडिक- देशमुख यांच्यासह दोन गटाचे कार्यकर्त्यांची महाडिक वस्ती कॅनॉललगत पुन्हा गुरुवारी सकाळी मारामारी झाल्याचे समजते.

यामध्ये एक महिला व अन्य दोन ते तीन जण जखमी झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. त्याचाच राग मनात धरून टेंभुर्णी पोलीस स्टेशनला फिर्याद देण्यासाठी काही मंडळी येत असतानाच जाणता राजा मित्र मंडळाचे कार्यकर्ते व अटकेपार मित्र मंडळाचे कार्यकर्ते हे कुर्डूवाडी चौकात येताच पोलीस ठाण्याला जाण्या अगोदरच गाड्या एकमेकाला आडव्या लावून आमने-सामने दोन्ही गटांचे दहा ते बारा एकमेकांशी भिडल्याने टेंभुर्णी पोलीस स्टेशनच्या समोरच असलेल्या कुर्डूवाडी चौकामध्ये तुफान काठ्या व जिलबी वाल्यांच्या लाकडाच्या ढलप्या घेऊन फिल्मी स्टाईलने जोरदार हाणामारी झाली. मात्र माराच्या भीतीपोटी टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य वैभव देशमुख-महाडीक यांनी यातून पळ काढल्याचे समजते. कुर्डूवाडी चौकात भीतीचे वातावरण व ट्राफिक जाम झाले होते. अनेक नागरिक मारामारी पाहून सैरावैरा होऊन भयभीत झाले होते. त्याच क्षणी टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील व पोलिसांनी काठ्यांचा धाक दाखवत सर्व वातावरण शांत केले. दोन्ही रस्त्यावरची वाहतूक सुरळीत केली. तुफान हाणामारीत जखमी झालेले टेंभुर्णी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले होते मात्र त्यांनी अद्याप तक्रार दिली नसून जाणता राजा मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष सुधीरबापू देशमुख-महाडिक व त्यांचे कार्यकर्ते अकलूज येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे पोलीस सूत्राकडून समजते.

तर राष्ट्रवादीचे माजी तालुका अध्यक्ष औदुंबर देशमुख-महाडिक व इतर तीन जण सोलापूर येथील खाजगी हॉस्पिटलला उपचार घेत असून अद्याप टेंभुर्णी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला नसून या घटनेमुळे टेंभुर्णी परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या पंधरा दिवसांपूर्वीच हॉर्न वाजवण्याच्या कारणावरून दोन गटात हाणामारी झाली होती. पुन्हा आता ही दुसरी घटना पोलीस स्टेशनसमोरच घडल्याने कायदा व सुव्यवस्था बिघडल्याचे दिसून येत असल्याचे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे. या दोन्ही गटाने टेंभुर्णी पोलीस ठाण्यात अद्याप तक्रार दिली नसून ते प्राथमिक उपचारासाठी अकलूज मध्ये खाजगी हॉस्पिटलला उपचार घेत आहेत. सध्या दोन्ही गटांत तणावाचे वातावरण असून पुन्हा काहीतरी घडण्याची शक्यता असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील कायदा व सुव्यवस्था जपण्यासाठी सक्षम ठरणार का ? अपयशी ठरणार ? याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.



आजपर्यंत मी कधीही भांडण केले नाही. मी नेहमी भांडणे मिटवण्यासाठी प्रयत्न करतो. सकाळी झालेल्या भांडणाची तक्रार देण्यासाठी मी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात चाललो असताना मला आडवी गाडी घालून मारण्याचा प्रयत्न केला. - औदुंबर देशमुख-महाडीक, माजी तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट)

**- औदुंबर महाडीक**



या घटनेची माहिती मिळताच आम्ही पाच मिनिटात कुर्डूवाडी चौकात जाऊन तातडीने दोन्ही गटातील आरोपींना टेंभुर्णी पोलीस ठाण्यात आणले. त्यांना तातडीने प्राथमिक उपचार केंद्र टेंभुर्णी येथे पाठवले परंतु त्यांनी रिफायर करून अकलूज व सोलापूर येथे ते उपचार घेत आहेत. त्याठिकाणी तक्रार घेण्यासाठी टीम पाठवली होती परंतु तेथील डॉक्टरांनी पेशंटची तक्रार देण्यासारखी मनःस्थिती नसल्यामुळे तुम्ही नंतर या असे सांगितले त्यामुळे अद्याप तक्रार दाखल नसली तरी पण आम्ही प्रयत्न करत आहे. कायदा व सुव्यवस्था जपण्यासाठी आम्ही कुठेही कमी पडणार नाही.

**- दीपक पाटील, पोलीस निरीक्षक,**
टेंभूर्णी पोलीस ठाणे.



मी दवाखान्यात गेलो होतो. माझी शुगर वाढल्यानंतर मी शहाच्या मेडिकल मध्ये जात असताना माझ्या पुतण्याच्या गाडीवर हल्ला करत असल्याचे मला दिसून आल्याने मी धावून गेलो. मी त्याला सोडवत असताना मला सात ते आठ जणांनी मिळून मारले असून तो माझ्यावर मोठा अन्याय झाला आहे मला न्याय मिळावा.

**- सुधीर देशमुख-महाडीक, अध्यक्ष, जनता राजा मित्र मंडळ.**

## संतांची उपासना केल्यावरच आपणाला भगवंताची प्राप्ती होऊ शकते

### धर्मसंकीर्तन प्रवचनात हभप कुलदीप साळोखे यांचे विवेचन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि १९ एप्रिल**

भगवंतापेक्षा गुरू व संत श्रेष्ठ आहेत आणि संतांची उपासना केल्यावरच आपणाला भगवंताची प्राप्ती होऊ शकते असे विवेचन कारभारवाडी, कोल्हापूर येथील प्रवचनकार तथा कोल्हापूर ते अक्कलकोट इच्छापूर्ती पदयात्रेचे मार्गदर्शक गुरुवर्य ह.भ.प.कुलदीप साळोखे यांनी केले. श्री. स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी निमीत्त येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने आयोजीत करण्यात आलेल्या धर्मसंकीर्तन महोत्सवातील सहावे पुष्प आज हभप कुलदीप साळोखे यांच्या प्रवचन सेवेने गुंफले गेले.

या प्रवचन सेवेत विवेचन करताना हभप कुलदीप साळोखे बोलत होते. प्रवचन सेवेपूर्वी देवस्थानच्या वतीने देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा, देऊन हभप कुलदीप साळोखे व स्वामी भक्त सुहास पाटील यांचा सन्मान केला व स्वामी दर्शनाचा लाभ घडवून आणला.



पुढे बोलताना या प्रवचनसेवेत हभप कुलदीप साळोखे यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वरीतील अठराव्या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकांतर्गत चिंतनातील 'गुरु तेथे ज्ञान ज्ञानी, आत्म दर्शन दर्शनी, समाधान अथी जैसे' या ओवीवर गुरूंचे महात्म्य विस्तृतपणे स्पष्ट केले.

हभप साळोखे महाराजांच्या या सुमधूर प्रवचन वाणीतून उपस्थित भाविक श्रोतावर्ग मंत्रमुग्ध झाला. मान्यवरांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक ओंकार पाठक यांनी केले. यावेळी मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, ओंकार पाठक, प्रथमेश इंगळे, श्रीशैल गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, कोल्हापूरचे स्वामी भक्त सुहास पाटील, अंकूश केत, बाळासाहेब एकबोटे, सुनिल कटारे, डॉ.मल्लीनाथ बोधले, दर्शन घाटगे, निंगूताई हिंडोळे, दर्शन घाटगे, धनराज स्वामी, प्रकाश कासेगांवकर, स्वामीनाथ लोणारी, मोहन जाधव, सागर गोंडाळ, आदीत्य गवंडी, ज्ञानेश्वर भोसले, बंडोपंत घाटगे, लखन सुरवसे, अविनाश क्षीरसागर, विपूल जाधव, प्रसाद पाटील सर, चंद्रकांत गवंडी, प्रसाद सोनार, महेश मस्कले, महेश काटकर, रविराव महींद्रकर आदींसह भाविक भक्तांनी उपस्थित राहून या प्रवचन सेवा श्रवणाचा लाभ घेतला.



## जिल्हा परिषद भांडेवस्ती शाळेतील चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भांडेवस्ती येथील इयत्ता चौथीमधील विदयार्थीना आज निरोप देणयात आला. पहीली ते चौथीपर्यंत या शाळेत शिक्षण घेतल्यानंतर पुढील पाचवीच्या शिक्षणासाठी दुसऱ्या शाळेत प्रवेश घयावा लागणार आहे.

त्या अगोदर शाळेच्या वतीने या सर्व विद्यार्थ्यांना आदरपूर्वक निरोप देणयात आला. यावेळी विदयार्थीना या शाळेमध्ये आलेले अनुभव सांगितले.

भविष्यात चांगली गुणवत्ता प्राप्त करुन मोठ मोठ्या क्षेत्रात अधिकारी बनणयाचे स्वप्न यावेळी विदयार्थीनी आपल्या मनोगतातून बोलून दाखविले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सचिन पवार, सुर्यकांत जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले.

## केमच्या बारवेत शेकडो मासे मृत्यूमुखी

### शिवसेनेच्या महिला आघाडीकडून चौकशीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१९ एप्रिल-**

केम (ता. करमाळा) येथील श्री ऊत्तरेश्वर देवस्थानच्या हेमांडपंथी मंदिराशेजारी असलेल्या पुरातन क्षेमकुंड अर्थात बारव यातील पाण्याचा प्रमाणापेक्षा अधिक उपसा केल्याने पाण्याविना यातील शेकडो मासे मृत्यूमुखी पडले आहेत. त्याच्या चौकशीची मागणी शिनसेना महिला आघाडी तालुका प्रमुख वर्षा चव्हाण यांनी केली आहे.

येथील मंदिराशेजारी कुंडात हात पाय धुतल्याने उजैनचा राजा क्षेमराजा याच्या अंगाला सुटलेली दुर्गंधी नाहीशी झाली होती. मग राजाने याठिकाणी खोदकाम केले असता सात शिवलिंग निघाले. यामध्ये श्री ऊत्तरेश्वर देवस्थान व बाकीचे शिवलिंग हे त्यांचे भाऊ म्हणून केम परिसरात आहेत अशी आख्यायिका आहे. या क्षेमकुंडाला बारव म्हटले जाते. दर सोमवारी मंदिरात भाविकांची गर्दी असते. बारवेचा आकार शिवलिंगासारखा आहे. मंदिरात दर्शनासाठी आलेले भाविक या बारवेच्या पाया पडतात तसेच या पाण्यातील माशाना खाण्याचे पदार्थ टाकतात. या बारवेवर देवस्थानने जमीन दिलेल्या खंडकरी शेतकऱ्यांचे पाण्याचे हिस्से आहेत. शेतकरी पिकांना पाणी देण्यासाठी पाण्याचा उपसा करतात. प्रमाणापेक्षा अधिक उपसा झाल्याने सोमवारी सकाळी या बारवमध्ये शेकडो मासे मरून वर आले होते. भाविकांना दर्शनासाठी आल्यावर दिसले. सोमवार व देवस्थान अन्नछत्राचा वर्धापनदिन असल्याने भाविकांनी गर्दी केली होती. भाविक बारवेतील मृत्यूमुखी पडलेल्या माशाकडे पाहून हळहळ व्यक्त करीत होते. पाणी खरडून काढल्याने व उन्हामुळे गरम होऊन हे मासे मेल्याची चर्चा नागरिकातून होत आहे.

याबाबत कावडीवाले कुंडलिक तळेकर व सचिन तळेकर यानी सांगितले कि कावडया मंदिरात धार घालण्यासाठी आणल्या होत्या परंतु कावडयावर गुलाल ऊधळला तो वरच राहीला. गुलाल बारवत गेला नाही. आमच्याकडे व्हेडिओ आहे. आता हे निष्पाप मासे मेले याला जबाबदार कोण याची चौकशी व्हावी अशी मागणी शिनसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख वर्षा चव्हाण यांनी केली आहे. यासाठी पाण्याचे नियोजन व्हावे अशी मागणीही त्यांनी केली आहे.

याबाबत देवस्थान कमेटीचे सचिव मनोज सोलापूरे यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले, या बारवेमधून शेतकरी खरडून पाणी काढतात. दुसरे कारण म्हणजे पौर्णिमेला कावडया मंदिरात धार घालण्यासाठी येतात त्याचा गुलाल पाण्यात पडल्याने हे मासे मेले असतील.

## चिलार निर्मूलनास लोकसहभाग द्या; मोफत जेसीबी देण्याचा प्रस्ताव

### सांगोल्यातील माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १९ एप्रिल-**

चिलार निर्मूलनासाठी लोकसहभाग मिळाल्यास मोफत जेसीबी दिला जाईल, असे आवाहन माणगंगा भ्रमणसेवा बहुउद्देशीय संस्थेने केले आहे. वर्षानुवर्षे चिलार बाभळीचे प्रमाण वाढत चालल्याने नद्या, ओढे, बंधारे कोरडे पडू लागले आहेत. चिलार बाभळीची मुळे शंभर फुटाहून खोल जात असल्याने जमिनीच्या पोटातील पाणी मोठ्या प्रमाणात शोषण केले जाते. माणदेशातील माण, कोरडा, अफ्रुका व बेलवण या नद्यांच्या पात्रात, नदी काठावर व त्यास मिळणाऱ्या ओढ्यावर चिलार बाभळीचे प्रमाण जास्त असल्याने पावसाचे पडणारे पाणी तसेच बंधाऱ्यात साठणारे पाणी चिलार बाभळीच्या शोषणाने लगेच संपते. या पाण्याची बचत व्हावी म्हणून आमच्या संस्थेच्या वतीने लोकसहभागातून गेल्या १० वर्षापासून माण नदीपात्रातील चिलार निर्मूलनाचे काम चालू आहे. नदीपात्र स्वच्छ झाल्यामुळे चार-पाच वर्षापासून माण नदीपत्रात व त्यावरील बंधाऱ्यात पाणी टिकून राहते.



सदर अभियानाकरता ग्रामपंचायत, शेतकरी, नागरिक स्वयंस्फुर्तीने सहभागी होणार असतील आणि लोकांच्या सहभागातून चिलार निर्मूलनासाठी जेसीबी मशीन लावत असतील तर त्यांच्या मशीन बरोबर आमच्या संस्थेच्यावतीने मोफत मशीन पुरवठा केला जाईल. अधिक माहितीसाठी मो.नं. ९४२००९३५९९ किंवा ९५५२८९२६७० या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पिलीव परिसरात उन्हाच्या तडाख्याने जनजीवन विस्कळीत

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १९ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात सध्या सूर्य आग ओकत आहे. यामुळे प्रचंड उन्हाचा तडाखा व उष्णतेपासून बचाव कसा करायचा यासाठी तरुणापासून ते वयोवृद्ध, अबाल अक्षरशः हतबल झाले आहेत.

सकाळी दहा-अकरा पासून पिलीव भागातील सर्वच रस्ते अक्षरशः ओसाड पडत आहेत. सायंकाळी सहा नंतरच बाजारपेठत गोंगाट सुरू होत आहे. बरेचजण निरा-उजवा कालवा किंवा विहीरीत पोहण्याचा आनंद घेत आहेत. सध्या प्रचंड उन्हाचा तडाखा असून सुद्धा दहावी व बारावी सोडून इतर कोणत्याही वर्गाची अद्यापही परीक्षा झालेली नाही. त्यामुळे सकाळी लवकर शाळेत येऊन नंतर ऐन उन्हाच्या तडाख्यात म्हणजे सकाळी बाराच्या दरम्यान विद्यार्थ्यांना घरी जावे लागत आहे. शासनाच्या नवीन धोरणानुसार यंदा विद्यार्थ्यांना २६ एप्रिलपर्यंत शाळेत यावे लागणार आहे. गेल्या आठवडाभरापासून तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. तापमान ४० अंशापर्यंत गेल्यामुळे अक्षरशः उकाड्याने जिवाची काहीली होत आहे.

नागरिकांचा सध्या ऊसाचा रस, सरबत यासह इतर थंड पेयाकडे मोठा कल दिसत आहे. त्यामुळे थंड पेय विक्री करणाऱ्या गाडयावर चांगलीच गर्दी दिसत आहे. रात्रंदिवस उकाड्याचा प्रचंड त्रास होत आहे. त्यातच विजेचा लपंडाव यामुळे उकाड्यापासून सुटका करणे प्रचंड अवघड झाले आहे. पिलीव सोडून बचेरी, शिंगोर्णी, सूळेवाडी या गावात पिण्याच्या पाण्याचा तसेच जनावरांच्या चाऱ्याचीही समस्या गंभीर झाली आहे. चाऱ्याचे दरही प्रचंड गगनाला भिडले आहेत. पुढील मे महीन्यात २४ तारखेला रोहीणी नक्षत्र सुरु होणार आहे. पण प्रत्यक्षात पाऊस कधी पडणार व मोठा पाऊस झाल्यावरच तापमानात घट होईल मगच दिलासा मिळेल.

## वैराग येथील सुख शांती भवन शाखेचे आज उद्घाटन

**वैराग दि १९ एप्रिल-**

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय बार्शी यांच्या वैराग येथील सुख शांती भवन या नव्या शाखेचा शुभारंभ, माउंट आबू येथील साध्वी उषा बहनजी यांच्या हस्ते रविवार दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी दहा वाजता होणार असल्याची माहिती बार्शी शाखेचे संचालक ब्रम्हकुमार मोहन बुचडे यांनी दिली आहे. यावेळी बुचडे म्हणाले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील हे भूषविणार आहेत यावेळी आमदार कैलास पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मकरंद निंबाळकर, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष निंबाळकर ,नगरपंचायतचे नगराध्यक्ष निरंजन भूमकर, माउंट आबू शांतीवन मुख्य अभियंता ब्रह्माकुमार भरत भाई, बार्शी सेवा केंद्र संचालिका संगीताबेन, आंबेजोगाई सेवा केंद्र संचालिका सुनीता दीदी, इट सेवा केंद्र शकू दीदी, पुणे वडगाव शेरी सेवा केंद्र संचालिका प्रेमादिदी, शेवाळेवाडी पुणे संध्या बिन उपस्थित राहणार आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## 'शिवाजी'च्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे शालेय साहित्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १९ एप्रिल-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.ए.देशमुख, सचिव अंकुशराव गायकवाड, संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या कॉलेजच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे विविध प्रशालांना शैक्षणिक व शालोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.



यामध्ये मंगळवेढा तालुक्यातील श्री बाळकृष्ण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नंदेश्वर, श्री सिद्धनाथ विद्यालय लेंडवे चिंचाळे, सांगोला तालुक्यातील दे.भ. कै. संभाजीराव शेंडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मेडशिंगी, जुनोनी विद्यालय व ज्यु.कॉलेज, महात्मा फुले विद्यालय डोंगरगाव या प्रशालेसाठी व्हाईट बोर्ड, डस्टर व पेन देण्यात आले. तसेच कडलास हायस्कूल येथे पिण्याच्या पाण्याची टाकी, शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजला वॉटर कुलर भेट देण्यात आला. यावेळी आनंद गायकवाड, पृथ्वीराज लिगाडे उपस्थित होते.

## महत्वाचे...



### राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर, दि. १९ एप्रिल-**

केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्री जाधव यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश सूडके, सांगोला उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरविंद गिराम, मंगळवेढ्याचे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जानकर उपस्थित होते.



### एमपीएससी परीक्षेमध्ये यश मिळवणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा भैरवनाथ विद्यालयाकडून सत्कार

**वैराग, दि. १९ एप्रिल-**

गुळपोळी येथील भैरवनाथ विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांनी एमपीएससी परीक्षेमध्ये यश संपादन केल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला .भैरवनाथ विद्यालयातील माजी विद्यार्थी सरिता भानुदास चिकणे (महसुल सहाय्यक ), जितेंद्र सुभाष नरखडे (करनिर्धारण व संकलन निरीक्षक), आकाश राजेंद्र बावणे (मुंबई महानगर पालिका,महसूल सहाय्यक), स्वप्निल सावंत (मंत्रालय सहाय्यक),अश्विन चिकणे (प्रसिद्ध उद्योगपती, पुणे) या माजी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजीत केला होता. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक प्रमोद देशमुख, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला.



### श्री बार्शी गोरक्षण मंडळास श्री रामदेवपीर सेवा संस्थेची देणगी

**बार्शी, दि. १९ एप्रिल-**

बार्शी येथील श्री बार्शी गोरक्षण मंडळ, बार्शी येथे रविवारी श्री रामदेवपीर सेवा संस्था,मुंबई (मालाड) या संस्थेचे पदाधिकारी व संचालक मंडळाचे अध्यक्ष हसमुख सोळंकी, सेक्रेटरी इरेश भटिडा, उपाध्यक्ष यशवंत सोळंकी, संचालक राजेश वाघेला, दिनेश सोळंकी, आनंद सोळंकी,अश्विन वाघेला, करशनभाई भोलेश्वरी, सुरेश सोळंकी यांनी बार्शी गोरक्षण मंडळ या संस्थेला सदिच्छा भेट देऊन येथील गाईला हिरव्या चा-यासाठी रोख रक्कम ११ हजार रुपये देणगी देण्यात आली. यावेळी बार्शी गोरक्षण मंडळ, बार्शीचे अध्यक्ष बाळासाहेब आडके, सेक्रेटरी विजयकुमार बागमार, कोषाध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक संजय सोपल, व्यवस्थापक महारुद्र धारुरकर, रवि क्लासेसचे संस्थापक मधुकर डोईफोडे उपस्थित होते. सूत्रसंचालन मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब आडके यांनी केले.



### शैक्षणिक क्षेत्रात सांगोला रोटरी क्लबचे कार्य उल्लेखनिय-आत्तार

**सांगोला, दि. १९ एप्रिल-**

सांगोला रोटरी क्लब विविध क्षेत्रात उल्लेखनिय सामाजिक कार्य करत असुन यावर्षी क्लबने आमच्या विद्यार्थ्यांसाठी खूपच कौतुकास्पद कार्य केले आहे, असे गौरव उद्गार सांगोला शहरातील जि. प. प्राथमिक शाळा १, भोपळे रोडच्या शिक्षिका आत्तार यांनी काढले. सध्या उन्हाळा प्रचंड वाढला असल्यामुळे सांगोला रोटरी क्लबच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी बॉटल व खाऊवाटप कार्यक्रम घेण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी प्रा.राजेंद्र ठोंबरे व अरविंद डोंबे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रारंभी रोटरी क्लबचे अध्यक्ष इंजि.विकास देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मंगल चौगुले, सचिव इंजि.विलास बिले, अशोक गोडसे, नृत्य प्रशिक्षक कल्याणी सपाटे, वर्षा देशपांडे उपस्थित होते.

## अक्कलकोटचे रस्ते मोकळा श्वास घेतील का?

### मास्टर प्लॅन राबवण्याची गरज; अतिक्रमण हटवण्यात सातत्य नसल्याने भाविकांमध्ये नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१९ एप्रिल-**

अक्कलकोट हे सर्वाधिक गर्दीचे तीर्थक्षेत्र अशी ख्याती आहे. मात्र अक्कलकोट तीर्थक्षेत्रातील मंदिरे गल्ली बोळातच आहेत. मंदिराजवळ येऊन सुध्दा नव्या भाविकांना मंदिर कुठे आहे? अशी विचारणा करावी लागते. अरूंद रस्ते अन त्यात पुन्हा अतिक्रमण यामुळे ते अधिकच अरूंद झाले आहेत. त्यामुळे येथील रस्ते मोकळा श्वास कधी घेणार असा प्रश्न कायम आहे.

नगरपालिकेकडून अतिक्रमण काढण्याची मोहीम राबवली जाते मात्र त्यामध्ये सातत्य नसल्याने सर्वच रस्त्यावर अतिक्रमण बोकाळले आहे. त्यामुळे प्रामुख्याने अरुंद अतिक्रमणयुक्त रस्ते येथील अडचण आहे. चारपदरी, सहापदरी जलदगती रस्त्यावरून प्रवास करून आलेल्या भाविकांना येथे मात्र गल्ली बोळातील अरुंद रस्त्यामधुनच मार्गक्रमण करावे लागते. नगरपालिकेकडून अतिक्रमण हटवल्यानंतर काही काळ शहरातील रस्ते मोकळे श्वास घेताना दिसतात. मात्र यामध्ये सातत्य राखण्याचे काम नगरपालिका यंत्रणेला जमेल काय? याबद्दल शंकाच आहे.



अक्कलकोटचे मुख्याधिकारी सचिन पाटील, तहसिलदार बाळासाहेब शिरसट, पोलीस निरिक्षक जितेद्र कोळी यांनी शहरातील अतिक्रमण मोहिम हटविणेकामी मोठी निगराणी ठेवली आहे पण कायमचा तोडगा काढण्याकामी रस्ता रुंदीकरण मास्टर प्लॅन राबविणे गरजेचे आहे.

मास्टर प्लॅन - १९७२ मध्ये नगरपालिकेने मास्टर प्लॅन तयार केला असला तरी शासनाने सुचविलेल्या सूचनेवरून वेळोवेळी त्यात दुरुस्ती करणेत आली आहे. सुधारित प्लॅन २०१२ मध्ये जाहीर करण्यात आला आहे. स्वामी समर्थ मंदिराच्या दक्षिण महाद्वार ते मुरलीधर मंदिर, फत्तेसिह चौक, तूप चौक, कापड बाजार, मेन रोड, कारंजा चौक, मार्गे समाधी मठ ते ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिरपर्यंत असे आहे. हा मार्ग १२ मीटर रुंदीचा ८५० मीटर लांबीचा असणार आहे. सध्या २५ ते २८ फुटाचा रस्ता अस्तित्वात असून आणखीन दोन्ही बाजूने मिळून १० फुटाचे भूसंपादन करावे लागणार आहे. यासाठी किमान २०० प्रॉपटी बाधित होणार आहेत.

दुसरा मार्ग- मंदिराचे उत्तर महाद्वार ते गुरू मंदिर, राम गल्ली, मधला मारुती, सुभाष गल्ली, दावल बँड ते कारंजा चौक मार्गे समाधी मठ असा दुसरा पालखी मार्ग असणार आहे. ९ मीटर रुंदीचा, ६०० मीटर लांबीचा असून सध्या २२ फुटाचा रस्ता अस्तित्वात आहे. दोन्ही बाजूने मिळून ८ फुटाचे भूसंपादन करावे लागणार आहे. १२५ ते १५० प्रॉपर्टी बाधित होणार आहेत.

## एआय तंत्रज्ञानावर शंकर कारखान्यात कार्यशाळा

### कृषी तज्ञांचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १९ एप्रिल-**

आधुनिक कृषी पद्धतीत एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने उचललेल्या पावलाचा एक भाग म्हणून शंकर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञानविषयी कार्यशाळेचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते -पाटील यांचे हस्ते पार पडले. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार उत्तमराम जानकर उपस्थित होते.



एआयच्या मदतीने शेतकरी अधिक शास्त्रशुद्ध आणि निर्णयक्षम शेती करू शकतील तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए आय) तंत्रज्ञानाच्या साह्याने ऊस पिक जोमात पिकवता येते व त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा नफा मिळवता येतो. याशिवाय साखर कारखान्याचा साखर उतारा वाढणार असल्याचे मत यावेळी कृषी तज्ञ डॉ. संतोष करंजे, डॉ. समाधान सुरवसे यांनी व्यक्त केले. यावेळी शहाजीराव देशमुख, चंद्रकांत शिंदे, विठ्ठल कोरटकर, अनिल जोरवर, प्रतिभा डोके, गणेश बेदरे आदी शेतकऱ्यांनी विक्रमी व उत्पादन घेतल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते - पाटील, कार्यकारी संचालक स्वरूप देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अभिजीत डुबल, जनरल मॅनेजर रविराज जगताप सभासद शेतकरी उपस्थित होते. प्रास्ताविक व्हाईस चेअरमन मिलिंद कुलकर्णी यांनी केले व आभार सुरेश पाटील यांनी मानले.

## चहाच्या दुकानावर हल्ला; कामगार जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ एप्रिल-**

बाळेश्वर नाका येथील 'शिवशाही अमृततुल्य चहा' या चहाच्या दुकानावर दुपारी तीन वाजून सत्तावन्न मिनिटांच्या सुमारास तिघा अज्ञात व्यक्तींकडून अचानक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात दुकानात काम करणारा रोहित कुमार चौहान (रा. बार्शी) गंभीर जखमी झाला असून, दुकानातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे.

दुकानाचे मालक अभिजीत ज्ञानेश्वर खुणे (वय २४, रा. ढगे मळा, बार्शी) यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते जेवणासाठी घरी गेले असता दुकानावर काम करणाऱ्या रोहितने त्यांना फोन करुन तात्काळ येण्यास सांगितले. दुकानात पोहोचल्यानंतर त्यांनी पाहिले की, दुकानातील एलईडी स्क्रीन, काचेच्या भरण्या आणि काउंटर फर्निचर तोडफोड करण्यात आले होते. यामध्ये अंदाजे ८ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. फिर्यादीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, हल्लेखोरांनी रोहितला लाथाबुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली आणि तुला व तुझ्या मालकाला येथे दुकान चालवू देणार नाही, तुम्हा दोघांना ठार मारतो अशी धमकी दिली. या हल्ल्यात रोहितच्या डोक्याला आणि डाव्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्यास तातडीने सुविधा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या प्रकरणी एक आरोपी आकाश खुणे (रा. सोलापूर रोड, बार्शी) याचे नाव समोर आले असून इतर दोघे अद्याप अज्ञात आहेत. पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे.

## माळशिरस तालुक्याचा दुष्काळी कलंक आता मिटणार : पुकळे

### माजी खा.रणजितसिंह निंबाळकरांमुळे मिळाली गती

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि. १९ एप्रिल-**

माळशिरस तालुक्यातील दुष्काळी सर्वच्या सर्व गावांमध्ये निरा देवघरचे पाणी येण्याचा मार्ग माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या मुळेच मोकळा झाला आहे. त्यामुळे माळशिरस तालुक्याचा दुष्काळी कलंक मिटणार असल्याचे मत निरा देवघर पाण्यासाठी संघर्ष करणारे शिवराज पुकळे यांनी व्यक्त केले.

जलसंपदामंत्री डॉ.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या मागणीवरुन माळशिरस तालुक्यातील निरा-देवघर प्रलंबित पाणी प्रश्नावर जलसंपदा विभागाची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये निरा-देवघर प्रकल्पात कृष्णा खोरे विकास महामंडळाचे १७१ व्या बैठकीत ठरल्याप्रमाणे नव्याने समाविष्ट माळशिरस तालुक्यातील कायम दुष्काळी बचेरी, शिगोर्णी, सुळेवाडी, पिलीव, पठाणवस्ती, काळमवाडी, कोळेगाव, गारवाड, मगरवाडी, भांब, फडतरी, लोंढे-मोहीतेवाडी, जळभावी, कोथळे, तरंगफळ, चांदापुरी या गावांना उपसा सिंचनद्वारे पाणी देण्यासंदर्भात चर्चा होऊन ३-४ महिन्यांत सुप्रमा काढण्याचे ठरले. यानिमित्ताने दुष्काळी गावांचा पाणीप्रश्न पहिल्यांदाच शासनाच्या अजेंड्यावर आला आहे. त्याचबरोबर निरा-देवघर मुळ प्रकल्पात असलेल्या गिरवी, पिंपरी (कचरेवस्ती), लोणंद, कन्हेर, इस्लामपूर, रेडे, मांडकी, गोरडवाडी (भांबुर्डी), धर्मपुरी, कारूंडे, मोरोची, नातेपुते, मांडवे, माळशिरस, मोटेवाडी, दहिगाव या गावांना लवकरात लवकर टेंडर काढुन काम सुरू करण्याचे नियोजनही झाले आहे. यामुळे माळशिरस तालुक्याचा दुष्काळी कलंक मिटणार आहे.

या बैठकीला पालकमंत्री जयकुमार गोरे, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार सचिन पाटील, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी पाटील, माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार दिलीप येळगावकर, स्वप्नीलकुमार राऊत, गणेश देशमुख व निरा देवघर प्रकल्प निगडीत सर्व अधिकारी वर्ग उपस्थित होते.

## शेळी चोरण्याच्या संशयावरून तरुणाला मारहाण

**सोलापूर दि.१९ एप्रिल-**

शेळी चोरण्याच्या कारणावरून दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे शुक्रवारी रात्री १०.३० वाजता तरुणाला मारहाण करण्यात आली.

बिरु शिवानंद माने (वय ३०, रा. बोरामणी ता द सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. बोरामणी परिसरातील चिलका तांडा येथे असंताना बिरू यास शेळी चोरण्याच्या संशयावरून शंकर चव्हाण व इतर दोन यांनी लाथाबुक्यांनी व लाकडाने मारहाण केली. यात सर्वांगास मुकामार लागल्याने शनिवारी सायंकाळी ५.१० वाजता रुग्णवाहिकेतून त्याला उपचाराकरीता दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## चौंडी येथे होणार मंत्रिमंडळाची बैठक; मुख्यमंत्र्यांची मान्यता

### खासदार धैर्यशील मोहिते-पाटलांच्या पाठपुराव्याला यश

### राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती वर्षानिमित्त ऐतिहासिक निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १९ एप्रिल-**

राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्रात विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान करण्यासाठी आणि धनगर समाजासह इतर मागासवर्गीय सम ाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्यासाठी, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे चौंडी (जि. अहिल्यानगर) येथे मंत्रीमंडळ बैठक आयोजित करण्याची मागणी पत्राद्वारे केली होती. मध्य प्रदेश सरकारने माहेश्वर (इंदूर) येथे मंत्रीमंडळ बैठक घेऊन अहिल्यादेवी होळकर यांच्या ऐतिहासिक वारशाला सन्मान दिला. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारनेही चौंडी येथे बैठक घेऊन सर्व समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घ्यावा, असे खासदार मोहिते-पाटील यांनी आपल्या निवेदनात सांगितले होते. आता त्यांच्या या मागणीला यश मिळाले असून, ६५ वर्षांनंतर चौंडी येथे मंत्रीमंडळ बैठक आयोजित होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयाबद्दल खासदार मोहिते-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांचा दौरा ठरणार शिवसैनिकांना ऊर्जा देणारा

### जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत

### उद्या माढ्यात जाहीर सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ एप्रिल-**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोमवारी (दि.२१) होणाऱ्या जाहीर सभेची जोरदार तयारी माढा येथे सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सकाळी ११.३० वाजता पृथ्वीराज सावंत यांच्या राजवी ॲग्रो ऑईल प्रा. लि. या कंपनीचा भूमिपूजन कार्यक्रम माढा येथे होणार असून यानंतर त्या ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा होणार आहे.



या सभेसाठी माढ्यातील शेटफळ रोड येथे १५० बाय ५०० चौरस फुटांचा भव्य मंडप उभारणीचे काम सुरू आहे. तसेच ६० बाय ४० चौरस फुटांचे भव्य व्यासपीठ उभारण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ऐकण्यासाठी हजारो शिवसैनिक येणार आहेत. त्यामुळे सभामंडपात २५ हजार खुर्च्या लावण्यात येत आहेत. या मंडप उभारणीच्या कामास शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी शुक्रवारी भेट देऊन पाहणी करत सूचना दिल्या. प्रचंड ऊन असल्यामुळे शिवसैनिकांना पिण्याच्या पाण्याची, भोजनाची, पार्किंगची तसेच सावलीची सोय योग्य प्रकारे होण्याबाबत प्रा. सावंत यांनी वैयक्तिक लक्ष घालून व्यवस्थेबाबत सूचना दिल्या.

आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषद तसेच नगरपालिका निवडणुकांच्यादृष्टीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा सोलापूर दौरा अत्यंत महत्त्वाचा आहे. या दौऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसैनिकांना भेटून त्यांच्याशी संवाद साधणार आहेत. त्यामुळे शिवसेनेच्या सोलापूर जिल्ह्यातील विस्तारासाठी तसेच शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांमध्ये ऊर्जा भरण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा दौरा फलदायी ठरेल, असे सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी सांगितले. सोमवारी होणाऱ्या जाहीर सभेसाठी सोलापूर जिल्ह्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहनही शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी केले.